सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २७९ | पाने १२ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



कुटुंबातील सर्व लहान-मोठे, स्त्री आणि पुरुष यांनी आठवड्यातून एक दिवस कोणत्याही ठरावीक वेळी अनौपचारिकपणे एकत्र बसावे आणि गेल्या आठवड्यात देशासंबंधी, समाजासंबंधी घडलेल्या घटनांची तसेच संघ व विविध कार्यांच्या हालचालींची चर्चा करावी, आपल्या भाषेतून निघणाऱ्या साप्ताहिकात प्रकाशित झालेल्या वार्तांचा उल्लेख व्हावयास हरकत नाही. कुटुंबातील सर्वांना या एकत्रीकरणात मनापासून भाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### सरन्यायाधीशांच्या हस्ते कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन

**मुंबई** : भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते रविवारी कोल्हापूर जिल्ह्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन सर्किट बेंचचे उद्घाटन केले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. कोल्हापुरात चौथ्या खंडपीठाची स्थापना मागील काही वर्षांपासून विविध स्तरावरून होत असलेल्या मागणीच्या पृष्ठभूमीवर करण्यात आली आहे. कोल्हापूर परिसरातील नागरिकांना त्यांच्या याचिकांच्या सुनावणीसाठी ३८० किमी अंतरावर असलेल्या मुंबईला जावे लागणाऱ्या याचिकाकर्त्या आणि वकिलांवरचा भार कमी होईल. सध्या मुंबईतील प्रमुख खंडपीठाव्यतिरिक्त उच्च न्यायालयाचे आणखी दोन खंडपीठे आहेत. त्यात विदर्भातील नागपूर आणि मराठवाडा क्षेत्रातील छत्रपती संभाजीनगरचा समावेश आहे. उच्च न्यायालयाचे तिसरे खंडपीठ शेजारच्या गोव्यात आहे. १ ऑगस्ट रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांनी कोल्हापूरला सर्किट बेंच म्हणून नियुक्त करण्याची अधिसूचना जारी केली.

## मुंबई, पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा इशारा

**मुंबई** : मध्य भारतावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होत असून याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), मुंबई महानगर प्रदेश, आणि मराठवाड्यात (प्रामुख्याने पश्चिम आणि दक्षिण भाग) १८ ते १९ ऑगस्ट दरम्यान जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. प्रामुख्याने कोकणातील सर्वच जिल्हे; नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, पालघर, ठाणे, उर्वरित मुंबई महानगर; सोलापूर, धाराशिव, आणि लातूर जिल्ह्यांचा काही भाग यांचा समावेश आहे. या दरम्यान खान्देश आणि उर्वरित मराठवाड्यात देखील मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. तुलनेत विदर्भात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित आहे. या दरम्यान कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरातील धरण साठ्यात वाढ होऊन नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता आहे. असे राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने कळविले आहे.

## अंतराळवीर शुभांशुचे मायभूमीत आगमन

**नवी दिल्ली** : भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन आणि नासाच्या ॲक्झिअम-४ या यशस्वी अंतराळ मोहिमेचे पायलट शुभांशु शुक्ला यांचे रविवारी आज पहाटे अमेरिकेतून भारतात आगमन झाले. राजधानी दिल्ली येथील विमानतळावर त्यांचे आगमन होताच केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह, मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी त्यांचे स्वागत केले. विमानतळावर उपस्थित असलेले शालेय विद्यार्थी आणि इतर मान्यवरांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

# सोलापूर शहराला दररोज पाणीपुरवठ्यासाठी ८५० कोटींचा निधी मंजूर

### सोलापूरला आयटी पार्क आणणार

### योग्य जागेचा शोध घेण्याचे मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला आदेश

### दैनिक 'तरुण भारत'च्या वृत्ताचीही घेतली दखल

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

सोलापूर शहरामध्ये आयटी पार्क उभे केल्यास युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. जिल्हा प्रशासनाने उत्तम जागा शोधल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आयटी पार्क उभारण्यात येईल आणि इथे आयटी उद्योग आणण्यात येतील. शहरात उद्योगासाठी आवश्यक चांगले रस्ते आणि विमानसेवा उपलब्ध झाल्याने इथल्या औद्योगिक विकासावर भर देण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दरम्यान, दैनिक 'तरुण भारत'च्या माध्यमातूनही आजच रविवारच्या अंकात 'किमान एक तरी आयटी उद्योग सोलापुरात यावा' यासह शहरवासियांच्या इतर गरजांची सुरेख अशी मांडणी मुख्य संपादक प्रशांत माने यांनी केली होती; याचबरोबर आमदार विजयकुमार देशमुख यांनीही हाच विषय आपल्या खणखणीत भाषणातून लावून धरल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांनी याबाबतच्या काही विकासकामांच्या आजच (दि. १७) उद्घोषणा केल्याने अवघ्या सोलापूरकरांनी समाधान व्यक्त केले. तसेच शहरातील अंतर्गत पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेचा महापालिकेने पाठविलेला ८५० कोटींचा प्रस्ताव देखील मान्य केला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीरपणे सांगितले

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत म्हाडातर्फे उभारण्यात आलेल्या दहिटणे येथील राष्ट्र तेज



विमानसेवेबद्दल देवाभाऊंचे अभिनंदन...आता

नाईट लँडिंग व्हावे अन् बोरामणी विमानतळाचे स्वप्न पूर्ण करावे; शहरातील उड्डाणपूल कागदावरच तर सोलापूरला दररोज पाणी मिळावे

प्रशांत माने

किमान एक तरी आयटी उद्योग सोलापुरात आणावाच...

अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत १ हजार १२८ आणि शेळगी येथील श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत २२० अशा एकूण १ हजार ३४८ सदनिकांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज (दि. १७) करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी वरील घोषणा केल्या. विमानतळाचे नाईट लॅन्डिंग, सोलापूर-मुंबई विमानसेवा, शहरातील २ उड्डाणपूल लवकर निर्माण करावेत, सोलापूरकरांना दररोज पाणीपुरवठा करावा आणि किमान एक तरी आयटी उद्योग सोलापुरात उभारावा अशा विविध अपेक्षा मुख्यमंत्री देवाभाऊंकडे मुख्य संपादक माने यांनी आपल्या लेखनीतून मांडल्या होत्या. त्याच अनुषंगाने म्हणजेच दैनिक तरुण भारतच्या वृत्ताची दखल घेवून देवाभाऊंनी आयटी पार्क लवकरच करणार असे सांगून शहरातील जल वितरण वाहिनीच्या ८५० कोटीच्या कामाला मान्यता दिली आहे. इतकेच नाहीतर सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलापूरमध्ये बंद जलवाहिनीने पाणी आणण्यात येणार आहे. सांडपाणी प्रकल्पाच्या जागेचा प्रश्न दूर करण्यात आला असून, ते कामही सुरू करण्यात आले आहे. शहरातील जल वितरण वाहिनीच्या ८५० कोटीच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. सोलापूर शहरातील नागरिकांना दररोज शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, असे प्रयत्न करण्यात येत आहेत. विमानतळाचे अतिरिक्त कामही लवकरच करण्यात येणार आहे.




यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे. समांतर जलवाहिनीमुळे शहरातील पाणी समस्या दूर होण्यास मदत झाली आहे. जलशुध्दीकरण प्रकल्पासाठी जागेची समस्या दूर झाल्याने लवकरच हा प्रकल्प पूर्ण होईल. शहरातील अंतर्गत वितरण व्यवस्थेसाठी ८७२ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सोलापूर-गोवा विमानसेवाही सुरू करण्यात आली आहे. सोलापूर येथून मुंबई आणि पुणे विमानसेवा सुरू व्हावी, अशी सोलापूरकरांची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. 'माझं सोलापूर, सुंदर सोलापूर' हा संकल्प करण्यात आला असून, शहर स्वच्छ आणि सुंदर करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री गोरे यांनी मुख्यमंत्र्यांना दिली.




### विकासाचा आता मोठा बॅकलॉग भरून निघणार

विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांनी आज जोरदार बॅटिंग करीत मुख्यमंत्र्यांचे गेल्या २ वर्षांपासून सोलापूरकडे दुर्लक्ष असल्याची खंत प्रारंभीच व्यक्त केली होती. नागपूरप्रमाणेच सोलापूरकडेही लक्ष द्यावे अशीही अपेक्षा व्यक्त केली होती. इतकेच नाहीतर दैनिक तरुण भारतनेही रविवारच्याच अंकात सोलापूरच्या विविध समस्या मांडून देवाभाऊंनीच सोलापूरचे पालकत्व स्वीकारले तरच सोलापूरच्या विकासाचा मोठा बॅकलॉग भरून निघेल, असा आशावाद व्यक्त केला होता. या सर्व गोष्टींची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आणि आज सोलापुरात जाहीरपणे विविध विकासकामांच्या उद्घोषणा केल्या आहेत.

# राधाकृष्णन् रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार

### जे. पी. नड्डा यांनी केली महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या नावाची घोषणा

**◆ नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

रालोआने उपराष्ट्र पती पदाच्या उमेदवाराची घोषणा केली. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् रालोआचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार असतील, अशी घोषणा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी रविवारी सायंकाळी केली. भाजपाच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत उपराष्ट्रपती पदाच्या उमेदवाराचे नाव निश्चित करण्यात आले, अशी माहिती जे. पी. नड्डा यांनी दिली.

उपराष्ट्रपती सर्व सहमतीने व्हावा, यासाठी विरोधकांसोबत चर्चा केली जाणार आहे, अशी माहिती नड्डा यांनी दिली. असे आम्ही यापूर्वीही केले आहे. आम्ही विरोधकांच्या संपर्कात आहोत. आमच्या वरिष्ठ नेत्यांनी यापूर्वीही त्यांची भेट घेतली आणि ते संपर्कात आहेत. रालोआने उपराष्ट्रपती पदासाठी सी. पी. राधाकृष्णन् यांची उमेदवारी निश्चित केली आहे आणि सहकारी पक्षांनीही या निर्णयाला पाठिंबा दिल्याचे नड्डा यांनी सांगितले.

तामिळनाडूच्या तिरुप्पूर येथे २० ऑक्टोबर १९५७ रोजी चंद्रपुरम् पोनुस्वामी राधाकृष्णन् यांचा जन्म झाला. ते भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत आणि सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. राधाकृष्णन् यांनी आपला राजकीय प्रवास जनसंघाच्या माध्यमातून सुरू केला होता. १९९८ आणि १९९९ मध्ये कोईम्बतूर येथून लोकसभा निवडणूक जिंकले होते. २००३ ते २००६ या कालावधीत ते तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष राहिले.

सी. पी. राधाकृष्णन् फेब्रुवारी २०२३ ते जुलै २०२४ या कालावधीत झारखंडचे राज्यपाल राहिले. या व्यतिरिक्त मार्च ते जुलै २०२४ या कालावधीत तेलंगणाचा अतिरिक्त प्रभार त्यांच्याकडे होता. त्यानंतर मार्च ते ऑगस्ट २०२४ पर्यंत त्यांनी पुदुचेरीच्या नायब राज्यपालाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळला होता. ३१ जुलै २०२४ पासून ते महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. (वृत्तसंस्था)



उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् यांचे अभिनंदन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

### सी. पी. राधाकृष्णन् यांचे उल्लेखनीय कार्य

तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष असताना २००४ ते २००७ या कालावधीत त्यांनी ९३ दिवसांची रथयात्रा काढली होती. नदीजोड, दहशतवादाच्या विरोधात जागरुकता आणि अस्पृश्यता निर्मूलनाचा उद्देश या रथयात्रेमागे होता. संसदेत ते वस्त्रोद्योगावरील स्थायी समितीचे अध्यक्षही होते. सोबतच त्यांनी कित्येक आर्थिक आणि सामाजिक उपक्रमांशी संबंधित समित्यांमध्ये सक्रिय भूमिका पार पाडली होती. त्यांनी व्हीओ कोईम्बतूर येथील चिदम्बरम् महाविद्यालयातून बीबीएची पदवी प्राप्त केली आहे.

# सात दिवसांत शपथपत्र द्या, अन्यथा देशाची माफी मागा

### ज्ञानेश कुमार यांचा राहुल गांधींना इशारा | निवडणूक आयोगाने पत्रपरिषदेत फेटाळले आरोप

**◆ नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

निवडणूक आयोग आणि मतदारयादीच्या मुद्यावर लावण्यात आलेले आरोप निराधार आणि खोटे आहेत. आरोप करणाऱ्यांकडे त्याचे पुरावे असल्यास, त्यांनी सात दिवसांत शपथपत्र दाखल करावे, अन्यथा संपूर्ण देशाची माफी मागावी, असा इशारा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना रविवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

एकतर शपथपत्र दाखल करावे लागेल किंवा देशाची माफी मागावी लागेल. तिसरा पर्याय नाही. सात दिवसांच्या आत शपथपत्र मिळाले नाही, तर हे सर्व आरोप निराधार राहतील, असा अर्थ याचा राहील, असे ज्ञानेश राव यांनी सांगितले.

दुहेरी मतदान आणि मतचोरीचे आरोप निवडणूक आयोगाने फेटाळून लावले आणि सर्व भागधारक पारदर्शक पद्धतीने पुनरीक्षण यशस्वी करण्यासाठी काम करीत असल्याचे स्पष्ट केले. राहुल गांधी यांचे वक्तव्य संविधानाचा अपमान करणारे आहे. मतचोरीसारखे शब्द लोकशाही संस्थांना कमकुवत करतात, असे



आयोगाने म्हटले. राजकीय पक्ष फायदा लाटण्यासाठी मतदारांना लक्ष्य करण्यासाठी निवडणूक आयोगाचा वापर करीत असल्याचा आरोप कुमार यांनी केला.

निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून भारतातील मतदारांना लक्ष्य करून राजकारण केले जात असताना, आज निवडणूक आयोग सर्वांना हे स्पष्ट करू इच्छितो की, निवडणूक आयोग निर्भयपणे गरीब, श्रीमंत, वृद्ध, महिला, तरुणांसह सर्व वर्ग आणि सर्व धर्मांच्या सर्व मतदारांसोबत उभा राहिला आहे आणि कोणताही भेदभाव न करता उभा राहील, असे कुमार म्हणाले.

**मतदार भगिनी, माता यांचे व्हिडीओ द्यायचे का?**

मशिन रिडेबल मतदार यादीबाबत बोलायचे तर सुप्रीम कोर्टाने २०१९ मध्येच म्हटले होते की, मतदाराच्या खाजगीपणावर मर्यादा येऊ शकतात. असे काही गैरप्रकार प्रकार झालेले आहेत. मतदार भगिनी, माता यांचे व्हिडीओ शेअर केले गेले पाहिजेत का? मतदार आपल्या आवडत्या नेत्याला मत देतो. लोकसभा निवडणुकीत मतदान प्रक्रियेत मोठी यंत्रणा कार्यरत असते. लाखो कर्मचारी यात असतात. या पारदर्शी प्रक्रियेत कोणी वोट चोरी करू शकतो का? (वृत्तसंस्था)

### पत्रकार परिषदेतील महत्त्वाचे मुद्दे

- वारंवार खोटे सांगितल्यास ते खरे होत नाही.
- निवडणूक आयोग राजकीय पक्षांत भेदभाव कसा करू शकतो?
- आयोग सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असा भेद करीत नाही.
- राजकीय पक्ष बंदूक आयोगाच्या खांद्यावर ठेवून चालवत आहेत.
- कुणी कोणत्याही राजकीय पक्षाचा असो, आयोग आपल्या घटनात्मक कर्तव्यापासून मागे हटणार नाही.

# राजे रघूजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवारीचे आज मुंबईत लोकार्पण

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ ऑगस्ट**

श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार १८ ऑगस्टला मुंबईत दाखल होत असून राज्य शासनातर्फे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जोरदार स्वागत होणार आहे. संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करण्यात येणार आहे.

श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची लंडन येथे असलेली ऐतिहासिक तलवार राज्य शासनाने लिलावात जिंकली. १८ ऑगस्टला ती मुंबईत दाखल होईल. विमानतळ प्राधिकरणाकडून आंतरराष्ट्रीय विमानतळ सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार सकाळी १० वाजता ती स्वीकारतील. त्यानंतर विमानतळावरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन बाईक रॅली काढून चित्ररथावर विराजमान करुन ही तलवार पु. ल. देशपांडे कला अकादमीकडे नेण्यात येईल. सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्य विभाग,पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयातर्फे सेनासाहेब सुभा पराक्रम दर्शन सोहळा होत असून यावेळी या तलवार प्रदर्शनाचे उदघाटन व लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होईल. यावेळी रघूजी भोसले यांचे वंशज श्रीमंत मुधोजी राजे भोसले विशेष उपस्थिती राहणार आहेत.



### ६ दिवस तलवारीचे प्रदर्शन

रघुजीराजे भोसले यांच्या इंग्लंडमधून आलेल्या तलवारीचे व बारा वारसा मानांकित गडकिल्ल्यांच्या माहितीचे प्रदर्शन, दि. १९ ते दि.२५ ऑगस्ट सकाळी ११ ते सायं ७ दरम्यान, पुल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथील कला दालनात सुरू राहणार आहे. सर्वांसाठी ते विनामूल्य खुले राहणार आहे.



# कठुआत ढगफुटी, दरड कोसळून सात ठार

### चार मुलांचा समावेश

**जम्मू, १७ ऑगस्ट**

जम्मू-काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यात रविवारी पहाटेच्या सुरास झालेल्या ढगफुटी आणि दरड कोसळण्याच्या वेगवेगळ्या घटनांमध्ये चार कुटुंबांतील पाच मुलांसह सात सदस्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील राजबागच्या जोड घाटी गावात आणि जंगलोटच्या बागरा गावात ही आपत्ती आली. यामुळे पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाली आणि अनेक सखल भाग पाण्याखाली गेले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, ढगफुटीने जोध घाटी येथे एक पुरुष आणि त्याच्या दोन अल्पवयीन मुलांसह पाच जणांचा मृत्यू झाला. यामुळे गावातील संपर्क तुटला आणि मातीच्या अनेक घरांचे नुकसान झाले, तर जंगलोटच्या बागरा गावात पावसामुळे झालेल्या भूस्खलनात माय-लेकीचा मृत्यू झाला. भारतीय लष्कराच्या तुकडीने ढगफुटीनंतर अनेक कुटुंबांना वाचवले. मृतांची ओळख पटली असून सुरमू दिन, त्यांची मुले फानू आणि शेडू, झुल्फून व ताहू, रेणू देवी आणि राधिका अशी त्यांची नावे आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### श्राविका महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती दिन साजरा

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविदयालय व साने गुरुजी कथाम ाला महाविद्यालय शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रम ाचे प्रमुख वक्ते प्रा.अविनाश मुळकूटकर यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन चरित्र उलगडून सांगितले. प्रास्ताविक प्रा. गणेश लेंगरे यांनी केले तर आभार प्रा. कल्याणप्पा हायगोंडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना कानडे, यांनी केले. कार्यक्रमास प्रा. सोम नाथ राऊत प्रा. ज्योती बांगर, प्रा. प्राजक्ता काळे उपस्थित होते.



### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने ध्वजारोहण

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सोलापूर शहराच्यावतीने माननीय शहर अध्यक्ष सुधीर खरटमल व माजी अध्यक्ष भारत जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सेवादल प्रदेश उपाध्यक्ष सिकंदर गोलंदाज, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, सूर्यकांत शेरखाने, खजिनदार सुनील इंगळे, प्रदेश सरचिटणीस सामाजिक न्यायविभाग प्रवीण वाडे, महिला शहराध्यक्षा सुनीता रोटे, भागीरथी म्हमाणे, लताताई फुटाणे, मनीषा माने, नसीमा शेतसंदी, गौरा कोरे, लता ढेरे, छाया वाघमारे, रेखा सपाटे, सुमित्रा भैरुनगी, धानेश्वरी स्वामी, अनिता ऐवळे, उमा केत, मोनिका सरकार, विद्या शिंदे, कल्पना परांडे, सुनिता दळवी, युवक शहराध्यक्ष सरफराज शेख, युवती शहराध्यक्षा प्रतिक्षा चव्हाण, सुप्रिया लोमटे, शहर उपाध्यक्ष विजय भोईटे, प्रमोद भवाळ, नरेश येमूल, शहर मध्य विधानसभा अध्यक्ष जाविद शिकलकर, शहर उत्तर विधानसभा अध्यक्ष संजय जाबा, प्रदेश सचिव सोशल मीडिया विभाग मिलिंद गोरे, सांस्कृतिक विभाग शहराध्यक्ष राकेश सोनी, सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्ष अजित पात्रे, व्ही.जे.एन.टी. अध्यक्ष मोहम्मद इंडीकर, कार्याध्यक्ष अक्षय जाधव, ओबीसी विभाग शहराध्यक्ष बिरप्पा बंडगर, मुसा अत्तार, तानाजी मसलकर, शहर सरचिटणीस रामप्रसाद शागालोलू, सोपान खांडेकर, मुजीब कुरेशी, नूर नदाफ, सोशल मीडिया शहराध्यक्ष शक्ती कटकधोंड, अल्पसंख्यांक प्रसिद्धी प्रमुख लाडजी नदाफ उपस्थित होते.



### अंजुमन- ए- इस्लाम शाळेत ध्वजारोहण

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

सिद्धेश्वर पेठ परिसरातील अंजुमाने इस्लाम- साबू सिद्दिक इंग्लिश मीडियम स्कूलच्यावतीने देशाच्या स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. प्रथम संस्थेचे लोकल मॅनेजिंग कमिटीचे व्हाईस प्रेसिडेंट हाजी अब्दुल जब्बार शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी को-ऑर्डिनेटर हाजी रियाज पिरजादे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यालयीन अधीक्षक इम्तियाज हंजगीकर, प्रि. मेअराज करजगीकर, एसी मेकॅनिक इन्स्ट्रक्टर रियाज जमादार उपस्थित होते. प्रथम शिक्षिका रुख्सार शेख यांनी स्वातंत्र्य दिनाबद्दलची विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थी अली रजा, अनाया सरमस्त, मुसद्दिक बागवान, अलिशा बागवान, आयेशा शेख, फैजान नालबंद, अरबी बागवान, शाही अल कबीर, असद सरमस्त, सदफ आलमेलकर, आयेशा कुरेशी यांच्यासह आदी विद्यार्थ्यांनी आपले टॅलेंट आणि कलागुण सादर केले. आभार शिक्षिका साधिका कुरेशी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक सानिया कुरेशी, रफत शेख, सुल्ताना मुजावर, रुक्साना लालशेरी, फरीदा शेख, रुखैय्या शेख यांनी प्रयत्न केले.

### क्वांटम उपक्रमांना मदत करण्याची योजना जाहीर

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

सोलापूर : आयबीएम (आयबीएमः एनवायएसई) ने मुंबईत आपले नवीन आयबीएम इंडिया क्लायंट एक्सपिरीयन्स सेंटर उघडल्याची घोषणा केली.या केंद्राचा उद्देश भारतीय कंपन्यांना एआय, हायब्रिड क्लाऊड आणि क्वांटम कम्प्युटिंग यांचा वापर करून व्यवसाय सुधारण्यात मदत करणे हा आहे.यासाठी आयबीएमने महाराष्ट्र सरकार सोबत एक लेटर ऑफ इन्टेन्ट (एलओआय) साइन केले आहे,ज्याद्वारे राज्याच्या क्वांटम उपक्रमांना समर्थन देण्याच्या संधी शोधल्या जातील. एलओआय मध्ये अशा क्षेत्रांचा समावेश आहे जिथे आयबीएम राज्याला माहिती, कौशल्य आणि अनुभव देऊ शकते, जे राज्याला आपला क्वांटम उपक्रम तयार करण्यास मदत करतील,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,एआय, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्सच्या मदतीने आम्ही विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत निर्माण करत आहोत.

# स्वच्छ - सुंदर सोलापूर अभियान वर्षभर राबविण्याचे नियोजन

- नाला भरून घरात पाणी शिरल्याप्रकरणी चौकशीअंती संबंधितांवर कारवाई
- महापालिकेतील आढावा बैठकीनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांची माहिती



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

माझे सोलापूर - स्वच्छ सोलापूर- सुंदर सोलापूर हे अभियान येत्या वर्षभरात राबविण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक लागणारी यंत्रणा उपलब्ध करण्यात येईल. त्याचे नेटके नियोजन महापालिका स्तरावर करण्यात येत आहे. दरम्यान, जलसंपदा विभागाच्या सूचनेनंतर तातडीने कार्यवाही न झाल्याने नाले तुडुंब भरून घराघरात पाणी शिरले याप्रकरणी चौकशीअंती संबंधितांवर कारवाई केली जाईल, अशी असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले आहे.

स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर अभियान वर्षभर राबविण्यात संदर्भात महापालिका इंद्रभुवन हॉलमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक पार पडली. यावेळी आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, तैमूर मुलानी, जिल्हा प्रसासन अधिकारी विना पवार,जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले , सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या आढावा बैठकीनंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.

स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर हे अभियान येत्या वर्षभरात राबविण्यात येणार आहे. त्या दृष्टीने सध्याची शहरात काय परिस्थिती आहे? काय करावे लागेल? प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना आणखी काही करता येईल? या सर्व गोष्टींचा आढावा या बैठकीत घेण्यात आला आहे. दरम्यान या अभियानासंदर्भात बैठकीत महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सविस्तर सादरीकरण केले मात्र त्यावर सम ाधान नाही. आणखी सुधारणा त्यात कराव्या लागतील. त्याबद्दल सूचना केल्या आहेत. त्यावर उपस्थित आमदार ,आयुक्तांनीही आपली मते मांडली. सूचना केल्या आहेत. सोलापूर शहर ३६५ दिवस स्वच्छ व सुंदर दिसावे यासाठी मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांची नियमित स्वच्छता करावी.माझं सोलापूर स्वछ सोलापूर, माझं सोलापूर सुंदर सोलापूर या अनुषंगाने प्रभागनिहाय स्वच्छता मोहीम राबविण्याबाबत ८ दिवसात कृती आराखडा तयार करून सादर करण्याबाबत सूचना दिल्या. या संदर्भात आठ दिवसांनी पुन्हा बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे.

घंटागाड्या आणि आवश्यक यंत्रणे संदर्भात विचारले असता ज्या गोष्टीची कम तरता आहे. काय करावे लागेल? उपलब्ध साधनाचा उपयोग याची माहिती घेतली आहे. शहर स्वच्छतेसाठी सर्व व्यवस्था उभी केली जाईल. एकूणच नियोजन आणि यंत्रणेसंदर्भातील सविस्तर चर्चा झाली, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले. अभियानांतर्गत स्वच्छता कागदावर राहील की वास्तवात येईल या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात पालकमंत्री पुढे म्हणाले, पंढरपूर आषाढी वारीमध्ये स्वच्छता मोहीम नेटक्या पद्धतीने राबवली त्याहीपेक्षा चांगले परिणाम सोलापुरात दिसून येतील. तिथे वेळ आणि यंत्रणा कमी असतानाही मोहीम यशस्वी झाली. सोलापूर एक मर्यादित क्षेत्र आहे. या ठिकाणीही चांगला परिणाम दिसून येईल, असे पालकमंत्री गोरे यांनी यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नव्या ई बसेस संदर्भात या बैठकीत चर्चा झाली नाही. यासंदर्भात म हापालिका आयुक्तांकडून माहिती घेण्यात येईल मात्र यापूर्वी घेण्यात आलेल्या बसेस अयशस्वी का झाल्या ? याचाही विचार करून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

### पाणीपुरवठा योजना प्रभावी राबवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे

सोलापूर शहरातील ८९२ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजना प्रभावी व कार्यक्षम पद्धतीने राबवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे.शहरातील शौचालयांचे दुरुस्ती, नूतनीकरण तसेच नवीन शौचालयांचे बांधकाम याबाबत सविस्तर कृती आराखडा तयार करावा.या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाबाबत सविस्तर चर्चा झाली. नागरिकाभिमुख उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात बाबत पालकमंत्री गोरे यांनी सूचना दिल्या.

### ऑनलाईन वेबसाईट, चॅटबॉट, एफएक्यू बुकलेटचे प्रकाशन

या बैठकीत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी १५० दिवसांचा कार्यक्रम, आपले सरकार, ई-ऑफिस, आरटीएस डॅशबोर्ड यासंदर्भातील सविस्तर सादरीकरण करून माहिती दिली. त्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते महापालिका तक्रार निवारणासाठी ऑनलाईन वेबसाईट, व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट तसेच एफएक्यू बुकलेटचे प्रकाशन करण्यात आले.अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी घनकचरा व्यवस्थापन विभाग व स्वच्छता मोहिमेसंदर्भात सादरीकरण केले.

### नाल्याचे पाणी घरात शिरल्या प्रकरणी आवश्यक ती उपाययोजना केली जाईल

दरम्यान हिप्परगा तलाव भरल्याने पाणी सोडण्यात आले.जलसंपदा विभागाच्या लेखी सूचनेनंतर तातडीने कार्यवाही न झाल्याने नाले तुडुंब भरून घराघरात पाणी शिरले. महापालिका यंत्रणा उशिरा सक्रिय झाली या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात पालकमंत्री गोरे म्हणाले, याप्रकरणी नेमके कोण दोषी आहे ?याची माहिती घेतली जाईल. चौकशीअंती दोषी असतील तर संबंधितांवर कारवाई जाईल. यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करण्यात येईल, असे स्पष्ट केले.



## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन; १,१०० स्पर्धकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

येथील पद्मश्री सुमतीबाई शहा विद्यापीठ श्राविका संकुलात श्री आचार्य शांतीसागर पुण्यतिथी वक्तृत्व स्पर्धा फंड ट्रस्टतर्फे आयोजित विसाव्या शतकातील प्रथमाचार्य आचार्य श्री १०८ शांतीसागरजी म हाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा उद्घाटन पार पडले. स्पर्धेमध्ये शहर व विविध जिल्ह्यातून ११०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

संस्थेच्या विश्वस्त देवई शहा, वक्तृत्व स्पर्धा फंडाचे विश्वस्त प्रा.डॉ. महावीर शास्त्री यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व आचार्य श्री १०८ शांतीसागर म हाराज यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अनंतमती भून, प्राचार्य सुकुमार मोहोळे, मुख्याध्यापिका राखी देशमाने, प्राचार्य विलास लेंगरे, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, ग्रंथपाल रत्नपारखे, जयेश शिरढोणे, कल्पना रमावत, अर्चना अक्कलकोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धा परिसरात सहशिक्षिका देवद्वारे यांनी रेखाटलेल्या रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा फंडाचे सर्व पदाधिकारी, अविनाश मुळकुटकर, वंदना थळवे, अनंत बळळे, प्रदीप डेरे, वृषभ सोनटक्के, अभिजीत पाटील, रोहन शहा, सुकुमार वारे,अनुप कस्तुरे ,अभिनंदन उपाध्ये, सुहास छंचुरे आदींनी परिश्रम घेतले.

## ‘सिंहगड’मध्ये ऑपरेशन सिंदूर नृत्याची धूम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात चिमुकल्यांनी सादर केलेले देशभक्तिपर नृत्य विशेष आकर्षण ठरले. त्यामध्ये ‘ऑपरेशन सिंदूर’ वरील नाट्यमय सादरीकरण प्रेक्षकांच्या टाळ्यांचा वर्षाव मि ळवत कार्यक्रमाचा मुख्य आकर्षणबिंदू ठरला. कार्यक्रमाची सुरुवात कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. यावेळी माजी कुलगुरू तथा सिंहगडचे सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. शिवाजी पवार, पब्लिक स्कूलच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे व डॉ. आर. टी. व्यवहारे, प्रबंधक डॉ. डी. आय. नवले यांची उपस्थिती होती. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते बस वाहतूक चालक व विविध कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.




## शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेचा आज निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १७ ऑगस्ट-**

शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (ढखढ) परीक्षा २०२५ चा निकाल सोमवारी (दि. १८) प्रसिद्ध करण्यात येणार आहे, एकूण १०,७७९ उमेदवारांचा निकाल प्रसिद्ध करण्यात येईल.असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

२ मे २०२५ च्या पत्रान्वये उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सदर व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल एक महिना कालावधीत सादर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या १६ जुलै २०२५ रोजीच्या प्रसिद्धी निवेदनाद्वारे प्रसिद्धी देण्यात आली होती. या परीक्षेस एकूण २,२८,८०८ परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परोक्षस एकूण २,११,३०८ प्रविष्ट झाले होते. त्यापैकी बी.एड. परीक्षेचे १५,७५६ पिअर व डी.एल.एड. परीक्षेचे १,३४२ पिअर असे एकूण १७,०९८ विद्यार्थी/ उमेदवारांनी पिअर म्हणून ऑनलाईन आवेदनपत्र भरले होते. तरी दि. १४ ऑगस्ट २०२५ अखेर बी.एड. परीक्षेचे ९,९५२ व डी.एल.एड. परीक्षेचे ८२७ असे एकूण १०,७७९ पिअर विद्यार्थी / उमेदवारांची माहिती या कार्यालयास प्राप्त झाली आहे. अशा विद्यार्थ्यांचा /उमेदवारांचा निकाल प्रसिद्ध करण्यात येईल.

तथापि ज्या विद्यार्थी/ उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रम ाणपत्र व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल एक महिना कालावधीत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयास अद्यापपर्यंत सादर केलेले नाही, अशा उर्वरित बी.एड. परीक्षेचे ५,८०४ व डी. एल.एड. परीक्षेचे ५१५ अशा एकूण ६,३१९ पिअर विद्यार्थ्यांचा उमेदवारांचा निकाल राखीव ठेवण्यात येईल.

## दयावान ग्रुपच्या दहीहंडीत साकारला वैंकुंठगमन सोहळा

- हजारो सोलापूरकरांची उपस्थिती
- विजयी चौकात झाला परंपरेप्रमाणे दहीहंडीचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

दहीहंडी मिरवणुकीत दयावान ग्रुपने बाळीवेस येथील विजयी चौकात सादर केलेल्या जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज वैंकुंठगमन या हलत्या देखाव्यामुळे वातावरण भक्तिमय झाले. भगवान श्रीकृष्णांची आकर्षक प्रतिमा, प्रत्यक्ष वरुणराजाने केलेले गोविंदा पथकाचे स्वागत अशा वातावरणात वडार समाज गोविंदा पथकाने दयावान ग्रुपची ३० फूट उंचीवरील दहीहंडी फोडली.

दहीहंडीचे यंदाचे १६वे वर्षे होते. प्रारंभी माजी राज्यमंत्री आमदार विजय देशमुख, माजी नगरसेवक अनंत जाधव, संयोजक आणि माजी नगरसेवक विनायक विटकर, अध्यक्ष अशोक अलकुंटे, महेश तापडिया, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, म ाजी सभागृह नेते शिवानंद पाटील, प्रमोद मोरे, डिके सामाजिक संस्थेचे दशरथ कसबे, अमोल झाडगे, योगेश कुंदूर आदींच्या प्रमुख उपस्थितीत दहीहंडीचे पूजन करण्यात आले. प्रारंभी वडार समाज या पथकाने सलामी दिली. यानंतर या पथकाने दहीहंडी फोडताच उपस्थित सोलापूरकरांनी एकच जल्लोष केला. यावेळी दयावान ग्रुपने सादर केलेल्या वैंकुंठगमनप्रसंगी पुष्पक विमानात बसलेले जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज या हलत्या देखाव्याचे उपस्थित हजारो सोलापूरकरांनी कौतुक केले. यावेळी या देखाव्याचे छायाचित्र काढण्यासाठी सोलापूरकरांनी मोठी गर्दी केली होती.

याप्रसंगी प्रविण भोसले, देवीदास इरकल, गणेश कंदलगावकर, नागेश अलकुंटे, वैभव मुद्दे, संकेत कुलकर्णी, उमेश इरकल, सचिन अलकुंटे, योगेश अलकुंटे, विशाल शिंगे, अनिकेत विटकर, सुशीलकुमार व्यास, कुम ार यमपुरे, शिवकुमार अलकुंटे, शिवाजी हक्के, विनोद बंडगर, म नोज सुरवसे, आशिष अलकुंटे, आदित्य शिंगाडे, पंकज विटकर, प्रशांत धुम्मा आदी उपस्थित होते.






## राष्ट्रवादीतर्फे अ‍ॅड. राजपूत, माजी उपमहापौर घाडगे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनानिमित्त शहर सोशल मिडीया अध्यक्ष वैभव गंगणे, कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे यांच्या वतीने जिल्हा मुख्य सरकारी विधिज्ञ अ‍ॅड. प्रदीपसिंग राजपूत यांना कायद्यातील डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी पीएचडी मिळाल्याबद्दल तसेच आणीबाणी काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष केला व हुकूमशाहीचा धाढसाने कारावास स्वीकारल्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून कै. मुरलीधर घाडगे पैलवान यांच्या पत्नी माजी उपम हापौर सुषमा घाडगे यांचा गौरव करण्यात आला. त्यानिमित्त त्यांचा सन्मान राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या हस्ते फेटा पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. याप्रसंगी माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी श्रीकांत घाडगे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, महिला आघाडी अध्यक्ष संगीता जोगधनकर, महिला आघाडी पदाधिकारी उमादेवी झाडबुके, शकील शेख, मनोज शेरला, आशुतोष नाटकर, अनिल बनसोडे , रुपेश भोसले, इरफान शेख, रमिज कारभारी ओबीसी सेल विभाग कार्याध्यक्ष आयुब शेख, मौलाभाई, श्रीकांत वाघमारे, प्रदीप भालशंकर, अजिंक्य उप्पीन, यशराज डोळसे, निशांत तारानाईक, शामराव गांगर्डे, प्रकाश झाडबुके उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# रशियाचे युक्रेनवर हवाई हल्ले

**चर्चेच्या काही तासांतच ८५ ड्रोन** | **बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी मारा** | **दोन गावे ताब्यात घेतल्याचा दावा** | **५० पेक्षा अधिक नागरिक जखमी**

◆ **कीव, १७ ऑगस्ट**

अमेरिकेच्या अलास्का येथे पुतिन आणि ट्रम्प भेटीनंतर काही तासातच रशियाने युक्रेनवर शनिवारी जोरदार हवाई हल्ले केले. यात अनेक इमारती आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. ८५ शाहेद प्रकारचे ड्रोन आणि इस्कंदर-एम बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने जवळपास सहा तास हल्ले करण्यात आले. रशियाच्या हल्ल्याने ट्रकम्प यांच्या मध्यस्थीने युक्रेनसोबत सुरू असलेल्या शस्त्रबंदी कराराच्या वाटाघाटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

युक्रेनच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, रशियाच्या हवाई दलाने शनिवारी राजधानी कीव शहरालगतच्या भागावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी मारा केला. रशियाने डागलेल्या ८५ पैकी ६१ ड्रोन हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच उधळले. हवाई हल्ल्यात अनेक निवासी इमारती आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाले असून यात ५० नागरिक जखमी आहे. त्याचवेळी रशियाच्या लष्कराने युक्रेनच्या दोन गावांवर ताबा मिळविल्याचा दावा केला आहे. दरम्यान युक्रेनसोबत शांतता करार करण्यासाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात अलास्का येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर काही तासांतच हल्ला झाल्याने पुढील चर्चेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा हल्ला ट्रम्प यांना आव्हान असल्याचे मानले जात आहे. (वृत्तसंस्था)

### पूर्व-दक्षिणमधील अनेक भागांवर नियंत्रण

फेब्रुवारी २०२२ मध्ये सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धाला आता तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. या काळात १२ हजार लोकांचा मृत्यू झाला असून, लाखो नागरिकांना स्थलांतर करावे लागले आहे. रशियाने पूर्व आणि दक्षिण युक्रेनमधील मोठ्या भूभागांवर नियंत्रण मिळविले आहे.



### डोनेस्तकवर पुतिन यांना हवा ताबा

रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी अलास्कामध्ये ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान युद्ध संपवण्यासाठी युक्रेनने डोनेस्तकमधून आपले सैन्य मागे घ्यावे अशी अट ठेवली आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की आणि युरोपीय नेत्यांना फोन करून पुतिन यांच्या मागणीची माहिती दिली. पुतिन यांना या प्रदेशावर पूर्ण नियंत्रण हवे आहे. सध्या परिस्थितीत रशियाचे डोनेस्तकच्या ७० टक्के भागावर नियंत्रण आहे. हा भाग कोळसा खाणी आणि जड उद्योगांसाठी ओळखला जातो.



### तिन्ही नेत्यांची शुक्रवारी संयुक्त बैठक

ट्रम्प यांनी शनिवारी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, २२ ऑगस्टला पुतिन आणि झेलेन्स्की यांच्यासोबत ते त्रिपक्षीय बैठक घेणार आहे. यावेळी दोन्ही नेते युद्धबंदीवर चर्चा करणार आहे. तत्पूर्वी सोमवारी १८ ऑगस्टला झेलेन्स्की यांच्यासोबत भेट घेणार असून पुतिन यांच्यासोबत झालेल्या चर्चेची त्यांना माहिती देणार आहे. दरम्यान जर्मन चांसलर फ्रेडरिक मर्झ यांनी शनिवारी सांगितले की, सोमवारी झेलेन्स्की आणि ट्रम्प यांच्यातील बैठकीनंतर त्रिपक्षीय बैठक होण्याची अपेक्षा आहे.

# भारतावर टॅरिफ लादणे मूर्खपणाचे

## अमेरिकन अर्थतज्ज्ञांनी ट्रम्प यांना सुनावले

◆ **वॉशिंग्टन, १७ ऑगस्ट**

भारतावर आयात शुल्क लादण्याचा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय मूर्खपणाचा आहे. यातून अमेरिकेला कोणताही फायदा होणार नाही, अशा शब्दात प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ जेफ्री सॅक्स यांनी म्हटले आहे.



एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सॅक्स म्हणाले, की अमेरिका इतक्या काळापासून आपल्या वर्चस्ववादी शक्तीचा वापर करत आहे की त्यांना वाटते की ते जगाच्या प्रत्येक भागावर राज्य करू शकतात. पण हा त्यांचा भ्रम आहे. ट्रम्प गोंधळलेले आहे आणि परिस्थिती सावरण्यात अपयशी ठरत आहे. भारतावर टॅरिफ लादणे कोणत्याही मानकांनुसार मूर्खपणाचे होते. ट्रम्प ब्रिक्स गटाचा द्वेष करतात कारण हे देश अमेरिकेसमोर उभे राहतात. टॅरिफ अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी विनाशकारी आहे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करते. ट्रम्प यांचा निर्णय राजकीय व्यवस्थेचे पतन आहे. अमेरिकेत, ट्रम्पची धोरणे अपयशी ठरतील. भारताने अमेरिकेवर विश्वास ठेवू नये, जागतिक मूल्य साखळीत भारत चीनची जागा घेऊ शकते, असा विश्वास ठेवू नये. आजच्या घडीला चीन, रशिया आणि ब्राझील हे भारताचे भागीदार आहे. (वृत्तसंस्था)

### अमेरिकन शिष्टमंडळाचा भारत दौरा रद्द

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराच्या चर्चेला आता खीळ बसली आहे. चर्चेच्या पाच फेऱ्या झाल्यानंतर सहाव्या फेरीसाठी चर्चा करण्यासाठी भारतात येणाऱ्या अमेरिकन शिष्टमंडळाचा दौरा रद्द करण्यात आला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय उत्पादनांवर ५० टक्के टॅरिफ लादण्याची घोषणा केली. जागतिक स्तरावर कोणत्याही देशांपेक्षा हा सर्वाधिक टॅरिफ आहे. यानंतर दोन्ही देशांकडून व्यापाराच्या वाटाघाटी थांबविण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

### कृषी क्षेत्रातील अटीने करार रखडला

कृषी क्षेत्रात अमेरिकेला प्रवेश देण्यास भारताने नकार दिला आहे. शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी भारत दीर्घकाळापासून या भूमिकेवर ठाम आहे. मात्र ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिका त्यांच्या कृषी उत्पादनांसाठी भारतीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी प्रयत्न करत आहे. अशातच रशिया-युक्रेन युद्धबंदीवर ठोस तोडगा निघू शकला नाही, त्यामुळे भारतावर लादलेले टॅरिफ कमी होण्याची अनिश्चितता कायम आहे.

# प्रियकराचा पार्सल बॉम्ब टाकण्याचा कट उधळला

## स्फोटक तस्करी रॅकेटचा पर्दाफाश

◆ **खैरागड, १७ ऑगस्ट**

छत्तीसगडमधील एका २० वर्षीय इलेक्ट्रिशियनने म्युझिक सिस्टम स्पीकरमध्ये एक इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लोझिव्ह डिव्हाइस (आयईडी) बसवले आणि ते एका महिलेच्या पतीला भेट म्हणून पाठवले, असे पोलिसांनी रविवारी सांगितले.

आरोपीने ऑनलाइन ट्युटोरियल वापरून आयईडी तयार केले, प्लग इन केल्यानंतर स्फोट होण्यासाठी ते डिझाइन केले. त्याच्या गुगल सर्च इतिहासात पोलिसांनी पकडल्याशिवाय बॉम्ब वापरून एखाद्या व्यक्तीला कसे मारायचे हे दाखवले आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

आरोपीला अटक करून, खैरागड-चुईखादन-गंडाई जिल्ह्यातील पोलिसांनी केवळ नियोजित हत्येचा कट उधळला नाही, तर आरोपींना जिलेटिनच्या काड्या पुरवणाऱ्या स्फोटक तस्करी रॅकेटचाही पर्दाफाश केल्याचे पोलिसांनी सांगितले. ताज्या प्रकरणात, मुख्य आरोपी विनय वर्मा आणि इतर सहा जणांना अटक करण्यात आली आहे, असे खैरागड-चुईखदान-गंडाई जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक (एसपी) लक्ष्य शर्मा यांनी सांगितले. इतरांची ओळख परमेश्वर वर्मा (२५), गोपाल वर्मा (२२), घासीराम वर्मा (४६), दिलीप धीमर (३८), गोपाल खेळवार आणि खिलेश वर्मा (१९) अशी झाली आहे. एप्रिल २०२३ मध्ये अशाच एका प्रकरणात, एका नवविवाहित पुरूषाचा आणि त्याच्या मोठ्या भावाचा भेटवस्तू म्हणून मिळालेल्या होम थिएटर म्युझिक सिस्टमचा स्फोट होऊन मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

# इस्रायली नौदलाचा येमेनवर भीषण हल्ला

## हुथीचे अड्डे उद्ध्वस्त, वीज प्रकल्पाचे केंद्र जमीनदोस्त

◆ **सना, १७ ऑगस्ट**

इस्रायली नौदलाने रविवारी पहाटे येमेनमधील हुथीच्या नियंत्रणात असलेल्या भागात जोरदार हल्ले केले. यात हुथींचे अनेक अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले, तर वीज प्रकल्पाचे केंद्र पूर्णतः जमीनदोस्त झाले. या हल्ल्यात हुथींचे शंभरपेक्षा अधिक सदस्य ठार झाल्याचा दावा इस्रायलने केला, मात्र हुथींकडून मृत्यूची पुष्टी करण्यात आलेली नाही.



इस्रायलच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राजधानी सनाच्या दक्षिणेकडील भागाला लक्ष्य करीत इस्रायली नौदलाने हुथींच्या अड्ड्यांवर क्षेपणास्त्राने हल्ले केले. यात या भागातील वीजपुरवठा करणारे हाजिफ पॉवर स्टेशन जमीनदोस्त झाले. याशिवाय या भागातील अनेक इमारतींना आग लागली. हल्ल्यात वीज प्रकल्पातील कामगारांसह हुथीचे शंभरपेक्षा अधिक सदस्य ठार झाल्याचे सांगण्यात आले. दरम्यान इस्रायली नौदलाने येमेनवर हल्ला करण्याची ही दुसरी वेळ आहे. जूनच्या सुरुवातीला हुथींच्या नियंत्रणाखालील होदेइदा बंदराला लक्ष्य करण्यात आले होते. गेल्या अनेक महिन्यांपासून हुथी इस्रायलवर हल्ला करत आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायल देखील हुथींवर हल्ले करीत आहे. (वृत्तसंस्था)

## इंडिगो विमानाचा मागचा भाग धावपट्टीवर आदळला

◆ **मुंबई, १७ ऑगस्ट**

बँकॉकहून मुंबईला येणारे इंडिगो एअरबस ए ३२१ या विमानाचा मागचा भाग उड्डाणादरम्यान धावपट्टीवर आदळला. ही घटना शनिवारी पहाटे ३.०६ वाजता धावपट्टी २७ वर घडली. खराब हवामान आणि मुसळधार पावसात विमानाचा खालचा भाग धावपट्टीवर आदळला. या घटनेत विमानातील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत.

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, 'आम्ही या प्रकरणाची औपचारिक चौकशी करू आणि लवकरच आदेश जारी केला जाईल. घटनेनंतर विमानाला ग्राउंड करण्यात आले आहे आणि संपूर्ण चौकशी आणि दुरुस्तीनंतरच पुन्हा उड्डाण करण्याची परवानगी दिली जाणार आहे. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की ही घटना खराब हवामानामुळे घडली. याबाबत इंडिगोने एक निवेदन जारी केले. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा ही प्राथमिकता आहे आणि कंपनी सर्व आवश्यक तपासणी आणि दुरुस्ती केल्यानंतरच विमान पुन्हा सेवेत आणेल, असे यामध्ये म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# काँगोमध्ये दहशतवादी हल्ला, ३० जणांचा मृत्यू

## उत्तर किवू प्रदेशातून १०० नागरिकांचे अपहरण

◆ **किन्शासा, १७ ऑगस्ट**

काँगोच्या उत्तर किवू प्रांतातील बापेरे गावावर दहशतवाद्यांनी धारदार शस्त्राने हल्ला केला, ज्यामध्ये ३० जणांचा मृत्यू झाला आणि सुमारे १०० जणांचे अपहरण करण्यात आले. या हल्ल्यामागे एडीएफ संघटना असल्याचा संशय आहे. सैन्य आणि स्थानिक प्रशासनाने या घटनेची पुष्टी केली आहे.

लुबेरो प्रदेशाचे लष्करी प्रशासक कर्नल अलेन किव्वा यांनी सांगितले, की दहशतवाद्यांनी धारदार शस्त्रांनी लोकांवर हल्ला केला आणि अनेक घरेही जाळण्यात आली. नागरी समाज संघटनेचे नेते सॅम्युअल कहेनी म्हणाले की, बहुतांश लोकांची हत्या धारदार शस्त्रांनी करण्यात आली. इस्लामिक स्टेटशी संबंधित अलाइड डेमोक्रॅटिक फोर्स अर्थात् एडीएफ या हल्ल्यासाठी जबाबदार असल्याचा संशय आहे. (वृत्तसंस्था)

# दिवाळीपूर्वीच जीएसटीत सुधारणा




**द्वारका एक्सप्रेसवे दिल्ली खंड आणि अर्बन एक्स्टेंशन रोड २चे लोकार्पण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी. यावेळी उपस्थित केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी व मान्यवर**

## पंतप्रधान मोदींची घोषणा

## सामान्यांना मिळणार दिलासा

**नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

सणासुदीच्या काळात स्वदेशी वस्तुंचाच आग्रह धरा, जेणेकरुन कामगार आणि उत्पादकांचा फायदा होईल आणि देशातील पैसा देशातच राहील, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) मधील सुधारणा दिवाळीपर्यंत लागू करत देशातील नागरिकांना डबल बोनस देण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. राजधानी दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात ११ हजार कोटींच्या द्वारका एक्स्प्रेसवे दिल्ली खंड आणि अर्बन एक्स्टेंशन रोड २ अशा दोन महत्वपूर्ण राष्ट्रीय महामार्ग योजनांचे आज लोकार्पण केल्यानंतर आयोजित जाहीरसभेत मोदी बोलत होते. यावेळी केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग राज्यमंत्रीद्वय हर्ष मल्होत्रा आणि अजय टम्टा, दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही.के. सक्सेना, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता तसेच हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी उपस्थित होते. यावेळी सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले, आमच्यासाठी सुधारणा म्हणजे सुशासनाच्या प्रगतीचे प्रतीक आहे. आवश्यक अन्नपदार्थांवर शून्य, दैनंदिन वापराच्या वस्तूंवर ५ टक्के, मानक वस्तूंसाठी १२ टक्के, इलेक्ट्रॉनिक व सेवांसाठी १८ टक्के, लक्झरी व हानिकारक वस्तूंवर २८ टक्के अशी तरतूद केली जाणार आहे. जीएसटी परिषदेने मान्यता दिल्यास जीएसटीत केवळ दोन स्लॅब असेल. आज लोकार्पण केलेल्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील योजना दिल्ली, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र तसेच हरयाणातील लोकांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. असे स्पष्ट करत केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, या योजनांमुळे राष्ट्रीय राजधानी क्षेत्राची गतिशीलता वाढणार असून पर्यावरणीय योजना आणि आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. द्वारका एक्स्प्रेसवे हा फक्त राष्ट्रीय महामार्ग नाही तर रस्ते अभियांत्रिकी आणि डिझाईन क्षेत्रातील चमत्कार आहे. ५६०० कोटी रुपयांतून ६६ किमी लांबीचा अर्बन एक्स्टेंशन रोड दोन योजना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ (दिल्ली पानीपत), राष्ट्रीय महामार्ग ९ (दिल्ली रोहतक) आणि राष्ट्रीय महामार्ग २४८ बीबी यांच्यात उत्कृष्ट संपर्क आणि समन्वय स्थापन करणार आहे.

# सरकार पाडूनही वसंतदादांनीच सुचवले मुख्यमंत्रिपदासाठी माझे नाव

## मोठ्या मनाच्या नेतृत्वाची शरद पवारांनी दिली कबुली

◆ **पुणे, १७ ऑगस्ट**

वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वातील सरकार १९७८ मध्ये पाडले होते. मात्र, दहा वर्षांनी त्यांनीच माझे नाव मुख्यमंत्रिपदासाठी सुचवले होते. त्यावेळी काँग्रेसकडे अशा प्रकारचे मोठ्या मनाचे नेतृत्व होते, असे विरोधी पक्षात दीर्घकाळ काम करणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनी येथे एका कार्यक्रमात सांगितले.



१९९९ मध्ये शरद पवार यांनी काँग्रेसशी संबंध तोडले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सहस्थापना केली. जुलै २०२३ मध्ये शरद पवार यांचे पुतणे अजित पवार तत्कालीन शिवसेना-भाजपा युती सरकारमध्ये सामील झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली.

आणिबाणीनंतर हा जुना इंदिरा काँग्रेस पक्ष आणि स्वर्णसिंह काँग्रेसमध्ये विभागला गेला. त्यावेळी मी माझ्या मार्गदर्शक यशवंतराव चव्हाण यांच्यासोबत स्वर्णसिंह काँग्रेसमध्ये होतो. परंतु, त्यानंतर झालेल्या निवडणुकीत दोन्ही पक्षांना स्पष्ट बहुमत मिळाले नाही, असे शरद पवार यांनी सांगितले. मी हे का सांगत आहे, असा प्रश्न उपस्थित करताना, दहा वर्षांनंतर आम्ही पुन्हा एकत्र आलो, असे शरद पवार म्हणाले. पुढचा मुख्यमंत्री कोण, हे ठरवण्यासाठी बैठक बोलवण्यात आली. त्यात रामराव आदिक, शिवाजीराव निलंगेकर यांच्या नावावर चर्चा झाली. पण, दादांनी त्यावेळी सांगितले की, आता चर्चा नको. आपल्याला पक्षाची पुनर्बांधणी करायची आहे. शरद त्याचे नेतृत्व करेल, अशी आठवण पवार यांनी सांगितली. कल्पना करा, ज्या नेत्याचे सरकार मी पाडले, त्याने ते सर्व बाजूला ठेवून विचारसरणीसाठी एकता निवडली. काँग्रेसमध्ये अशा प्रकारच्या मोठ्या मनाचे नेतृत्व होते, असे शरद पवार म्हणाले. (वृत्तसंस्था)

### ...म्हणून पाडले सरकार

निवडणुकीनंतर आम्ही एकत्र आलो आणि वसंतदादांना मुख्यमंत्री बनवले. तथापि, आमच्यापैकी अनेक तरुण कार्यकर्त्यांना काँग्रेस (आय) विरोधात राग होता. कारण, आम्ही चव्हाण साहेबांशी जुळलो होतो. त्यामुळे एक दरी निर्माण झाली. दादांनी ती भरून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, आम्ही त्याला विरोध केला. मी प्रमुख विरोधकांपैकी एक होतो. परिणामी, आम्ही सरकार पाडण्याचा निर्णय घेतला आणि आम्ही ते केले. मी मुख्यमंत्री झालो, असे शरद पवार यांनी सांगितले.

# बिहारमध्ये मत चोरीचा डाव उधळून लावणार

## मतदार अधिकार यात्रेतून राहुल गांधींचा इशारा

◆ **पाटणा, १७ ऑगस्ट**

लोकसभा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत झालेल्या मत चोरीचे कारस्थान आम्ही उघड केले. निवडणूक आयोग भाजपासोबत संगमत करून निवडणूक चोरण्याचे षडयंत्र आखत आहे. बिहार निवडणुकीत मत चोरीचा डाव उधळून लावू ,असा इशारा काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी यांनी रविवारी दिला.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर काँग्रेसने रविवारी मतदार अधिकार यात्रा सुरू केली. या अंतर्गत २० जिल्ह्यातून १३०० किमीचा प्रवास करून नागरिकांना निवडणुकीत होणाऱ्या फसवणुकीसंदर्भात माहिती दिली जाणार आहे. सासाराम येथून सुरू झालेल्या यात्रेच्या शुभारंभप्रसंगी जनसभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, बिहारमध्ये पुनरीक्षण प्रक्रियेतून आयोगाकडून निवडणूक चोरण्याचे षडयंत्र रचले जात आहे, मात्र लोकसभा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत घडलेल्या प्रकाराची पुनरावृत्ती बिहारमध्ये होवू देणार नाही. बिहारमध्येही ते मतदारांना विभागून मतांची चोरी करण्याची तयारी करत आहेत. मात्र, आम्ही त्यांना हे करू देणार नाही. (वृत्तसंस्था)

## चीनचे परराष्ट्र मंत्री उद्या भारत दौऱ्यावर

◆ **नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्या निमंत्रणावरून चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिटब्युरो सदस्य आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी सोमवारी १८ ऑगस्ट रोजी दोन दिवसाच्या भारत दौऱ्यावर येणार असल्याची माहिती भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनातून दिली आहे. यावेळी वांग यी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांची द्विपक्षीय बैठक होणार आहे. त्यांचा दौरा हा भारत-चीन सीमेच्या प्रश्नावर दोन्ही देशांच्या विशेष प्रतिनिधींमधील २४ व्या फेरीच्या बैठकीचा भाग असेल.

# निसार पृथ्वीचे निरीक्षण करण्यासाठी सज्ज

## १२ मीटरचा रडार अँटेना उघडला, नैसर्गिक आपत्तींची माहिती मिळणार

◆ **श्रीहरिकोटा, १७ ऑगस्ट**

नासा आणि इस्रोच्या संयुक्त मोहिमेतून प्रक्षेपित करण्यात आलेला निसार उपग्रह सक्रिय झाला आहे. पृथ्वीपासून ७४३ किमी उंचीवर असलेल्या या उपग्रहाचा १२ मीटरचा रडार अँटेना अवकाशात यशस्वीरित्या उघडला आहे.जो पृथ्वीवरील बदलांचे मोजमाप आणि निरीक्षण करणार आहे.

३० जुलै रोजी श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित केलेला हा उपग्रह



हिमनद्या, भूकंप आणि जंगलांवर लक्ष ठेवेल. या मोहिमेतून या वर्षाच्या अखेरीस डेटा मिळेल, जो आपत्ती आणि अन्न सुरक्षेत मदत करेल. पृथ्वीच्या बदलत्या पृष्ठभागाचा अचूक अभ्यास करण्यासाठी निसार उपग्रहाचे प्रक्षेपण करण्यात आले. उपग्रह ९७ मिनिटांत पृथ्वीभोवती प्रदक्षिणा पूर्ण करीत असून आगामी १२ दिवसात ११७३ प्रदक्षिणा पूर्ण करून तो पृथ्वीच्या प्रत्येक भागाचा नकाशा तयार करणार आहे. ढग, घनदाट जंगले, धूर आणि अंधारातही तो कार्यक्षम असेल. निसारकडून मिळालेल्या डेटाच्या आधारे शास्त्रज्ञ हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती, पर्यावरणाचा अधिक चांगल्याप्रकारे अभ्यास करू शकणार आहे. (वृत्तसंस्था)

### अँटेनाचे वजन ६४ किलो

नासाच्या जेट प्रोपल्शन लॅबोरेटरीचे प्रोजेक्ट मॅनेजर फिल बरेला म्हणाले की, हा नासाचा आतापर्यंतचा सर्वात मोठा अँटेना रिफ्लेक्टर आहे. तो अंतराळात यशस्वीरित्या उघडणे हे वर्षानुवर्षे केलेल्या डिझाइन, चाचणी आणि सहकार्याचे परिणाम आहे. या अँटेनाचे वजन ६४ किलोग्रॅम आहे. ते १२३ कंपोझिट स्ट्रट्स आणि सोन्याचा मुलामा असलेल्या जाळीने बनलेले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# आता घुसखोरांची गय नाही

गेल्या जून महिन्यात बलाढ्य समजल्या जाणाऱ्या अमेरिकेतील रस्त्यांवर जळलेल्या वाहनांचा खच पडला होता. न्यू यॉर्क, लॉस एन्जेलिस, कॅलिफोर्नियामध्ये निर्वासितांनी धुमाकूळ घातला होता. अमेरिकेतील निर्वासितांच्या संदर्भात डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी निर्वासितांनी अमेरिकेला वेठीस धरले होते. बेकायदेशीर निर्वासितांचा हा प्रश्न आता अमेरिकेसह संपूर्ण युरोपला भेडसावत आहे. यातील बहुतांश निर्वासित हे अवैध मार्गाने शिरलेले घुसखोर आहेत. अमेरिका, युरोपप्रमाणे भारतही गेल्या ५० वर्षांपासून घुसखोरीचा सामना करीत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपली लोकसंख्या होती केवळ ३५ कोटींच्या आसपास. आजचा आकडा आहे १४५ कोटी ६० लाख. म्हणजे आपल्याकडे असलेली नैसर्गिक संसाधने तेवढीच. पण खाणारी तोंडे बेसुमार वाढली. स्वातंत्र्यानंतर गेल्या ७८ वर्षांमध्ये लोकसंख्येत सुमारे ११० कोटींनी वाढ झाली. या लोकसंख्येत घुसखोरांचा आकडा मोठा आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ५४ कोटी ८० लाखांच्या आसपास होती. पुढच्या दहा वर्षांत १९८१ ला हा आकडा ६८ कोटी ५१ लाख एवढा झाला. अर्थात दहा वर्षांमध्ये लोकसंख्येत १४ कोटींनी वाढ झाली. १९७१ मध्ये बांगलादेशची निर्मिती झाली. या निर्मिती प्रक्रियेत भारताचा हात असल्याचे गोडवे गायिले जात असले तरी याचा सर्वांत मोठा फटका आपल्यालाच बसला आणि अजूनही बसतो आहे. पाकिस्तानचा लष्करी हुकूमशहा जनरल याह्या खान यांच्या सैन्याने बंगाली नागरिकांवर अनन्वित अत्याचार केल्याने लक्षावधी बंगाली भारताच्या दिशेने पळत सुटले. आपणही मोठ्या उदार मनाने या बांगलादेशींना आश्रय दिला. त्याचा परिणाम असा झाला की आज आसाममधील एकूण ३५ पैकी ११ जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत. १९७१ मध्ये बांगलादेशी घुसखोर या भागात घुसले आणि त्यांनी स्थानिकांच्या जमिनी बळकावत, वनक्षेत्रावर ताबा मिळवित आपले प्रभुत्व निर्माण केले. याच जिल्ह्यांमधून लाखोंच्या संख्येने घुसखोर उर्वरित भारतात घुसत आहेत. पश्चिम बंगालचीही स्थिती यापेक्षा वेगळी नाही. बांगलादेशला लागून असलेल्या मालदा, मुर्शिदाबाद आणि उत्तर दिनाजपूर हे जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत तर बिरभू, दक्षिण २४ परगणा या जिल्ह्यांमधील मुस्लिमांची संख्या ३० टक्क्यांच्या वर आहे. आणि पाच जिल्हे असे आहेत की तेथे मुस्लिमांचे प्रमाण २५ टक्क्यांच्या वर आहे. ही आकडेवारी दहा वर्षांपूर्वीची आहे. कदाचित आसाम आणि पश्चिम बंगालमधील आणखी काही जिल्ह्यांमध्ये हिंदू अल्पसंख्यक झाले असतील. झारखंड आणि बिहारमध्येही मुस्लिमांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यामुळे मुस्लिमांच्या वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणले नाही तर झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल ही राज्ये हिंदूंच्या हातून गेलेच समजा. असे झाले तर बांगलादेशसह या तीन राज्यांचा एक मोठा समूह मुस्लिमबहुल होऊन आणखी एका फाळणीच्या दिशेने वाटचाल सुरू झाल्यास नवल वाटायला नको. एका अंदाजानुसार भारतात सध्या तीन कोटींपेक्षा जास्त घुसखोर वास्तव्यास आहेत. घुसखोरीच्या समस्येकडे काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने कमालीचे दुर्लक्ष केले आहे. नव्हे अवैध घुसखोरीला प्रोत्साहन दिले. केवळ मुस्लिम मते मिळवून त्यांच्या बळावर सत्ता संपादन करण्यासाठी काँग्रेससह डावे पक्ष आणि सपा, तृणमूल काँग्रेस, राजद, डीएमके, राष्ट्रवादी काँग्रेस (एकत्रित) आदी प्रादेशिक पक्षांनी मुस्लिमांना कुरवाळण्याचे धोरण स्वीकारून देशासमोर फार मोठे आव्हान उभे केले आहे. देशासमोर येणाऱ्या दोन दशकांनंतर लोकसंख्येच्या प्रमाणात होणाऱ्या बदलामुळे कोणते संकट उभे ठाकेल याची जाणीव झाल्याने लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांचा घुसखोरीचा मुद्दा उपस्थित केला. देशातील लोकसंख्येचे प्रमाण हेतुपुरस्सर बदलले जात असून याचा देशावर विपरीत परिणाम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या आव्हानाला तोंड देण्यासाठी उच्चस्तरीय लोकसंख्याशास्त्रीय मिशनची त्यांनी घोषणा केली. आतापर्यंत कोणत्याही पंतप्रधानाने घुसखोरीच्या मुद्याला लाल किल्ल्यावरून संबोधित करताना हात घातला नव्हता. घुसखोरी राष्ट्रासमोरील मोठे आव्हान आहे. देशाच्या सीमावर्ती भागात बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांना वसविल्यानंतर स्थानिकांच्या जमिनी लाटून अथवा शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून बस्तान बसविण्याचे षडयंत्र रचले जात आहे. २००४ ते २०१३ या काळात उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालच्या सीमेवर मशिदी आणि मदरशांचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपल्या राज्यातील सीमेवरील धार्मिकस्थळे हटविण्याची धडक मोहीम सुरू केली असली तरी बिहारातील राजकीय अपरिहार्यतेमुळे घुसखोरीच्या मुद्याला हात घातला गेला नाही. पश्चिम बंगालमध्ये तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी घुसखोरांचे समर्थक आहेत. अवैध घुसखोरीसाठी केंद्र सरकार जबाबदार असल्याचे सांगत कारवाई करण्यास नकार देतात. संपूर्ण भारतात घुसलेल्या बांगलादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांना बनावट आधार, पासपोर्ट, वाहन परवाना, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र तयार करून देण्याचे काम पश्चिम बंगालमधूनच केले जाते.

वर्षभरापूर्वी झारखंडमध्ये झालेली विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्षाने घुसखोरीच्या मुद्यावरच लढविली होती. संथालसह अन्य आदिवासी भागातील भोळ्याभाबड्या आदिवासींना फसवून त्यांच्या जमिनी बळकावण्याचे कारस्थान जोरात सुरू आहे. एवढेच नव्हे तर आदिवासी मुलींशी विवाह करून त्यांचे धर्मपरिवर्तन करण्याचे कुटिल कारस्थान रचले गेले आणि त्याला गोरगरीब आदिवासी बळी पडत आहेत. दुर्दैवाने भारतीय जनता पक्षाने उपस्थित केलेला घुसखोरीचा आणि आदिवासींच्या फसवणुकीचा मुद्दा मतदारांच्या गळी उतरला नाही. युद्ध करून भारतावर कब्जा करणे शक्य नसल्याचे परकीय आक्रमकांना समजले होते. त्यामुळे त्यांनी हिंदूंना बाटवा, नासवा आणि नष्ट करा या त्रिसूत्रीचा अवलंब करून भारतावर शेकडो वर्षे राज्य केले. विशेष म्हणजे जो भाग मागासलेला आहे त्या भागावरच मुस्लिम आणि ख्रिस्ती धर्मप्रचारक लक्ष केंद्रित करतात. ईशान्य भारतातील मणिपूर वगळता इतर राज्यांमध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात धर्मपरिवर्तन केले जात आहे. ख्रिस्ती धर्मप्रचारक आदिवासींना तर जिहादी दलितांना लक्ष्य करीत आहेत. काँग्रेसची सत्ता असताना देवभूमी उत्तराखंडमध्ये लोकसंख्येची रचना बदलण्यासाठी लॅण्ड जिहाद पुकारण्यात आले. वनविभागाच्या जमिनीवर कबरी, मजारी उभारत जागा ताब्यात घेण्याचे भयंकर षडयंत्र आखण्यात आले होते. पण, भाजपाचे सरकार आल्यानंतर अवैध मजारी हटविण्यात आल्या. काँग्रेसची सत्ता असल्यास प्रशासनाकडून हमखास सहकार्य मिळेल, याची खात्री असल्याने जिहादींची हिंमत वाढली होती. ज्या राज्यांमध्ये भाजपाची सरकारे आहेत तेथे आता लॅण्ड जिहादला काही प्रमाणात आळा बसलेला आहे. स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करून जिहादींना इशारा दिला आहे. घुसखोरी रोखण्यात पश्चिम बंगाल सरकारचा मोठा अडथळा आहे. राज्य सरकार सहकार्य करीत नसल्याने बांगलादेशी घुसखोर बिनदिक्कत सीमा ओलांडून भारतात प्रवेश करीत आहेत. सनातन धर्माचे अस्तित्व कायम ठेवायचे असेल तर संस्कृतीवर होणारे आक्रमण थांबविणे आणि घुसखोरांची हकालपट्टी करणे हाच एक उपाय आहे. येणाऱ्या काळात मोदी सरकार ऑपरेशन 'पुश बॅक' आणखी तीव्र करण्याची शक्यता आहे. बिहारातील मतदारयादी पुनरीक्षण हा यातील पहिला टप्पा आहे. पुढील टार्गेट हे पश्चिम बंगाल असेल यात शंकाच नाही. त्यामुळेच राजकीय उद्देशाने मुस्लिमांची तळी उचलून धरणाऱ्यांचे धाबे दणाणले असून मतदारयादी पुनरीक्षणाला जोरदार विरोध सुरू केला आहे. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी सुरू केलेली मतदार अधिकार यात्रा म्हणजे त्यांच्या पायाखालची वाळू सरकण्यासारखे आहे. कारण, घुसखोरी कायमस्वरूपी रोखण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये सत्तापरिवर्तन आवश्यक झाले आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# हत्तींचा कळप आणि पक्ष्यांचा थवा!

फिल्ड मार्शल मुनीर हे कुराणचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांना संपूर्ण कुराण कंठस्थ आहे. अमेरिकेच्या फ्लोरिडात त्यांचे एक भाषण झाले. या भाषणाचा प्रारंभच त्यांनी कुराणमधील एका गोष्टीने केला.

इब्राहिमने मक्का-काबा शहर बांधले. या शहराची भरभराट होऊ लागली. व्यापार वाढू लागला, प्रगती होऊ लागली. येमेन व इथोपियाचा राजा अब्राहाच्या डोळ्यात ही बाब खुपू लागली. त्याने आपल्या राज्यातील साना गावात एक चर्च बांधले. याने संतप्त होत एका मुस्लिमाने सानात जाऊन या चर्चवर लघवी केली. राजा अब्राहा संतापला. त्याने काबा-मक्काला कायमचे संपविण्याचा निर्णय घेतला व आपले लष्कर काबाच्या दिशेने पाठविले. त्यात मोठमोठे हत्ती होते. काबाचा विनाश होणार होता. पण, अल्लाहने काबाच्या रक्षणाचे वचन दिले होते.

**गोष्ट महमूदची :** काबाला संपविण्यासाठी पाठविलेल्या हत्तींमध्ये मेहमूद नावाचा हत्ती होता. त्याचा माहूत त्याला काबाकडे कूच करण्यास सांगत होता आणि हा हत्ती वारंवार जमिनीवर बसून जात असे. अल्लाहने या हत्तींच्या विरोधात पक्ष्यांचे थवे पाठविले आणि या पक्ष्यांनी मातीचे लहान लहान दगड या हत्तींवर टाकणे सुरू केले.

**हत्तींची काय गत झाली? :** भारताने आम्हाला संपविण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही अशीच गत भारताची करू, असा इशारा देण्यास मुनीर विसरले नाहीत. अरबस्तानात ज्या वर्षात ही घटना घडली त्याला अम अल फिल म्हणजे हत्तीचे वर्ष म्हटले जाते आणि या घटनेनंतर ५० वर्षांनी मुस्लिम प्रेषित मोहम्मद पैगंबराचा जन्म झाला.

**मर्सिडिस आणि गिट्टीचा ट्रक :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारताच्या विरोधात किती आग ओकावी? भारत म्हणजे चकाकनारी मर्सिडिस आणि पाकिस्तान म्हणजे रेती-गिट्टीने भरलेला ट्रक! अशा ट्रकने मर्सिडिसला धडक दिली तर चकाकणाऱ्या मर्सिडिसचे काय होईल? असा प्रश्न विचारीत मुनीर यांनी पुन्हा एकदा भारताला धमकी दिली. विशेष म्हणजे ही धमकी अमेरिकेच्या भूमीवरून देण्यात आली.

**पहलगामपूर्वी :** पहलगाम हत्याकांड होण्यापूर्वी जनरल मुनीर यांनी अशीच भारताविरोधात गरळ ओकली होती. फिल्ड मार्शल मुनीर यांच्या चिथावणीखोर भाषणानंतर भारतासमोर एकच पर्याय आहे तो म्हणजे पाकिस्तानचे चार तुकडे करणे. १९७१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानचे दोन तुकडे करीत ९३ हजार पाकिस्तानी सैनिकांना शरणागतीसाठी बाध्य केले होते. जगाच्या इतिहासातील ही एक सर्वांत मोठी शरणागती मानली जाते. आता भारताला पाकिस्तानचे चार तुकडे करण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

**सिंदूरनंतर :** देशाचे वायुदलप्रमुख अमरप्रीत सिंग यांनी एका कार्यक्रमात बोलताना, ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानला अधिक चोप देण्याची आमची इच्छा होती असे म्हटले आहे. आता ती इच्छा पूर्ण करण्याची वेळ आली आहे. पाकिस्तानला अन्य कोणतीही भाषा समजत नाही, त्याला एकच भाषा समजते ती म्हणजे युद्धाची. भारताला आता पाकिस्तानच्या विरोधात निर्णायक पावले उचलावी लागतील असे मानले जाते.

**फ्लोरिडातील भाषण :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी अमेरिकेच्या फ्लोरिडामधील हयात हॉटेलमधील एका समारंभात बोलताना जे शब्द उच्चारले आहेत त्याची गंभीर दखल भारताला घ्यावी लागेल. या कार्यक्रमाचा प्रारंभ कुराणच्या एका आयतचे पठन करून करण्यात आला. नंतर पाकिस्तानचे राष्ट्रगीत झाले आणि यानंतर फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारतावर जणू शब्दांचा बॉम्बवर्षाव सुरू केला. या समारंभासाठी पाकिस्तानी वंशाच्या काही प्रतिष्ठितांना निमंत्रित करण्यात आले होते. कुणालाही मोबाईल वा अन्य डीजिटल उपकरणे आत नेण्याची परवानगी नव्हती. एका अमेरिकन सेनापतीच्या निवृत्ती समारोहानिमित्त हा समारंभ आयोजिण्यात आला होता.

**धरण तर बांधा :** फिल्ड मार्शल मुनीर भारताविरोधात युद्ध पुकारल्यासारखे बोलले. २५ कोटी पाकिस्तानींचे पाणी बंद करण्यासाठी भारताने इंदस नदी करार रद्द केला आहे. आता त्यावर धरण बांधले जाणार आहे. भारताने धरण बांधावेच. 'हम दस मिसाईल से फारीग कर देंगे! हमें मिसाईल की कमी है?' असे म्हणत मुनीर म्हणाले, इंदस नदी ही काही भारताची मालमत्ता नाही. भारताने कालव्यांचे बांधकाम सुरू करावे आणि मग पाकिस्तान काय करतो ते पाहावे.

**अर्धे जग घेऊन बुडू :** पाकिस्तान एक आण्विक राष्ट्र आहे. आमचे अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न झाल्यास केवळ आम्ही बुडणार नाही हे भारताने लक्षात ठेवावे. आम्ही अर्धे जग घेऊन बुडू. तेवढी आमची आण्विक क्षमता आहे, असेही मुनीर यांनी या भाषणात सांगितले.

**श्रेय ट्रम्प यांनाच :** भारत-पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धबंदीचे श्रेय केवळ राष्ट्रपती ट्रम्प यांनाच आहे आणि म्हणूनच आम्ही शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी त्यांचे नाव सुचविले आहे असेही ट्रम्प यांनी घोषित केले. फिल्ड मार्शल मुनीर यांनी आपल्या भाषणात अनेकदा भारताची खिल्ली उडविली.

**पूर्व ते पश्चिम :** भारताच्या पूर्व भागात महत्त्वाची प्रतिष्ठाने आहेत. त्यामुळे युद्धाचा प्रारंभ पूर्वेपासून होत तो पश्चिमेकडे जाईल. मुनीर यांनी अप्रत्यक्षपणे गुजरातच्या जामनगरमधील रिलायन्स रिफायनरीचा उल्लेख केला. जगातील हा सर्वांत मोठा तेल शुद्धीकरण कारखाना असल्याचे मानले जाते. या कारखान्याचा विमाच ३ लाख कोटी रुपयांचा असल्याचे समजते. यावरून या कारखान्यात किती मोठी गुंतवणूक करण्यात आली असावी याचा अंदाज करता येईल.

**अतिरेक्यांची घुसखोरी सुरूच :** दरम्यान, काश्मीर खोऱ्यात सुरू असलेल्या चकमकी पाहता पाकिस्तानी अतिरेक्यांचे आगमन अद्याप सुरू असल्याचे दिसते. कुलगाममधील चकमकीत भारताचे दोन जवान हुतात्मा झाले. ही चकमक प्रदीर्घ काळ चालली. या साऱ्यावरून पाकिस्तानने ऑपरेशन सिंदूरपासून कोणताही धडा घेतलेला दिसत नाही. याचाच अर्थ भारताला पाकिस्तानबाबत अधिक प्रभावी कारवाई करण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

**पाक सरकारलाच इशारा :** फिल्ड मार्शल मुनीर यांनी केवळ भारताविरोधात भूमिका घेतली असे नाही तर त्यांनी आपल्या सरकारलाही इशारा दिला आहे. युद्ध ही एक गंभीर बाब असल्याने ती केवळ लष्करी सेनापतींवर सोडून चालत नाही असे म्हटले जाते. युद्धाप्रमाणेच राजकारण ही एक गंभीर बाब असल्याने ती केवळ राजकीय नेतृत्वावर सोडून चालणार नाही असे म्हणत मुनीर यांनी आपल्याच सरकारला धमकीही दिली.

**नवी परिस्थिती :** फिल्ड मार्शल मुनीर यांच्या या भाषणाने पाकिस्तान व भारत दोन्ही देशांसमोर नवी परिस्थिती निर्माण झाली अहे. आता या फिल्ड मार्शलचे करावयाचे काय असा प्रश्न पाकिस्तान सरकारसमोर उपस्थित झाला आहे. कारण मुनीर यांना चीन-अमेरिका दोन्ही महासत्तांचा पाठिंबा आहे. मुनीर यांचा कार्यकाळ नोव्हेंबर महिन्यात संपत आहे. त्यांना मुदतवाढ न दिल्यास कोणत्याही दिवशी आपले सरकार उलथविण्याचा धोका पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना भेडसावणार आहे.


**नवा बोनस :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी बलुच लिबरेशन आर्मी या पाकिस्तानातील फुटीर गटाला दहशतवादी घोषित करून मुनीर यांना जणू बोनस घोषित केला आहे. पाकिस्तानचे शासन अल्ला, आर्मी व अमेरिका हे तिघे चालवितात असे म्हटले जात असे. ते पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.

## वेध

**अनिल फेकरीकर**

# धरणांनाही मिळावे सेफ सिटीचे कवच!

महाभारतातील कथेत शूरवीर कर्ण याचे रक्षण व्हावे याकरिता सूर्याने त्याला जन्मत:च अंगावर अभेद्य कवच प्रदान केले होते. अशाच स्वरूपाचे कवच सावनेर शहराला सेफ सिटी प्रकल्पामुळे मिळाले आहे. यामुळे भविष्यात सावनेर शहर नागपूर जिल्ह्यातील सर्वांत सुरक्षित शहर म्हणून नावारूपास येईल. पण २ ते ३ लाख हेक्टर जमिनीचे सिंचन करणारे आणि उपराजधानीतील ५० लाख लोकांची तृष्णातृप्ती करणारे कामठी खैरी तसेच तोतलाडोह धरण असुरक्षित का? त्यांनाही आता काळानुसार सेफ सिटी प्रकल्पाचा एक भाग म्हणून कवच द्यायला हवे. तसे पाहता काळासोबत जो चालतो तोच स्पर्धेत टिकतो. अन्यथा त्याला कालबाह्य म्हणून बाजूला सारले जाते. महाराष्ट्र पोलिसांनी या गोष्टीची चाहूल समजून तत्काळ काही बदल करणे सुरू केले आहेत. याच बदलातील एक बदल म्हणजे नागपूर जिल्ह्यातील सावनेर शहरात सुरू झालेला सेफ सिटी प्रकल्प होय. ७९ व्या स्वातंत्र्य दिनापासून हा सेफ सिटी प्रकल्प सावनेर शहरात कार्यान्वित झाला. या सेफ सिटी प्रकल्पामुळे सावनेर शहर सुरक्षित झाले आहे, असे म्हणावे लागेल. कारण यातील तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून लावण्यात आलेले कॅमेरे लहान मुलांचे खेळणे नाही. तर एखाद्या गुन्हेगाराच्या वाहनाने सावनेर शहरात प्रवेश करताच त्याचा क्रमांक टिपून काही क्षणात जन्मकुंडली देणारे तंत्रज्ञानाने युक्त आहेत.



सावनेरमध्ये एकूण २५ ठिकाणी ९३ एआय तंत्रज्ञानयुक्त आधुनिक कॅमेरे बसविले आहेत. यात फेशिअल रिकगयाझेशन सिस्टिम आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकगनायझेशन (एएनपीआर) ही व्यवस्था कार्यान्वित केली आहे. यात सुमारे १ लाखांपेक्षा जास्त गुन्हेगारांचा डाटा टाकण्याची सुविधा आहे. याकरिता १२८ टेराबाईट्स स्टोरेज क्षमताही देण्यात आली आहे. मध्यप्रदेशसह महाराष्ट्रातील गुन्हेगारांची छायाचित्रे या सिस्टिममध्ये टाकण्यात आली आहेत. जेणेकरून कुठलाही गुन्हेगार सावनेर शहरात आला तर त्याला घातपात करता येणार नाही, अशीच व्यवस्था पोलिसांनी करून ठेवली आहे. तसे पाहता पोलिसांचे हात लांब असतात. याचे ज्वलंत उदाहरण द्यायचे झाल्यास देवलापार पोलिस स्टेशन अंतर्गत एक अपघाताची घटना घडली होती. त्या घटनेत पती- पत्नी दुचाकीने जात असतात. वाटेत मोरफाटा भागात त्यांच्या वाहनाला अज्ञात ट्रकने धडक मारून तो आरोपी पळून गेला. या घटनेत महिलेचा जीव जातो. अशावेळी पीडित पती आपल्या पत्नीला उपचार मिळावा म्हणून भर पावसात जाणाऱ्या येणाऱ्यांना मदत मागतो. पण लोकांनी त्याला मदत केलीच नाही. अखेर हतबल पती आपल्या पत्नीचा मृतदेह दुचाकीला बांधतो अन् पुन्हा परतीच्या वाटेवर निघतो. वाटेत त्याने जो पत्नीचा मृतदेह लटकविला त्याचा व्हिडीओ तयार करून त्याला व्हायरल केले जाते. त्याचे दु:ख दूर करण्याऐवजी त्यावर मीठ चोळण्याचे काम केले जाते. त्याच प्रकरणात ग्रामीण पोलिसांनी मार्वेल तंत्रज्ञानाचा वापर करून त्या धडक मारणाऱ्या आरोपी वाहनाचा शोध घेतला अन् विशेष म्हणजे आरोपीला उत्तर प्रदेशात जाऊन अटकही केली. याचा अर्थ पोलिसांनी मनावर घेतले तर पाताळातून आरोपीला आणू शकतात. हाच संदेश त्यांनी या प्रकरणातून दिला आहे, याकरिता त्यांचे आणि मार्वेल तंत्रज्ञानाचे अभिनंदन. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमेवर असलेल्या सावनेर तालुक्यात सतत तस्करी सुरू राहते. यावर आळा घालणे आवश्यक झाले आहे. त्या कारणाने पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञानाची गरज सातत्याने भासत होती. ती गरज ओळखून त्यांनी सावनेर शहरात सेफ सिटी प्रकल्प कार्यान्वित करण्यावर भर दिला. हा प्रकल्प सुरू व्हावा याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांनी बरीच मेहनत घेतली. याबद्दल त्यांचे कौतुक करावेच लागेल. आता कळमेश्वर शहरातही सेफ सिटी प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. पण इतर शहरांच्या सुरक्षेचे काय? त्यांचाही विचार प्राधान्याने करावा. त्यापूर्वी धरणांचा विचार झाल्यास राष्ट्रीय संपत्ती सुरक्षित राहील. विशेषतः पारशिवनी तालुक्यातील पेंच प्रकल्प धरण (कामठी खैरी), रामटेक तालुक्यातील तोतलाडोह धरणाच्याही सुरक्षेचा विचार गृहमंत्रालयाने करायला हवा. केवळ शहरांना सुरक्षा देऊन काम होणार नाही. ही दोन्ही धरणे नागपूर शहरासाठी महत्त्वपूर्ण आहेत. यामुळे पुढील काळात या दोन्ही धरणांना सेफ सिटी प्रकल्पाच्या रूपात कवच मिळो, हीच अपेक्षा.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# सांस्कृतिक मार्क्सवादाचा हिंदू सणांवरील हल्ला

हिंदूंचा धर्म आणि त्यांचे तत्त्वज्ञान हे मार्क्सवादासमोर नेहमीच आव्हान राहिलेले आहे. हिंदूंचे सण आणि उत्सव, त्यांच्या परंपरा यांच्यावर प्रश्न उपस्थित करून, टीकाटिप्पणी करून सर्वसामान्य जनतेचा बुद्धिभेद करण्याचे काम सांस्कृतिक मार्क्सवाद करीत असतो.

हिंदूंचे आनंदाचे प्रसंग म्हणजे त्यांचे सण व उत्सव आहेत. या सर्व उत्सवांच्या माध्यमातून लोक एक होतात, आपल्या भावनांचे आदानप्रदान करतात, एकमेकांच्या आनंदामध्ये समरस होतात. यातून अर्थव्यवस्थेला सुद्धा खूप मोठी चालना मिळते. परंतु या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून कधी या सणांना पितृसत्ताक म्हणून हिणवायचे, तर कधी पर्यावरणविरोधी म्हणायचे, तर कधी कालबाह्य ठरवायचे असे यांचे प्रताप सुरू असतात. सध्याच्या धकाधकीच्या युगामध्ये अनेक घरांमध्ये आपले सण, उत्सव व त्यामागे दडलेला अर्थ सांगायला आजी-आजोबा नाहीत. शाळांमधून सुद्धा या मागचा खरा अर्थ मुलांना समजावून सांगण्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे यातून निर्माण होणारी पिढी ही सांस्कृतिक मार्क्सवादाचे बळी ठरू शकते. या सांस्कृतिक मार्क्सवादाच्या हल्ल्यामुळे आमच्या नवीन पिढीचा आमच्या परंपरेवरचा विश्वास कमी होऊन ते श्रद्धाहीन होण्याचा धोका सुद्धा निर्माण होऊ शकतो. जे इस्लामी राजवटीला जमले नाही, इंग्रजांना जमले नाही ते या सांस्कृतिक मार्क्सवादामुळे होऊ शकते. म्हणून जनतेने सावध राहून वृत्तपत्र, समाज माध्यमे अशा सर्व ठिकाणी हिंदुस्थान आणि उत्सव यावर आक्षेप घेणाऱ्या लोकांचे आक्षेप खोडून काढणे आवश्यक आहे. कधी कधी हे मार्क्सवादी सिनेमातील नट आणि नटी यांना घेऊन सुद्धा त्यांच्या माध्यमातून हा हल्ला करतात. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला वाटते की एवढे मोठे लोक जर म्हणत आहेत तर कदाचित हे खरे असले पाहिजे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. हे सांस्कृतिक मार्क्सवादाचे हिंदू संस्कृतीवरील आक्रमण आहे हे आपण समाजाला पटवून दिले पाहिजे व आपले सण आणि उत्सव अतिशय धूमधडाक्यात व आनंदाने साजरे केले पाहिजेत.

आषाढ पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमेपासून सणांना सुरुवात होते. उन्हाळ्यात लग्न झालेल्या मुली आखाडीनिमित्त माहेरी येण्याचा प्रघात सुद्धा आहे. त्यानंतर जिवती हा सण येतो. पूर्वी सोनार लोक घरोघरी जाऊन दारावर जिवती लावायचे. पावसाळ्याची सुरुवात झालेली असते. पाणी प्रदूषित असते. यावेळेस घरातील मुलांचे आरोग्य चांगले राहावे या हेतूने या जिवती देवीची पूजा करण्यात येते.



त्यानंतर नागपंचमी येते. फार पूर्वीपासून आपल्या पुराणांमध्ये वासुकी, शेषनाग इत्यादी नागांचे वर्णन आलेले आहे. आजही नाशिक येथील त्र्यंबकेश्वर येथे कालसर्प पूजा करण्यात येते. पर्यावरण दृष्टिकोनातून बघितले तर हजारो टन अन्नधान्यांचा नाश करणाऱ्या उंदरांना खाणारे जे सर्प आहेत त्यांचेही स्मरण करण्याचा हा दिवस आहे. त्यानंतर रक्षाबंधन येते. बहीण आणि भावातील अकृत्रिम प्रेमाला दर्शविणारा हा सण आहे. यामध्ये बहीण भावाला राखी बांधते व भाऊ बहिणीच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेतो. इथे मात्र सांस्कृतिक मार्क्सवाद जागा होतो. तो म्हणतो की, हे पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे. भावांनी बहिणींच्या रक्षणाची जबाबदारी कशाला घ्यायला पाहिजे? तुम्ही महिलांना कमजोर समजता का? इथे यांचा अभ्यास कमी पडतो. घरोघरी व्यक्तिगत स्तरावर जरी बहीण भावाला राखी बांधत असली तरीसुद्धा राक्षसराज बलीचे साम्राज्य उलथवून टाकण्याकरिता भगवान विष्णूच्या वामन अवतारामध्ये या वामन नावाच्या तरुण विद्यार्थ्याने गुरुकुलामध्ये शिकणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे म्हणून रक्षा बांधली होती. १९०५ साली ज्यावेळेस इंग्रजांनी बंगालचे विभाजन केले त्यावेळेस सुद्धा समुद्रकिनाऱ्यावर जमलेल्या हजारो लोकांनी एकमेकांना रक्षासूत्र बांधून बंगालच्या विभाजनाच्या विरोधात लढण्याचा संकल्प केला होता. त्यामुळे रक्षा बांधणे हे एखाद्या कार्याचे किंवा संकल्पाचे स्मरण करून देण्याचे साधन आहे. राहिला प्रश्न भाऊ आणि बहीण यांच्यातील नात्यांचा. आई-वडील कोणालाही जन्मभराकरिता पुरलेले नसतात. त्यामुळे आपण गेल्यानंतर सुद्धा आपल्या मुलांमध्ये प्रेम आणि संबंध कायम राहावे यासाठी केलेली ही योजना आहे. आज नोकरीच्या निमित्ताने अथवा इतर कोणत्याही कारणांनी भाऊ-बहीण जर दूर राहत असतील तरीसुद्धा ते या दिवशी मनाने मात्र जवळ असतात व एकमेकांचे स्मरण करतात. ज्यांना भाऊ नाही किंवा बहीण नाही असे अनेक लोक कोणाला तरी बहीण किंवा भाऊ मानून त्यांच्याशी आपले अशा पद्धतीचे संबंध कायम ठेवतात. आज आपण अनेक ठिकाणी अनेक मंचावर स्त्रीवादी भूमिका मांडताना अनेकांना बघतो. समाजामध्ये स्त्री आणि पुरुष हे असले तरीही ते विविध नात्यांनी बांधले गेलेले असले पाहिजेत जेणेकरून यांच्यामध्ये संघर्ष न राहता परस्पर प्रेम कायम राहील हाही यामागचा उद्देश आहे. सांस्कृतिक मार्क्सवाद्यांना एवढे समजण्यासाठी भरपूर वेळ लागेल किंवा त्यांना समजून सुद्धा घ्यायचे नसेल. कारण त्यांचा उद्देश हिंदू संस्कृतीवर आक्रमण हाच आहे. ते कधी गणेशोत्सवामधील डीजेमुळे व्यथित होतात तर कधी गोविंदाच्या गाण्यांमुळे त्यांना त्रास होतो. होळीमध्ये आणि गोविंदामध्ये पाण्याचा अपव्यय केला जातो असे त्याचे म्हणणे असते. दिवाळीतल्या फटाक्यांमुळे वायुप्रदूषण होते हे सांगण्यासाठी विविध सिनेमातील कलाकारांना समोर आणून ते नागरिकांना फटाके न फोडण्याचे आवाहन करतात. परंतु हेच लोक कधीही ३१ डिसेंबरला फटाके फोडू नका असे आवाहन करीत नाही. जलीकट्टू किंवा बैलगाडा शर्यतीमध्ये प्राणी-हक्काचे उल्लंघन होते असे यांना वाटते परंतु बकरी ईदला लाखो बकरे कापले जातात त्यावेळेस यांच्यापैकी एकही समोर येऊन या प्राणी हिंसेबद्दल बोलत नाही. देवीला बोकड अर्पण करणे ही अंधश्रद्धा आहे याबद्दल अनेक साधुसंतांचा दाखला हे लोक देत असतात. परंतु इतर वेळेला बोकडाचे मटण खाल्लेले त्यांना चालते. 'दिवाळीच्या फटाक्यांमुळे गुदमरली मुंबई' अशा प्रकारचे मथळे छापणारे वृत्तपत्र ३१ डिसेंबरला मुंबई गुदमरली की नाही हे सांगत नाही.

सर्वच उत्सवांमध्ये समाजातील छोट्या छोट्या घटकांना काम मिळते. पोळ्याला मातीचे बैल बनविणारे कुंभार मग दिवाळीसाठी पणत्या बनवायला लागतात. फटाका उद्योगांमध्ये काम करणारे कामगार त्यांना तर वर्षातून एक वेळा फार मोठा रोजगार मिळतो. त्यामुळे ते वर्षभर त्यासाठी तयारी करतात. मूर्तिकारांना जन्माष्टमीला कान्होबा, गणेश जयंतीला गणपती, दुर्गा उत्सवामध्ये दुर्गा देवी, अशा विविध मूर्ती बनविण्याची संधी मिळते. भाजीपाला, किराणा, दूध, दही, मिठाई, खानपान सेवा, समारंभ व्यवस्थापन, नवीन दुचाकी, चारचाकी वाहनांची विक्री अशा अनेक गोष्टींना चालना मिळते. हिंदू सणांमुळे देशांमध्ये एक लाख कोटी रुपयांपेक्षा मोठी उलाढाल होते. अर्थव्यवस्थेला गती मिळते. सर्वसामान्य गोरगरीब जनतेपर्यंत पैसा पोहोचतो. त्यामुळे हिंदूंचे सण हे निसर्गाशी व आर्थिक चक्राशी संबंधित आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. हे सर्व समजून घ्यायला पुरोगामी, बुद्धिजीवी आणि मार्क्सवादी यांना वेळ नसला तरीही जनतेने मात्र अतिशय आनंदाने आणि उत्साहाने आपले सण साजरे केले पाहिजेत.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### सर्वसमावेशक गणेशोत्सव साजरा करण्याकडे कल

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेने परिपूर्ण आहे. माहितीचा स्फोट, कृत्रिम बुद्धिमत्ता, वेगवान जीवनशैली या सगळ्यामुळे माणसाचे जगणे पूर्वीपेक्षा खूप बदलले आहे. पण या साऱ्या बदलांमध्ये गणेशोत्सव आजही आपल्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे. गणेश हा विघ्नहर्ता, बुद्धीचा देव आणि आरंभीचा देवता मानला जातो. समाजाला एकत्र आणण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली. त्यामुळे धार्मिकतेसोबतच सामाजिक आणि राष्ट्रीय ऐक्य वाढले. आज गणेशोत्सव फक्त धार्मिक न राहता सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय भान देणारा उत्सव झाला आहे. गणेशमूर्ती बनवताना शाडूची मूर्ती, नैसर्गिक रंग यांचा वापर करण्याचा संदेश समाजात पसरू लागला आहे. गणेशोत्सवात समाजातील विविध स्तरांतील लोक एकत्र येतात. कला, नृत्य, नाटक, कीर्तन, व्याख्यान यांचा कार्यक्रम घेऊन समाजात संस्कृतीची जपणूक केली जाते. फटाके, प्लॅस्टिक, रासायनिक रंग यांच्या प्रदूषणामुळे निसर्गाला धोका निर्माण होतो. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही गरज बनली आहे. शिस्तबद्ध मिरवणुका, मर्यादित ध्वनी आणि पर्यावरणपूरक मूर्ती याकडे लोकांचा कल वाढत आहे. एकंदरीत, आजच्या युगात गणेशोत्सव हा परंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम आहे. तो आपल्याला श्रद्धा, समाजहित, संस्कृती आणि पर्यावरण यांचा समतोल साधायला शिकवतो.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### कलियुगातील तमोगुणाचा प्रभाव

स्वयंशिस्त दुरापास्त होण्याचे मुख्य कारण म्हणजे तमोगुणाचा प्रभाव आणि तो का पडतो तर अरबट -सरबट आहारामुळे; तरीही जातीय राजकारण करून आमच्या खाण्यावर सुद्धा बंधने आणणार का? असा प्रश्न विचारून प्रसिद्धीच्या माध्यमात येण्याचा आटापिटा कोणी सोडायला तयार नाही. कोणी म्हणतो आम्ही नवरात्रीत मासे खातो, तर कोणी संकष्टीला मटण, कोणी जिवंत कोंबड्या हातात घेऊन मोर्चे काढतो; म्हणजेच स्वतःच्या जिभेवर ताबा नाही मग अशी मंडळी जनतेवर ताबा मिळवून काय साध्य करणार? दुकाने जर सरकारने बंद केली तर अशा मंडळींनी प्रथम दिवशी आपल्याला काय हवे ते घरी आणावे आणि त्याच्या भक्षणाचा सुखद अनुभव घ्यावा. कोरोना काळात काय करीत होतो, ते दिवस आठवावे. उगीच जातीय तेढ आणून काही साध्य होईल असे वाटत नाही. अशा मंडळींनी चांगुलपणाचे चिंतन करून तो आत्मसात करावा. सध्या त्याचीच कमतरता आहे. कर्तव्य, स्वधर्म व स्वयंशिस्त याची पायमल्ली करून निगरगट्ट राजनीतीची निर्मिती सातत्याने होते आहे आणि सहानभूती मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्नही होतो आहे. धर्मावर ताशेरे ओढण्याआधी स्वधर्म आचरण करावा अन्यथा तोच स्वयंआचाराच्या चिंतनाचा विचार ठरतो आणि मग स्वातंत्र्यप्राप्ती शापित ठरते. किंकर्तव्यमूढ व गलितगात्र अर्जुनाला भगवान श्रीकृष्णांना भगवद्गीता सांगावीच लागली, तेच कार्य मोदींना सर्व व्याप सांभाळून करावे लागते आहे. कारण दुसऱ्याच्या घरात विषारी बॉम्ब टाकून भांडणे लावणाऱ्यांची संख्या वाढते. म्हणूनच हा सर्व कलियुगातील तमोगुणाचे प्रभाव म्हणावेसे वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### पोळा : बैलांप्रति कृतज्ञतेचा दिवस

महाराष्ट्रात पोळा श्रावण मासातील अमावास्येला साजरा केला जातो. बैलांचा उत्सव म्हणजे पोळा! बैल हा शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा सोबती! कारण नांगरणीपासून ते पेरणी, दळणवळण यासाठी बैल शेतकऱ्याला मदत करतो. त्याच्या श्रमामुळेच शेतकऱ्याला पीक घेता येते. म्हणूनच बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांची पूजा करून हा सण साजरा केला जातो. या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना अंघोळ घालून, त्यांना तेल चोळून, सुंदर सजवून मिरवणुकीसाठी नेतात. बैलांच्या शिंगांना रंगवून, गळ्यात गजरे व गोंडे घालून, गोड पदार्थ खाऊ घालून त्यांचा सन्मान केला जातो. बैलांनी केलेल्या कष्टाचे स्मरण करून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी गावोगावी बैलांच्या मिरवणुका काढल्या जातात. शेतकरी बांधव एकत्र येऊन आनंदाने हा उत्सव साजरा करतात. एकंदरीतच पोळा हा शेतकऱ्याच्या कष्टकरी बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, निसर्गाची पूजा करण्याचा आणि समाजात एकोपा वाढविण्याचा सण आहे. या सणाच्या माध्यमातून 'प्राण्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे' हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य अधोरेखित होते.



**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# प्रत्येक शहरात मराठा समाजासाठी वसतिगृह करा

## मुख्यमंत्र्याकडे मराठा क्रांती मोर्चाची मागणी ; मावळा पगडी घालून मुख्यमंत्री फडणवीस यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारून ते शासनाच्या नियंत्रणाखाली चालवण्यात यावे. मुलांच्या वसतिगृहाला श्रीमंत शहाजीराजे भोसले मुलांचे वसतिगृह हे नाव देण्यात यावे. मुलींच्या वसतिगृहाला राजमाता जिजाऊ मुलींचे वसतिगृह हे नाव देण्यात यावे. वसतिगृहात संगणक कक्ष, वाचनालय, अभ्यासिका, अंतर्गत जिम, भोजनालय अशा सर्व शासकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी २४ तास सुरक्षारक्षक नेमण्यात यावेत व वसतिगृह परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, अशा



मागणीचे निवेदन मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना रविवारी दौऱ्यावेळी देण्यात आले.

अण्णासाहेब पाटील महामंडळला ७५० कोटी रू दिल्याबद्दल मावळा पगडी घालून छत्रपती संभाजी महाराज यांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. या मागण्या मान्य न झाल्यास २९ ऑगस्टला करोडो मराठा समाज बांधव मुंबईत येणार असल्याचा इशारा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने राम जाधव आणि किरण पवार यांनी निवेदनाद्वारे दिला. मराठा समाजातील ज्या समाजबांधवांचे कुणबी पुरावे सापडले आहेत त्यांना त्वरीत कुणबी जात प्रमाणपत्र देण्यात यावे. मराठा समाजाला कायद्याच्या तरतुदीनुसार ५० टक्के च्या आत ओबीसी मधून आरक्षण देण्यात यावे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा संपूर्ण इतिहास शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा या मागण्या करण्यात आल्या. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, भाजपचे माजी नगरसेवक अनंत जाधव, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, माजी आ. राजेंद्र राऊत, आ. अभिजीत पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, राष्ट्रवादी कांग्रेस शहर अध्यक्ष संतोष पवार, भाजप जिल्हा अध्यक्ष शशिकांत चव्हाण उपस्थित होते. या मागण्या केवळ समाजहिताच्या नसून, राज्यातील शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. २९ ऑगस्टला मराठा समाजाचा मुंबई येथे मोर्चा असून त्यापूर्वी या मागण्यांचा विचार करून शासनाने यासंबंधी तातडीने निर्णय घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करावी अन्यथा करोडो मराठा समाज बांधव मुंबईत दाखल होणार असल्याचा इशारा राम जाधव व किरण पवार यांनी दिला.

## महत्वाचे...




### रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधीर विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यांप्रसंगी उद्योजक संजीव पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी आयडल्स संघटनेचे संस्थापक कुणाल बाबरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष संतोष सपकाळ, खजिनदार राजगोपाल झंवर, प्रकाश वानकर, विलास कोरे, सुनील दावडा, चारुकीर्ती शिरसोडे, मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे, संजय चौगुले, सुरेंद्र दमानी, राजीव बाहेती, शहा, हिरालाल डागा, दौलत सिताफळे, नवनीत दायमा, रफिक मुल्ला, आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, मदभावी, दिनेश ताटे, ठाकर, संध्या चंदनशिवे, रेणुका पासपुले, योगिता बोधले, विजया पिटाळकर उपस्थित होते.



### भविष्यातील प्रकल्पासाठी सहकार्य करू : पालकमंत्री जयकुमार गोरे

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

एन.एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलमुळे गरीब गरजू रुग्णांची सोय झाली असून या हॉस्पिटलच्या भविष्यातील प्रकल्पासाठी सहकार्य करू अशी ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली गोरे यांनी वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटलला भेट देऊन ओपीडी, तातडीची सेवा, आयसीयू, रोगनिदान विभाग तसेच चालू असलेल्या 'सेवाव्रती योजने'ची पाहणी केली.हॉस्पिटलच्या कार्याची माहिती ॲड. नितीन हबीब, वैद्यकीय सेवांची माहिती डॉ. सुनील घाटे, नूतनीकरणाविषयी माहिती कल्पेश जव्हेरी आणि 'सेवाव्रती योजना'विषयी माहिती सविता लळीत यांनी दिली. कार्यक्रमास रा. स्व. संघाचे पश्चिम महाराष्ट्र कार्यकारणी सदस्य हेमंतराव हरहरे, पुणे विभागाचे कार्यवाह मुकुंदराव कुलकर्णी, सोलापूर जिल्हा कार्यवाह ऋषिकेश कुलकर्णी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. राजेंद्र घुली, डॉ. संदीप भागवत, डॉ. शिरीष कुमठेकर, संजय पटेल, श्रीधर रिसबुड, वासुदेव बंग, हेमंत चौधरी, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल उपस्थित होते.



### दयानंद शिक्षण संस्थेत वृक्षारोपण

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

जिल्हा नेत्ररोग तज्ञ संघटना व महाराष्ट्र राज्य नेत्ररोग तज्ञ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा आनंद स्वामी महिला वसतिगृह मित्रनगर, शेळगी येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.नंदिनी किणीकर यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे यांनी दयानंद महाविद्यालयाची माहिती सांगितली. त्यांच्या हस्ते डॉ.नंदिनी किणीकर-बिराजदार व मा.डॉ.चंद्रशेखर किणीकर यांचा सत्कार करण्यात आला. प्रा.प्रकाश भोसले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास डॉ.भालचंद्र किणीकर, डॉ. विश्वास बिराजदार, डॉ.जगदिश बिराजदार, डॉ. मजहर सय्यद, डॉ. छाया रघोजी, डॉ. व्हनसुरे, डॉ. मंजुनाथ पाटील, डॉ. जयराम, डॉ. निखील तोष्णीवाल, डॉ.हरिश रायचूर,डॉ.भालचंद्र किणीकर,डॉ.यशवंत पेठकर, प्राचार्य डॉ.एस. बी. क्षीरसागर,प्राचार्य डॉ.एस.व्ही शिंदे, डॉ. किरण चोकाककर, प्रा.राज पवार, सविता पवार, मुक्ता देशमाने, शिपाई देशमाने, हराळे, हांडे, बंडगर उपस्थित होते.

### सोलापुरात जागतिक दर्जाच्या नेत्रचिकित्सा लवकरच होणार

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

पीबीएमएचे एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटल आणि संकरा आय फाऊंडेशन, युएसएच्या सहयोगाने लवकरच सोलापूरमध्ये अद्ययावत नेत्रचिकित्सा रुग्णालय सुरु करण्यात येणार आहे.या नवीन सुविधा चे नाव 'पीबीएमए चे शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल,कै. नागेश कराजगी कॉम्प्लेक्स' असून खेड, बार्शी रोड येथे २ एकर प्लॉट मध्ये ५४,००० चौरस फुट अशा प्रशस्त जागेत विस्तारलेली आहे. सोलापूरकरांसाठी येथे आधुनिक व व्यापक नेत्रचिकित्सा सेवा उपलब्ध होतील.सोमवारी येथे वास्तूपूजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष राजेश शहा, उपाध्यक्ष सुधीर साबळे यांसह कुमार प्रॉपर्टीजचे संचालक व पीबीएमए उपाध्यक्ष मनिष जैन, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक परवेझ बिलिमोरिया, देसाई ब्रदर्सच्या कार्यकारी संचालिका शीतल नवानी, पल्लवी साबळे, संकरा आय फाऊंडेशन,युएसएचे शशांक झावरे व वैद्यकीय संचालक डॉ.राहुल देशपांडे उपस्थित होते.

## अश्विनी सहकारी रुग्णालय, संशोधन केंद्र नियमितची वार्षिक सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित या संस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुजरात भवन, मुरारजी पेठ येथे रुग्णालयाचे चेअरमन बिपीन पटेल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सभेच्या सुरुवातीस संस्थेचे संचालक चंद्रशेखर स्वामी यांनी सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले. सभाध्यक्ष चेअरमन बिपीन पटेल यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु झाले. सभेच्या सुरुवातीस दिवंगत व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात आली.

प्रशासकीय अधिकारी सचिन बिज्जरगी यांनी अजेंड्यावरील विषयांचे व मागील सभेच्या वृत्तांताचे वाचन केले. त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. सभाध्यक्ष पटेल यांनी



अहवालसालात संस्थेने केलेल्या प्रगतीसंबंधी, तसेच वार्षिक अहवाल व ताळेबंदासंबंधी सभेत माहिती दिली. दि. ३१ मार्च २०२५ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद तसेच उत्पन्न खर्च पत्रकास व अजेंड्यावरील सर्व विषयास एकमताने मंजूरी देण्यात आली.

७५ वर्षे पूर्ण झालेल्या उपस्थित सभासदांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सभासद अशोक अग्रवाल, शिरीष शहा, केतन व्होरा, अंबादास चन्ना, राजाराम गोसकी, रविंद्र आडकी, पशुपती माशाळ, राजशेखर विभूते यांनी मनोगत व्यक्त केले. सभासद प्रा.श्रीकांत येळेगांवकर यांनी संस्थेच्या अभिनंदनाचा ठराव मांडला व तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. सभेस संचालक संजीव पाटील, भैरुलाल कोठारी, जयेश पटेल, मेहूल पटेल, डॉ. राजीव प्रधान, श्रीमती यशोदा डागा, इंदुमती अलगोंड, अशोक लांबतुरे, गणेश तापडीया, शैलेश शहा, विलास पाटील आणि वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत औरंगाबादकर उपस्थित होते. व्हा. चेअरमन डॉ. विजय पाटील यांनी आभार मानले.

## श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेतील पालकांसाठी सहलीचे आयोजन

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने माता-पालक व महिला शिक्षिकांसाठी एक दिवसाच्या सहलीचे आयोजन करण्यात आले. सहलीत तब्बल १२० माता-पालक व १६ महिला शिक्षिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसहा वाजता तीन बसेसने सहल रामलिंग, कपिलधारा धबधबा, कुंतलगिरी व वडगाव येथील सुप्रसिद्ध श्री विश्वनाथ सिद्धेश्वर मंदिराकडे रवाना झाली. सहलीसाठी संजीवनी ट्रॅव्हल्सच्या तीन बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. संचालिका शिल्पाताई ठोकळ, प्राचार्य मोहनराव घोडके यांच्या हस्ते बसची पूजा संपन्न झाली. शिवाजी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, कारी (ता. बार्शी)



यांचे प्राचार्य मोहम्मद शेख यांनी सहलीच्या उत्तम आयोजनाबद्दल प्राचार्य, पालक, महिला शिक्षिका तसेच संजीवनी ट्रॅव्हल्सचे मालक संजीव करजखेडे यांचे अभिनंदन केले. प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सहलीच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा श्रीमती निर्मला ठोकळ, अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पा ठोकळ व सचिव भिकाजी गाजरे यांनी प्राचार्य दत्तात्रय गाजरे, महिला शिक्षिका व माता-पालकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## मोहम्मद पैगंबर जयंती अध्यक्षपदी फहीम कोरके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

मंद्रुप येथे पैगंबर जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये मोहमदीया युवक संघटनेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नज़ीर आवटे, बक्षुभाई मुल्ला, जैनेदीन काझी ,सलीम शेख, बाबुलाल लिगेवान यांच्याप्रमुख उपस्थितीत पदाधिकारीचे निवड करण्यात आले.यावेळी शमशोदीन दामटे यांची उपाध्यक्षपदी मोशीन शेख यांची खजिनदारपदी तर नूर शेख यांची सचिवपदी निवड करण्यात आले. तर मिरवणूक (जुलूस) प्रमुखपदी इम्रान मुल्ला,रजाक लिगेवान यांची निवड करण्यात आले.यावेळी दानेश शेख,अझरोदिन कोरके,शिकंदर



आवटे,शिबीर मिरा लिगेवान,महिबुब मुल्ला,अख्तर कोरके,रियाज पटेल,ईलाइ शेख, शेखअहमद लिगेवान, इक्बाल पठाण,महिबुब दुमदुमे,साहील पटेल,अन्वर काझी,बंदेनवाज फुटाणे,अल्ताफ बाजे, बंदेनवाज मुलाणी,शबीर जाफर शेख, हुसेन लिगेवान उपस्थित होते. यावेळी बैठकीचे प्रस्तावना मुबारक मोमीन यांनी केले तर आभार प्रदर्शन फारुक मुल्ला यांनी केले.

## जलजीवनच्या कामांसाठी ७२ कोटींची गरज

### ठेकेदारांकडून निधीअभावी कामबंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर , दि. १७ ऑगस्ट-**

जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेंतर्गत एक हजार नऊ कामे मंजूर आहेत. त्यातील ४२८ कामे पूर्ण झाली आहेत. तर निधी नसल्याने जवळपास ५०० कामे ठप्प आहेत. ही कामे पूर्ण होण्यासाठी ७२ कोटी निधीची मागणी करण्यात आली आहे. यासाठी १९४ प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे आले आहेत.

ग्रामीण भागातील प्रत्येक घराला ५५ लिटर शुद्ध पाणी मिळावे, या उद्देशाने केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने जिल्ह्यात जलजीवन मिशन योजना सुरू केली आहे. त्यातून आतापर्यंत सोलापूर जिल्ह्यात ४२८ कामे पूर्ण झालेली आहेत, त्यामधून कामे पूर्ण झालेल्या गावातील प्रत्येक घरांना नळ कनेक्शन देऊन शुद्ध पाणीपुत्त्वठा केला जात आहे. तर सुमारे ५०० जलजीवनची कामे ठप्प झाली आहेत. ती कामे करण्यासाठी ७२ कोटी रूपयांची तातडीने गरज आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री लाड़की बहीण योजना सुरू झाल्यापासून जिल्ह्यात जलजीवन योजनेसाठी लागणारा निधी वेळेवर आणि पुरेसा उपलब्ध होत नसल्याने गेल्या एक वर्षापासून जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेली कामे रखडली आहेत. त्यामुळे जलजीवन मिशन योजनेचा जिल्ह्यात बोजवारा उडाला आहे. त्यामुळे शासनाकडून जलजीवन योजनेचा निधी वेळेवर देण्याची मागणी ठेकेदारांमधून होत आहे.

> निधी नसल्यामुळे जलजीवनची अनेक कामे ठप्प आहेत. ठेकेदारांना काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जलजीवनची कामे पूर्ण होतील. बिले मिळावीत म्हणून ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे १९४ प्रस्ताव आले आहेत. त्यासाठी ७२ कोटी रुपयांची गरज आहे. त्याची मागणी शासनाकडे केली आहे.
>
> **- संजय धनशेट्टी,**
> **कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा**

> महाराष्ट्र शासनाकडून जोपर्यंत निधी येत नाही, तोपर्यंत जलजीवन मिशनची कामे सुरू केली जाणार नाहीत. लाडकी बहीण योजनेच्या अगोदरपासून अनेक ठेकेदारांची बिले अडकली आहेत. ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात समन्वय नसल्याने अनेक ठेकेदार अडचणीत आहेत.
>
> **मोतीलाल राठोड,**
> **अध्यक्ष, पाणीपुरवठा ठेकेदार संघटना**



## संवेदनशील फोटोग्राफी करणे महत्त्वाचे : खा. प्रणिती शिंदे

### छायाचित्रकार आणि कॅमेरामन यांचा सन्मान सोहळा

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

छायाचित्रकार आणि कॅमेरामन आपला जीव धोक्यात घालून एका छायाचित्रासाठी सर्व कही विसरून काम करत असतात.एखाद्या चुकीच्या फोटोमुळे खूप काही घडू शकते. त्यामुळे संवेदनशील फोटोग्राफी करणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन खा. प्रणिती शिंदे यांनी केले.

जागतिक छायाचित्र दिनाचे औचित्य साधून सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, चंद्रनील फाउंडेशन आणि प्रेस फोटो अँड व्हिडिओ जर्नालिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने छायाचित्रकार आणि कॅमेरामन यांचा सन्मान सोहळा खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी विचारमंचावर काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विनोद भोसले, काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष तथा चंद्रनील फाउंडेशनचे संस्थापक सुशील बंदपट्टे , युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे , सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे, प्रेस फोटो अँड व्हिडिओ जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संदीप वाडेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रमिक पत्रकार संघाचे सरचिटणीस सागर सुरवसे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन खजिनदार किरण बनसोडे यांनी केले तर उपाध्यक्ष आफताब शेख यांनी आभार मानले. यावेळी विविध वृत्तपत्र व चॅनेल्सचे छायाचित्रकार, कॅमेरामन व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मेकॅनिकल अँड सिव्हिल इंजिनिअरिंगसाठी फ्री शिपला भारतरत्न इंदिरा गांधी इंजिनिअरिंग कॉलेजला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

कै.सुशीला ताई गायकवाड यांच्या स्मरणार्थ भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने स्थापनेचा वीस वर्षाचा टप्पा यशस्वीपणे पार केला आहे. त्यामुळे महाविद्यालयाने प्रथम वर्षातील मेकानिकल आणि सिव्हिल इंजिनिअरिंग शाखासाठी विशेष योजना जाहीर केली आहे ही योजना गुणवत्ता आणि आर्थिक दृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने मोठी संधी जाहीर



केली असून या योजनेची भरपूर विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. तरी महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र गायकवाड सचिवा सौ. अनामिका रवींद्र गायकवाड यांनी या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिला. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी बोलताना म्हणाले की त्या महाविद्यालयामध्ये दर्जेदार शिक्षक अनुभवी प्राध्यापक आणि उद्योगाभी मुख प्रशिक्षण हे सर्व अत्यल्प खर्चात विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

> सर्व इंजिनिअरिंग शाखासाठी नवीन तंत्रज्ञानावर प्रयोगशाळा उपलब्ध आहेत प्रत्येक लॅब मध्ये इंडस्ट्री ग्रेड उपकरणे अपडेट सॉफ्टवेअर आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते स्मार्ट क्लासरूम मधील डिजिटल बोर्ड प्रोजेक्टर ई लर्निंग सॉफ्टवेअर व तज्ञांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांचा इंडस्ट्रीमध्ये सहज प्रवेश होतो तांत्रिक शिक्षण सोबत सादरीकरण कुलब्रेशन व इनोवेशन सारखी कौशल्य विकसित होतात.
>
> **- डॉ. अनिल देशमाने, प्राचार्य**
> **भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग केगाव, सोलापूर**

**नावात बदल**

माझे नाव **छाया वसंत जमदाडे आणि साधना वसंत जमदाडे** हे दोन्ही एकच व्यक्ती असून हे बरोबर आहे.
**पत्ता -** ५३, पापाराम नगर, श्री. नुतन प्रशालेजवळ, विजापूर रोड, सोलापूर -४१३००४
**नोटरी क्र.-५७२/२०२५**
**तारीख - १४/०८/२०२५**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### ईस्ट बंगाल विजयी डायमंड हार्बर चमकला



**कोलकाता** : प्रतिष्ठेच्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेत रविवारी विवेकानंद क्रीडांगमावर खेळल्या गेलेल्या उपांत्यपूर्व सामन्यात ईस्ट बंगाल एफसीने मोहन बागान एसजी संघावर २-१ असा ऐतिहासिक विजय मिळवला. जमशेदपूर येथे खालिद जमीलशिवाय जमशेदपूर एफसी प्रतिष्ठेच्या ड्युरंड चषक स्पर्धेतून झाला. जेआरडी टाटा क्रीडा संकुलात जमशेदपूर एफसीला डायमंड हार्बर एफसीकडून ०-२ असा पराभव पत्करावा लागला. किबू विकुणाच्या डायमंड हार्बर एफसीचा पुढील सामना ईस्ट बंगाल संघाशी होईल. डायमंड हार्बर एफसीने जमशेदपूर एफसीला स्पर्धेतील सर्वात मोठा धक्का दिला. रुआतकिमाच्या पूर्वार्धात शानदार दोन गोल आणि उत्कृष्ट बचावात्मक कामगिरी केली. बंगालच्या संघाने इंडियन सुपर लीगमधील प्रतिस्पर्ध्याला मागे टाकले, त्यामुळे घरच्या संघाला आणि चाहत्यांना धक्का बसला. मुख्य प्रशिक्षक खालिद जमीलच्या नेतृत्वाखाली गत दोन स्पर्धांमध्ये किमान उपांत्य फेरी गाठणाऱ्या जमशेदपूरने आपल्या अनुपस्थितीबद्दल दुःख व्यक्त केले, कारण ४८ वर्षीय खेळाडू राष्ट्रीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी सांभाळण्यासाठी संघ सोडून गेले.

### सिनरकडून आत्मनेचा स्वप्नभंग अल्काराजची झ्वेरेव्हवर मात

**सिनसिनाटी** : २४ व्या वाढदिवसानिमित्त खेळणाऱ्या अव्वल मानांकित आणि गतविजेत्या जॅनिक सिनरने सिनसिनाटी ओपनमध्ये फ्रेंच पात्रताधारक टेरेंस आत्मनेचा स्वप्नभंग केला आणि सिनसिनाटी स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.पहिल्या उपांत्य सामन्यात सिनरने टेरेंस आत्मनेवर ७-६(४), ६-२ असा विजय मिळविला व आपण अमेरिकन ओपन स्पर्धेसाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले. दुसऱ्या उपांत्य फेरीत कार्लोस अल्काराजने जर्मन तिसऱ्या मानांकित ॲलेक्झांडर झ्वेरेव्हवर ६-४, ६-३ असा विजय मिळवला. सिनरने त्याच्या पहिल्या सर्व्ह पॉइंट्सपैकी ९१ टक्के गुण जिंकले, ८६ मिनिटांच्या सामन्यादरम्यान त्याला एकही ब्रेक पॉइंट मिळाला नाही. 'खूप, खूप कठीण आव्हान होते. प्रेक्षकांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, असे सिनर कोर्टवर म्हणाला.

### चंदीगड, दिल्ली युवा संघाला डिव्हिजन अ मध्ये पदोन्नती

**जालंधर** : १५ व्या हॉकी इंडिया कनिष्ठ पुरुष राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेच्या सहाव्या दिवशी दोन डिव्हिजन ब आणि चार डिव्हिजन अ सामने झाले. हॉकी बिहार आणि हॉकी बंगालने आपापले सामने जिंकले कारण डिव्हिजन ब संपला. हॉकी चंदीगड व दिल्लीने अनुक्रमे पूल अ आणि पूल ब जिंकले आहेत आणि पुढील वर्षासाठी डिव्हिजन अ मध्ये बढती मिळविली आहे. हॉकी हिमाचल आणि आसाम हॉकीला डिव्हिजन क मध्ये स्थान देण्यात आले आहे. पंजाबमधील जालंधर येथे झालेल्या दिवसाच्या त्यांच्या डिव्हिजन अ सामने हॉकी असोसिएशन ऑफ ओडिशा, हॉकी हरयाणा, उत्तर प्रदेश हॉकी आणि हॉकी पंजाबने जिंकले. बिहारने पूल ब मध्ये आसाम हॉकीचा ४-३ असा पराभव केला. बिहारकडून नंदलाल शाह (१८, ४७) यांनी दोन गोल केले, तसेच मोहम्मद अलिशान अहमद (१) आणि रंजन कुमार (६) यांनी गोल केले. हॉकी बंगालने हॉकी उत्तराखंडवर ४-१ असा सहज विजय मिळवला. ओडिशाने पूल ड मध्ये हॉकी कर्नाटकविरुद्ध २-१ अशा कमी धावसंख्येने विजय मिळवला.

### अभियंता कौशिक साईकुमार यूएफसी एमएमएमध्ये जाणार

**नवी दिल्ली** : दोन महिन्यांपूर्वी, मिक्स मार्शल आर्ट्स फायटर कौशिक साईकुमार एका प्रशिक्षण सत्रानंतर त्याचे आयुष्यच बदलले. इंजिनीअर असलेला कौशिक आता यूएफसी एमएमएमध्ये जाणार आहे. भारतीय फायटरना या वर्षी आंतरराष्ट्रीय एमएमएमध्ये सर्वोत्तम कामगिरी करता आली नाही आणि युएफसीमध्ये अनेक हाय-प्रोफाइल पराभवांचा सामना करावा लागला आहे, तर २७ वर्षीय कौशिक ज्याचे मूळ चेन्नईमध्ये आहे, तो कंटेंडर सिरीजमध्ये भाग घेण्याची संधी मिळाल्याने खूपच उत्साहित आहे. ही एक फाईट प्रमोशन आहे जी यूएफसी (अल्टीमेट फायटिंग चॅम्पियनशिप) साठी प्रतिभा शोधण्यासाठी आहे. मंगळवारी लास वेगासमध्ये होणाऱ्या डाना व्हाईट कंटेंडर सिरीजमध्ये बँटमवेट लढतीत जेव्हा तो यूकेच्या संभाव्य खेळाडू लुईस ली स्कॉट (९-०) विरुद्ध खेळेल तेव्हा त्याच्या व्यावसायिक लढाई कारकिर्दीतील सर्वात कठीण आव्हानाला तो तोंड देईल हे कौशिकला माहीत आहे.

# भारतीय टी-२० संघाच्या पुनर्बांधणीवर लक्ष

आशिया चषकाचे वारे



◆ **नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

भारत सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशिया चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेसाठी सज्ज होत आहे. त्यामुळे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आता टी-२० स्वरूपावर लक्ष केंद्रित करतील असे वृत्त आहे.

गत काही महिन्यांपासून गंभीर भारतीय कसोटी संघात व्यस्त होते आणि आता त्यांनी आपले लक्ष टी-२० संघाकडे वळवले असल्याचे म्हटले जाते.

आता गंभीर टी-२० संघाच्या पुनःबांधणीवर लक्ष देऊ इच्छितात. भारतीय टी-२० संघाने अधिक आक्रमक क्रिकेट खेळावे असे गंभीरला वाटते. गंभीर खेळाच्या आधुनिक शैलीला लक्षात घेऊन संघाचे पुनर्ब्रँडिंग करू इच्छित आहे. तो प्रक्रियेपेक्षा निकाल मिळविण्यावर देखील लक्ष केंद्रित करेल.

त्याच्या नवीन दृष्टिकोनांपैकी एकामध्ये कोणताही नियुक्त फिनिशर नसेल आणि त्याऐवजी प्रत्येक खेळाडूच्या कौशल्यानुसार भूमिका निश्चित केल्या जातील. जर सलामीवीरांनी चांगली सुरुवात केली तर गोलंदाजांचा सामना करण्यासाठी शिवम दुबेला वरच्या क्रमांकावर ढकलले जाऊ शकते.

आरामदायक वाटण्यास जागा नाही. फलंदाजीच्या संख्येनुसार नाही तर कौशल्यानुसार जबाबदारी देण्यात येईल. आधुनिक काळातील टी-२० क्रिकेटपटूच्या या पैलूबद्दल तो समाधानी आहे. (वृत्तसंस्था)

# भारताच्या २३ सदस्यीय संघाची घोषणा

### दक्षिण आशियाई महिला फुटबॉल अजिंक्यपद

◆ **नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

भारताच्या १७ वर्षांखालील महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक जोकिम ॲलेक्झांडरसन यांनी रविवारी २० ते ३१ ऑगस्ट दरम्यान भूतानमधील थिम्पू येथे होणाऱ्या दक्षिण आशियाई १७ वर्षांखालील महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी २३ सदस्यीय संघाची घोषणा केली.

या महिन्याच्या सुरुवातीला दोन दशकांत भारताच्या २० वर्षांखालील महिलांना पहिल्यांदाच २० वर्षांखालील महिला आशियाई चषक पात्रता फेरीत नेणारे ॲलेक्झांडरसन आता किर्गिझ प्रजासत्ताकमध्ये ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या १७ वर्षांखालील महिला आशियाई चषक पात्रता फेरीच्या तयारीसाठी सज्ज होत असताना १७ वर्षांखालील महिला संघाचे नेतृत्व करतील.

१७ वर्षांखालील महिला दक्षिण आशियाई चषक फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत भारत, भूतान, नेपाळ आणि बांगलादेश हे चार संघ सहभागी होतील. ही स्पर्धा दुहेरी राउंड रॉबिन पद्धतीने खेळविली जाणार आहे. प्रत्येक संघ सहा सामने खेळेल व सर्वाधिक गुण मिळवणारा संघ विजेता होईल.

भारताची मोहीम नेपाळविरुद्ध (२० ऑगस्ट) सुरू होईल, त्यानंतर बांगलादेशविरुद्ध (२२ ऑगस्ट), भूतान (२४ आणि २७ ऑगस्ट), नेपाळ (२९ ऑगस्ट) आणि शेवटी पुन्हा बांगलादेशविरुद्ध (३१ ऑगस्ट) लढतील. सर्व सामने चांगलिमिथांग स्टेडियमवर खेळवले जातील.



सॅफ स्पर्धेसाठी सज्ज झालेला भारताचा १७ वर्षांखालील महिला फुटबॉल संघ

**भारतीय १७ वर्षांखालील महिला फुटबॉल संघ** : गोलरक्षक : मुन्नी, सूरजमुनी कुमारी, तम्फासना देवी कोंजेंगबाम. बचाव फळी : अलेना देवी सारंगथेम, अलिशा लिंगडोह, बिनिता होरो, दिव्यानी लिंडा, एलिझाबेथ लाक्रा, प्रिया, रितू बडाईक, तानिया देवी तोनाम्बम.

मधली फळी : अभिस्ता बसनेट, अनिता डुंगडुंग, बीना कुमारी, बोनिफिलिया शुळुई, जुलान नोंगमैथेम, प्रितिका बर्मन, श्वेता राणी, थांडामोनी बास्की. आक्रमक फळी : अनुष्का कुमारी, नीरा चानू लाँगजम, पर्ल फर्नांडिस, वेलिना जादा फर्नांडिस.

भारताचे वेळापत्रक असे- २० ऑगस्ट: नेपाळ विरुद्ध भारत, २२ ऑगस्ट: भारत विरुद्ध बांगलादेश, २४ ऑगस्ट : भूतान विरुद्ध भारत, २७ ऑगस्ट: भारत विरुद्ध भूतान, २९ ऑगस्ट: भारत विरुद्ध नेपाळ व ३१ ऑगस्ट: बांगलादेश विरुद्ध भारत. (वृत्तसंस्था)

# अनाहत सिंग उपविजेती

### एनएसबल्यू बेगा ओपन स्क्वॅश ● अंतिम फेरीत दुखापतीमुळे निवृत्त

◆ **बेगा, १७ ऑगस्ट**

ऑस्ट्रेलियातील बेगा येथे रविवारी खेळल्या गेलेल्या एनएसडब्ल्यू बेगा ओपन स्क्वॅश स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताची युवा स्क्वॅशपटू अनाहत सिंगला इजिप्तची प्रतिस्पर्धी हबीबा हानीविरुद्ध खेळताना दुखापत झाली, परिणामी तिला सामन्यातून जखमी निवृत्त व्हावे लागले व उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

अव्वल मानांकित १७ वर्षीय अनाहत दुसऱ्या मानांकित हबीबा हानीविरुद्ध चौथ्या गेममध्ये १-२ ने पिछाडीवर असताना निवृत्त झाली आणि ४-१० ने पिछाडीवर पडली. अंतिम सामन्यातून अनाहत जखमी निवृत्त झाली, तेव्हा गुणसंख्या ९-११, ११-५, ११-८, १०-४ अशी होती. इजिप्तची हबीबा विजेती ठरली.

प्रथमच जागतिक स्तरावरील स्पर्धेच्या अंतिम सामन्यात खेळताना अनाहतने पहिला गेम ११-९ असा जिंकला, परंतु हानीने पुढील दोन गेममध्ये ११-५ आणि ११-८ असा विजय मिळवत जोरदार मुसंडी मारली.



अनाहतने शनिवारी इजिप्तच्या नूर खाफागीच्या जोरदार आव्हानावर मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

१७ वर्षीय दुहेरी आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकणारी अनाहत ही या खंडीय स्पर्धेत पदक जिंकणारी सर्वात तरुण भारतीय ठरली. तिने ५४ मिनिटांत ३-२ (१०-१२, ११-५, ११-५, १०-१२, ११-७) असा संघर्षपूर्ण उपांत्य सामना जिंकला व अंतिम फेरीत प्रवेश मिळविला होता. (वृत्तसंस्था)

# आशिया चषकासाठी पाकिस्तान संघात बाबर, रिझवान नाही

◆ **कराची, १७ ऑगस्ट**

युएईमध्ये होणाऱ्या आगामी आशिया चषक स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या टी-२० संघात बाबर आझम आणि मोहम्मद रिझवानची निवड झालेली नाही. वेस्ट इंडीजमध्ये हॅमस्ट्रिंग दुखापतीमुळे झालेला फखर झमान बरा झाला आहे आणि तो संघाचा भाग आहे.

सलमान आगा १७ सदस्यीय संघाचे नेतृत्व करणार आहे. आगाच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानचा संघ आशिया चषकाच्या आधी युएई आणि अफगाणिस्तानविरुद्धच्या तिरंगी मालिकेतही सहभागी होणार आहे.

बाबरने शेवटचा टी-२० सामना डिसेंबर २०२४ मध्ये खेळला होता. पीएसएल २०२५ मध्ये त्याने पेशावर झल्मीसाठी दहा डावांमध्ये २८८ धावा केल्या. बाबरप्रमाणे रिझवानही बांगलादेशविरुद्धच्या घरच्या व त्यानंतरच्या परदेशातील मालिकेसाठी पाकिस्तानच्या अलिकडच्या टी-२० संघाचा भाग नव्हता. बाबर पहिल्या वन-डे सामन्यात चांगला खेळला, पण पुढील दोन सामन्यांमध्ये तो हुकला. बाबरला फिरकी गोलंदाजी आणि त्याच्या स्ट्राईक रेटच्या बाबतीत काही सुधारणा करण्यास सांगण्यात आले आहे, असे पाकिस्तानचे मुख्य प्रशिक्षक माइक हेसन म्हणाले.

युएई तिरंगी मालिका आणि आशिया चषकासाठी पाकिस्तानचा संघ : सलमान आगा (कर्णधार), अबरार अहमद, फहीम अश्रफ, फखर जमान, हारिस रौफ, हसन अली, हसन नवाज, हुसैन तलत, खुशदिल शाह, मोहम्मद हारिस (यष्टिरक्षक), मोहम्मद नवाज, मोहम्मद वसीम, साहिबजादा फरहान, सैम अयुब, सलमान मिर्झा, शाहीन शाह आफ्रिदी, सुफियान मुकीम. (वृत्तसंस्था)

# गुकेश, प्रज्ञानंदचे लक्ष्य जेतेपद

### सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ आजपासून



◆ **सेंट लुईस, १७ ऑगस्ट**

सोमवारपासून सेंट लुईस, अमेरिकेत सुरू होणाऱ्या सिंकेफिल्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा विश्वविजेता डी. गुकेश आणि आर. प्रज्ञानंद विजेतेपदासाठी झुंजणार आहेत.

डी गुकेश शास्त्रीय बुद्धिबळात परतला आहे, तर आर प्रज्ञानंद ग्रॅण्ड चेस टूरच्या पाचव्या टप्प्यात पदक व्यासपीठावर पोहोचण्याचा प्रयत्न करणार आहे, जेणेकरून त्याचे एकूण पाचवे स्थान मजबूत होईल.

प्रथम विश्वमानांकित नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन सहभागी होणार नाही. मला शास्त्रीय बुद्धिबळ आवडत नाही, असे त्याने म्हटले आहे.

अमेरिकेचा फॅबियानो कारुआना, फ्रान्सचा अलिरेझा फिरोजा आणि फॉर्ममध्ये असलेले आर्मेनियन-अमेरिकन लेव्हॉन आरोनियन हे भारतीय जोडीसाठी कठीण आव्हान उभे करण्याची शक्यता आहे, परंतु उर्वरित मैदान देखील प्रभावी आहे कारण या वर्षीच्या ग्रॅण्ड चेस टूरसाठी निवडलेले सर्व नऊ खेळाडू एकत्र स्पर्धा करतील. दरम्यान, प्रज्ञानंदाने पुढील वर्षी होणाऱ्या कॅण्डिडेट्स् स्पर्धेसाठी पात्रता मिळवून आधीच आपली ओळख पटवली आहे, जी जागतिक विजेतेपदासाठी गुकेशचा आव्हानकर्ता निश्चित करेल. (वृत्तसंस्था)

# पुनरागमनात मेस्सीचा शानदार गोल

### मेजर लीग फुटबॉल ● इंटर मियामीचा एलए गॅलेक्सीवर ३-१ ने विजय

◆ **फोर्ट लॉडरडेल, १७ ऑगस्ट**

दुखापतीतून सावरल्यानंतर पुनरागमन करताना लियोनेल मेस्सीने मेजर लीग फुटबॉल स्पर्धेत एलए गॅलेक्सीविरुद्ध खेळताना एक शानदार गोल केला व एका गोलमध्ये सहाय्य केले. मेस्सीच्या या प्रेक्षणीय खेळाच्या जोरावर इंटर मियानीने एलए गॅलेक्सीवर २-१ असा रोमहर्षक विजय नोंदविला. उपस्थित चाहत्यांना स्टेडियममध्ये मेस्सी! मेस्सी! मेस्सी!'' चा `कच जयघोष केला.

अर्जेंटिनाच्या या स्टार खेळाडूची वैयक्तिक गुणवत्ता इंटर मियामीला निर्णायक विजय मिळवून देण्यासाठी पुरेशी ठल्ी.

दोन सामन्यांच्या अनुपस्थितीनंतरही, एमएलएसचा सर्वाधिक गोल करणारा मेस्सी, इंटर मियामीला विजय मिळवून देतो हे आश्चर्यकारक नव्हते. तो आठवड्याच्या मध्यापासून संघासोबत सराव करत होता आणि प्रशिक्षक जेवियर मास्चेरानो यांनी पुष्टी केली की तो आठवड्याच्या शेवटीच्या सामन्यासाठी उपलब्ध असेल.



एलए गॅलेक्सीविरुद्ध खेळताना इंटर मियामीचा लियोनेल मेस्सी

अर्जेंटिनाच्या सुपरस्टारने ४५ मिनिटांचा खेळ केला व त्याचा देशबांधव रॉड्रिगो डी पॉलने त्याला मदत केली.

दोन्ही विश्वविजेत्यांनी सामन्यापूर्वीच्या सराव सत्रात भाग घेतला नाही, परंतु मध्यंतराला खेळ सुरू होण्यापूर्वी त्यांनी सराव केला आणि मियामीच्या चाहत्यांनी जोरदार जयजयकार केला. (वृत्तसंस्था)

# श्रेयस, जितेश संघात परतण्याची शक्यता

◆ **मुंबई, १७ ऑगस्ट**

आगामी ९ सप्टेंबरपासून संयुक्त अरब अमिरातमध्ये होणाऱ्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघ निश्चित करण्यासाठी मंगळवारी वरिष्ठ राष्ट्रीय पुरुष निवड समितीची बैठक होणार आहे. त्यामुळे निवड समितीकडून श्रेयस अय्यर आणि जितेश शर्माला भारताच्या टी-२० संघात परत बोलावण्याची शक्यता आहे.





जुलै २०२४ मध्ये गौतम गंभीरने मुख्य प्रशिक्षकपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून श्रेयस किंवा जितेश दोघांनीही टी-२० मध्ये स्थान मिळवलेले नाही. श्रेयसने डिसेंबर २०२३ मध्ये शेवटचा टी-२० सामना खेळला होता, तर यष्टिरक्षक-फलंदाज जितेश जानेवारी २०२४ मध्ये शेवटचा सामना खेळला होता.

निवडकर्ते आणि संघ व्यवस्थापन संयुक्त अरब अमिरातमध्ये अपेक्षित असलेल्या मंद आणि कमी परिस्थितीसाठी योग्य असलेल्या अनुभवी मधल्या फळीतील फलंदाजाचा समावेश करण्यावर एकमत आहेत. जर श्रेयसची निवड झाली, तर शिवम दुबे किंवा रिंकू सिंग यांच्यावर कठीण निर्णय होऊ शकतो, हे दोघेही जानेवारीमध्ये इंग्लंडविरुद्ध भारताच्या शेवटच्या टी-२० सामन्यात सहभागी होते.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला पहिल्या विजेतेपदापर्यंत पोहोचवण्यात मदत करणाऱ्या आयपीएल हंगामातील त्याच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर जितेश, इंग्लंड मालिकेत संजू सॅमसनच्या मागे राखीव यष्टिरक्षक-फलंदाज असलेल्या ध्रुव जुरेलची जागा घेण्याची अपेक्षा आहे.

जसप्रीत बुमराहला टी-२० संघात समाविष्ट करायचे की नाही हे देखील निवडकर्त्यांनी ठरवावे. मोहम्मद शमी उपलब्ध नसल्यामुळे वेगवान गोलंदाजाची जागा रिक्त आहे. (वृत्तसंस्था)

# सोलापूरची १४ पदकांची कमाई

**वरिष्ठ राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धा : सात सुवर्ण, तीन रौप्य व चार कांस्य पदके**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

अहमदाबाद येथे झालेल्या वरिष्ठ गट राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत सोलापूरच्या खेळाडूंनी सात सुवर्ण, तीन रौप्य व चार कांस्य अशी १४ पदकांची कमाई केली आहे.एक मीटर स्प्रिंग बोर्ड, तीन मीटर स्प्रिंग बोर्ड, दहा मीटर हायबोर्ड, दहा मीटर व तीन मीटर सिंक्रोनाईजड या पाच प्रकारात सोलापूरच्या खेळाडूंनी ही कामगिरी केली.

त्यांना प्रशिक्षक श्रीकांत शेटे, मनीष भावसार, हरीष अन्नलदास व हरिप्रसाद यांचे मार्गदर्शन लाभले.




**कामगिरी केलेले खेळाडू**

● ऋतिका श्रीराम (तीन सुवर्ण व दोन रौप्य) ● ईशा वाघमोडे (दोन सुवर्ण व दोन कांस्य) ● श्रावणी सूर्यवंशी (दोन सुवर्ण) ● आदित्य गिराम (एक रौप्य व एक कांस्य) ● ओम अवस्थी (एक रौप्य व एक कांस्य) ● श्रीगणेश उडता (एक रौप्य)

### उंबरेचा शुभम पाटील भालाफेक स्पर्धेत द्वितीय

**करकंब, दि.१७ ऑगस्ट-**



सद्गुरु गजानन महाराज ग्रामीण विकास मंडळ संचलीत विद्या विकास मंदिर उंबरे (पागे) या प्रशालेच्या शुभम अनिल पाटील या माजी विद्यार्थ्यांने सोलापूर फेडरेशन डिस्ट्रिक्ट भालाफेक स्पर्धेत पुरुष गटात द्वितीय स्थान प्राप्त केले. या कामगिरीवर त्याची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. सध्या तो पुणे येथे २४ एफआयटी येथे प्रशिक्षण घेत आहे. त्याचे संस्था अध्यक्ष ज्ञानदेव ढोबळे, चेअरमन राजाराम नरसाळे, सचिव बी.बी. पाटील, मुख्याध्यापक शहाजी पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### नीलेश गायकवाड अकादमीची घोडदौड; दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धेत नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. मेडशिंगी (सांगोला) येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत त्यांनी आरएनसीए अकादमीवर ५ गडी राखून विजय मिळविला.



रुद्र चौगुले, फलंदाज



वेदांत गोंजारी, सामनावीर



आनंद शेंडे, गोलंदाज

**संक्षिप्त धावफलक**

**एन.जी.सी.ए. अकादमी** : ३१.३ षटकात सर्व बाद ८६ (आनंद शेंडे २३, आर्यन हांगे १३, रुद्र चौगुले २१/३, वीर कोळेकर २२/४) वि.वि. **आर.एन.सी.ए. अकादमी** : ३४ षटकात ५ बाद ८८ (वेदांत गोंजारी नाबाद २८, विहान मुसळे १५, रुद्र चौगुले नाबाद १०, अनुज वाल्मिकी २७/१, आनंद शेंडे १४/२).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मनोधैर्य योजनेतून जिल्ह्यात 'त्या' पीडितांना एक कोटीची मदत

### जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सहकार्य

**तभा वृत्तसेवा। गुरुराज कुलकर्णी**
**वाळूज, दि. १७ ऑगस्ट-**

लैंगिक अत्याचारातील पीडित मुली, तरुणी, बालके व महिलांना शासनाच्या मनोधैर्य योजनेतून आर्थिक मदत आणि समुपदेशनातून मानसिक आधार दिला जातो. त्यातूनच सोलापूर जिल्ह्यातील ९९ अत्याचार पीडितांना मागील साडेचार वर्षात तब्बल एक कोटी ११ लाख रुपयांची मदत देण्यात आली. यंदा जुलै २०२५ पर्यंत पाच पीडितांना मदत मिळाली आहे.

ऑगस्ट २०१३ मध्ये मुंबईतील शक्ती मिलमध्ये झालेल्या भयानक सामूहिक बलात्काराच्या घटनेला प्रतिसाद म्हणून ही योजना सुरू झाली. महाराष्ट्र सरकारच्या महिला आणि बाल विकास विभागाने २ ऑक्टोबर २०१३ रोजी सुरू केलेली ही योजना लैंगिक गुन्ह्यांच्या पीडितांना आर्थिक मदत देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर लागू करण्यात आली. एका अवचित क्षणी नराधमांच्या लैंगिक अत्याचाराने उन्मळून पडलेल्या 'ती'ला मनोधैर्य योजनेतून उभारण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून मदत मिळवून दिली जाते. अचानकपणे समोरील नराधमाने केलेल्या अत्याचारामुळे अडचणीत सापडलेल्या पीडितांना आधार देण्याचे काम प्राधिकरणाकडून केले जाते. तिला न्याय मिळवून देण्यासाठी देखील प्राधिकरणाकडून मोफत कायदेशीर मदत केली जाते. यंदा जिल्ह्यातील पाच पीडितांना साडेपाच लाख रुपयांचे अर्थसाहाय्य या योजनेतून मिळाले आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील या पीडिता असून, त्यांच्यावर नराधमांनी जबरदस्तीने अत्याचार केलेला आहे.

> मनोधैर्य योजना ही महाराष्ट्राच्या लैंगिक गुन्ह्यातील पीडितांना व्यापक पुनर्वसन सेवांद्वारे मदत करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करते. अत्याचार पीडितांना जलद न्याय मिळावा, यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून पीडितांना मोफत कायदेशीर मदत दिली जाते. मनोधैर्य योजनेतून आर्थिक मदत, त्यांचे समुपदेशन, कौटुंबिक वाद, नात्यातील वितुष्ट दूर करण्यातही प्राधिकरणाचे मोठे काम आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, प्राधिकरणाचे सचिव मल्हार शिंदे यांच्या नेतृत्वात प्राधिकरणाचे काम सुरू आहे.
>
> **- अ‍ॅड. देवयानी किणगी, सहायक लोकअभिरक्षक,**

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण**
**सोलापूर जिल्हा योजनेतील आकडेवारी-**

| वर्ष | पीडिता | रक्कम |
|---|---|---|
| २०२१ | ०६ | ६.६५ लाख |
| २०२२ | १२ | ११.०२ लाख |
| २०२३ | ५६ | ६३.१० लाख |
| २०२४ | २० | २४.६० लाख |
| २०२५ | ०५ | ०५.५५ लाख |

**एकुण ९९ पिडीतांना १ कोटी ११लाख**

## महत्वाचे...




## गोमातेच्या पूजनाने गोकुळाष्टमी साजरी

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

श्री कट्टेव्वादेवी गोशाळा वडकबाळ येथे गोमातेचे पूजन व गोग्रास देऊन गोकुळाष्टमी साजरी करण्यात आले. प्राणिमित्र विलास शहा यांच्या हस्ते गोग्रास देण्यात आले. यावेळी आर्किटेक्चर अतुल कोटा, पूर्व विभागातील प्रसिद्ध व्यापारी वर्ग, संस्थेचे अध्यक्ष उमा बिराजदार, निंबाबाई पाटील, आप्पाराव बिराजदार, महानंदा बिराजदार, महानंदा कोळी, रुद्रप्पा बिराजदार आदी गोभक्त गोप्रेमी व गोपालक यांच्या उपस्थितीत गोकुळाष्टमी अतिशय उत्साहाने साजरी करण्यात आले.



## अर्थक्रांतीच्या वतीने वळसंग येथे मड्डी बसवण्णा ज्येष्ठ नागरीक संघाची स्थापना

**वळसंग, दि. १७ ऑगस्ट -**

वळसंग (ता.द. सोलापूर) अर्थक्रांतीचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय देशमुख दबडगावकर (लातूर) यांच्या मार्गदर्शनाखाली वळसंग येथे मड्डी बसवण्णा ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना संपन्न झाली. या नवीन संघाची उद्घाटन सभा दिंडूर रस्ते वरील मड्डी बसवण्णा मंदिरात झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी विजय देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून अर्थक्रांती सोलापूर जिल्हाध्यक्ष गुरुलिंग कन्नूरकर तर सचिव मन्मथ कोनापुरे उपस्थित होते. मुख्य प्रवर्तक सोमशेखर केशट्टी यांच्या नेतृत्वाखाली शिवपुत्र भुसणगी यांनी विशेष परिश्रम घेवून या ज्येष्ठ नागरिकांची नव्याने नोंदणी केली. शिवपुत्र भुसणगी यांना एकमताने संघाचे अध्यक्ष घोषित करण्यात आले.सभासद होयासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन केले. सभेत सर्व ज्येष्ठ नागरिकांचे श्रीशैल गुरव यांच्याकडून पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी चंद्रकांत केशेट्टी, चंद्रकांत मिसे, कलशेट्टी, लाल मुल्ला, पावाडेप्पा आंटद, श्रीदेवी सुरपुरे, पद्मा भूते, निर्मला पोतदार, शशिकला भैराम डगी, सुलोचना बिदरे, खैराटे ताई व आदी ज्येष्ठ मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमशेखर शेट्टी तर आभार पावाडेप्पा आंटद म्हणून कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले.

## संतोष गुळमिरे प्राथमिक विद्यामंदिरात दहीहंडी साजरी

**बार्शी, दि. १७ ऑगस्ट-**

संतोष गुळमिरे प्राथमिक विद्यामंदिर, वाणी प्लॉट, आगळगाव रोड येथे यंदा दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी प्रथमच मुलींच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. इयत्ता १ लीतील विद्यार्थिनी राधिका कासार हिने दहीहंडी फोडून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी लहान मुलांनी पावसात नाचत-गात आनंदोत्सव साजरा केला. पारंपरिक गाणी, टाळ-ढोल यांच्या गजरात सारा परिसर दुमदुमून गेला होता. राधिकाच्या या कार्याचे शिक्षक, पालक व उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. मुलींना संधी दिल्यास त्या प्रत्येक क्षेत्रात यश मिळवू शकतात, हा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## निधन वार्ता..

### नकलाकार नारायण होनप उर्फ रोशनकुमार

**सोलापूर, दि.१७ ऑगस्ट-**



जुन्या काळातील सुप्रसिद्ध नकलाकार समाजसेवक आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व नारायण वामन होनप उर्फ प्रभाकर उर्फ रोशनकुमार (वय-८२) यांचे मंगळवारी (१४ ऑगस्ट) मुंबईतील भांडुप येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. नारायण होनप यांचा जन्म २३ ऑक्टोबर १९४३ रोजी सोलापुरात झाला. त्यांचे वडील जुनी मिलमध्ये कार्यालयीन कर्मचारी होते. चौपाड येथील एका चाळीत वाढलेल्या श्री. होनप यांनी आपले प्राथमिक शिक्षण दत्त चौकातील महापालिका शाळेत, तर माध्यमिक शिक्षण विद्याविकास शाळेत पूर्ण केले. फक्त मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण असूनही त्यांनी विविध क्षेत्रांत आपल्या कामगिरीची छाप उमटवली. नकलाकार म्हणून ते राज्यभर प्रसिद्ध होते. रोशनकुमार या नावाने ते नकलांचे कार्यक्रम करत. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक शाळा, महाविद्यालयात नकलांचे कार्यक्रम केले. कलाक्षेत्राबरोबरच त्यांनी धर्मकार्य, समाजकार्य, प्रशासन आणि अगदी राजकारणातही सक्रिय सहभाग घेतला. श्रीधर स्वामींचे ते भक्त होते. सज्जनगडावरील वास्तव्य, सेवा यामुळे त्यांच्या जीवनात अध्यात्मिक स्थैर्य आले. १९७३ नंतर दरवर्षी स्वामींच्या पुण्यतिथीचा उत्सव ते सोलापूरात, तर २०२१ पासून पुण्यात साजरा करत होते. सज्जनगडावरील श्री समर्थ सेवा मंडळ व रामदास स्वामी संस्थान यांच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.

### रमाबाई इंगळे

**श्रीपूर, दि. १७ ऑगस्ट-**



येथील श्रीपूर (ता. माळशिरस) येथिल श्रीमती रमाबाई दशरथ इंगळे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कर्मचारी मनोज इंगळे यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुन, नातवंडे तसेच चार विवाहित मुली असा परिवार आहे.

## वेळापूरच्या इंग्लिश स्कूल प्रशालेत स्वातंत्र्यदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१७ ऑगस्ट-**



इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेत स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्याध्यापक आर बी पवार यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी स्कूल कमिटीचे चेअरमन पी एस पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप जगदाळे, उपाध्यक्षा प्रियंका पोरे, सदस्य रामचंद्र पिसे, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष अमोल मंडलिक, प्रशालेचे उपमुख्याध्यापक शिवशरण पठान, पर्यवेक्षक सावळे बी एस तसेच प्रशालेचे माजी मुख्याध्यापक पाचपुडं, तसेच शिवतेज प्राथमिक वेळापूर च्या मुख्याध्यापिका गायकवाड मॅडम, प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक व प्राध्यापिका शिवतेज प्राथमिक शाळेच्या शिक्षिका उपस्थित होत्या. ज्युनिअर कॉलेजचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी शिवतेज प्राथमिक शाळेचे विद्यार्थी विद्यार्थिनी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविकेतून प्रशालेचे उपमुख्याध्यापक शिवशरण यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व काय आहे याबद्दल माहिती सांगितली. दलित मित्र स्वर्गीय कदम गुरुजी व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा प्रशालेच्या वतीने सन्मान करण्यात आला. मुख्याध्यापक पवार आर बी यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या देशभक्तांच्या बद्दलची माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

सूत्रसंचालन देवकते यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार बी. एस.सावळे यांनी मानले.




## टेंभुर्णीत निवडणूक आयोगाविरोधात आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि.१७ ऑगस्ट-**

सोलापूर -पुणे जुन्या राष्ट्रीय महामार्गावर टेंभुर्णी शहरातील विविध संघटनाच्या वतीने काळे फीती बांधून आंदोलन करण्यात आले.

येथील कुर्डुवाडी चौकामध्ये निवडणुक आयोगाच्या निवडणुक आयोगाच्या विरोधात हातात काळ्या फिती बांधुन निषेधाचे बॅनर हाती घेऊन विरोधात घोषणाबाजी करुन ठिय्या आंदोलन करण्यात आले. ईव्हीएम हटाव देश बचाव, मतांची चोरी करणाऱ्या निवडणूक आयोगाला जेलमध्ये टाकलेच पाहिजे, ईव्हीएम न काय केलं देशाचं वाटोळं केलं, बोगस मत चोरी थांबलीच पाहिजे, ईव्हीएम हटाव संविधान बचावचे फलक हातात घेऊन घोषणा देत आंदोलन करण्यात आले. यावेळी यावेळी वडार समाजाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजकुमार धोत्रे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, मातंग एकता संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ वाघमारे, राष्ट्रवादीचे माजी तालुका अध्यक्ष औंदुबर महाडिक- देशमुख, सुनील ओहोळ, अ‍ॅड. तुकाराम राऊत, बहुजन पार्टीचे महेंद्र सोनवणे, महावीर वजाळे, अनिल आरडे, सचिन तांदळे, राहुल कांबळे ,समाधान पवार, रमेश पवार, कालिदास पवार, विकास बंदपट्टे, शंभू पवार, सिना ननवरे, रोहित आरडे, राहुल धोत्रे, सुरज धोत्रे उपस्थित होते. मंडल अधिकारी सुजित शेळवणे यांनी निवेदन स्विकारले.



## स्वातंत्र्य दिनानिमित्त हरीरामजी शास्त्री यांनी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१७ ऑगस्ट -**

राजस्थानमधील जोधपूर निवासी सामाजिक समरसतेचे पुरस्कर्ते, रामस्नेही सांप्रदायाचे संन्यासी हरीरामजी शास्त्री यांचा चातुर्मास सध्या पंढरीत सुरु आहे. संन्यासी हरीरामजी शास्त्री यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवारी (दि.१५ ऑगस्ट) येथे खास समारंभ आयोजित केला होता. यावेळी त्यांनी गोपाळपूर येथील श्रीगोपाळकृष्ण विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जेष्ठ कार्यकर्ते सदाभाऊ देवधर, जेष्ठ पत्रकार रमेश घळसासी, सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक रविंद्र साळे, विसावा मंदिराचे विश्वस्त सौरभ थिटे पाटील, संघाचे सहकार्यवाह दादा जमदाडे, अनुलोमचे रामेश्वर कोरे, गंगाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्वेसर्वा चंदाताई तिवाडी, विश्व हिंदु परिषद महिला आघाडीच्या भाग्यश्री लिहीणे, रेखाताई टाक, बजरंग दलाचे जिल्हा संयोजक श्रीनाथ संगितराव, भाजपचे सुरेंद्र कवठेकर, भाजप युवा मोर्चाचे अनुप देवधर, संघाचे संत संपर्क तालुका प्रमुख दर्शन महाराज बडवे उपस्थित होते. या कार्यक्रमास राजस्थानी मंडळाचे नंदकुमारजी मर्दा, राजगोपाल भट्टड, जुगलकिशोर बाहेती, शामसुंदर तापडिया, सुरेश जोशी यांनी विशेष मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक पाठक, सहशिक्षक गायकवाड मॅडम, गिरीश भिडे, कुलकर्णी भूसनर पाटील, प्रशांत वाडेकर, संध्या साकी, गोसावी, अप्पा लेंगरे व वनजकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भाकरेवाडी येथे शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१७ ऑगस्ट-**



स्वातंत्र्य दिनानिमित्त पिसेवाडी ग्रामपंचायत कार्यालय तसेच भाकरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

ग्रामपंचायत सदस्य साहिल आतार यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप केले. या कार्यक्रमात पिसेवाडीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, भाकरेवाडी व परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. तसेच गावातील सामाजिक, राजकीय, क्रीडा, साहित्य, कला, सांस्कृतिक व आरोग्य क्षेत्रातील मान्यवर पदाधिकारी, महिला भगिनी, युवा वर्ग व शालेय विद्यार्थी हजर होते.



## किरण इंगोलेचा पीएच.डी पदवीबद्दल सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१७ ऑगस्ट -**

सांगोला महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी किरण इंगोलेला राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे यांचे तर्फे पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. डॉ.किरण इंगोलेनी डॉईज फॉर सोलर सेल मध्ये उपयोगात येणाऱ्या बाबत संशोधन केले आहे. यासाठी त्यांना डॉ. नित्यानंद यांनी मार्गदर्शन केले.

# मोडनिंब येथील हेमाडपंथी श्री महालिंगेश्वर मंदिर

### श्रावण मासात विविध कार्यक्रम; भक्तांचा ओघ

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१७ ऑगस्ट-**

सोलापूर-पुणे महामार्गालगत माढा तालुक्यातील मोडनिंब हे मिरजेच्या पटवर्धन संस्थान मधील मोठी बाजारपेठ असणारे गांव किंबहुना त्यांचे मुख्य ठिकाण होते. याठिकाणी त्यांचा मोठा राजवाडा असुन याच्या शेजारीच पुरातन असे महादेवाचे श्री महालिंगेश्वर मंदिर आहे. श्रावण महिन्यात महिनाभर अभिषेक, जप, श्री.शिवलीलामृत पोथीचे वाचन करण्यात येते. तिसऱ्या सोमवारी श्री.महालिंगेश्वराची पालखी काढण्यात येते. महाशिवरात्रीला नामसप्ताह आयोजित केला जातो. श्री महालिंगेश्वर जागृत देवस्थान असुन पिंडीमध्ये असलेल्या साळुंकीखाली सतत पाणी असते. यातील पाणी कधीही कमी होत नाही अशी धारणा आहे.

याबाबत मोडनिंब गांव पुर्वी पांढरीभागात वसल्याचे सांगितले जाते, परंतु प्लेगच्या साथीत ही सर्व वस्ती पटवर्धनांच्या राजवाड्याशेजारी वसवली गेली. त्यावेळी पांढरी व परिसरात असलेला श्री.महादेवाची मुख्य पिंड मोडनिंबला आणण्याचा प्रयत्न झाला. परंतु साधारण १८ ते १९ फुट खड्डा घेऊनही पाषाण संपला नाही, तो तसा अखंड असल्याचे दिसुन आले हे खरंतर श्री.महादेवाचे स्वयंभु प्रकटीकरण समजुन तेथेच मंदिर बांधण्यात आले. परंतु तसेच मंदिर राजवाड्याशेजारीही बांधण्यात आले. हे मंदिर हेमाडपंथी असुन पुर्वी या मंदिराच्या कडेने चार दिपमाळ होत्या. परंतु सन १९७० मध्ये मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला व त्या ठिकाणी मोठा सभामंडप बांधण्यात आला. मंदिराच्या हेमाडपंथी वास्तुस हात न लावता समोरील बाजुस प्रशस्त मंडप बांधण्यात आला. परंतु या मंदिराचा लिखीत इतिहास उपलब्ध नाही. जुन्या जाणत्या माणसाकडून माहिती घ्यावी लागते. या मंदिरात वर्षभर कार्यक्रम



सुरु असतात. यामध्ये पुजा करण्याचा मान गुरव समाजाकडे आहे. त्यांची चौथी पिढी आजही सेवेत आहे. प्रत्येक सोमवारी महाआरती करण्यात येते. आजपर्यंत तीव्र दुष्काळातही यातील ओलसरपणा कमी झाला नव्हता. प्रत्यक्ष गंगा अवतरते अशी भाविकांची श्रध्दा आहे. श्रावण मासानिमित्त मोडनिंबचा महालिंगेश्वर पहिल्या सोमवारी पांढरी येथील श्री महादेवाला भेटीस जातो. ही प्रथा खुप जुनी आहे. पालखीसोहळा मोडनिंबच्या महालिंगश्वर मंदिरातुन ग्राम प्रदक्षिणा करुन वेताळबाबा मंदिरासमोरुन गोलावरुन पांढरीकडे जातो. माने कुटुंबाकडुन देवास आहेर केला जातो व पालखी पुन्हा मोडनिंबला परत येते. सालाबादप्रमाणे अत्यंत उत्साहात हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यासाठी मोडनिंब ग्रामस्थ, पांढरीवरील सर्व नागरिक समस्त माने, चोपडे कुटुंबातील तरुण सहभागी होतात. या ठिकाणी द्वादशीला अन्नछत्र समितीमार्फत, तोडकरी यांच्या पुढाकाराने अन्नदान केले जाते. या मंदिरात दररोज नित्य पूजा, आरती, अभिषेक, भजन व कीर्तन असे कार्यक्रम राबविले जातात. महाशिवरात्री दिवशीही विविध धार्मिक कार्यक्रम साजरे होतात.

### भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा महादेव

मनोभावे पूजा करणाऱ्या भक्तांच्या इच्छा, अपेक्षा पूर्ण करणारा महादेव म्हणून या मंदिराची आख्यायिका आहे. सोलापूर-पुणे महामार्गालगत मोडनिंब (ता. माढा) शहरातील श्री महालिंगेश्वर महादेव मंदिरात श्रावण महिन्यामुळे भक्तांचा ओघ वाढला आहे.

### आकर्षक मंदिर, शिखर,कोरीव बांधकाम

श्री महालिंगेश्वर पिंड, गणपती यांच्या मूर्ती असलेले हे हेमाडपंथी प्राचीन महादेव मंदिर आहे. हे मंदिर शेकडो वर्षापूर्वीचे असल्याचे बोलले जाते. या मंदिराचे उंच रंगीबेरंगी शिखर भक्तांना आकर्षित करते. हे मंदिर कोरीव बांधकाम केलेले असून मंदिराची व शिखरांची रंगसंगती अतिशय कोरीव व आकर्षक केलेली आहे.

## महत्वाचे...



## उमाबाई श्राविका विद्यालयात २०० विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

उमाबाई श्राविका विद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या एक पेड माँ के नाम या उपक्रमा अंतर्गत विविध प्रकारच्या वड, पिंपळ, जांभळ, अशोक अशा देशी २०० वृक्षांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, वृक्षप्रेमी राजकुमार देवकते यांची प्रमुख उपस्थिती होती. हा उपक्रम राबवण्यासाठी प्रशालेचे क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे, अभिनंदन उपाध्ये, मनोज शहापूरे, विश्वजीत मोहोळे यांनी परिश्रम घेतले



## माजी आमदार दिलीप माने यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

जानकी नगर ओपन स्पेस जुळे सोलापूर येथे कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती माजी आमदार दिलीपराव माने यांचा वाढदिवस वृक्षारोपणाच्या कार्यक्रम करून साजरा करण्यात आला.

पिरॅमीड स्पिरीच्युअल ट्रस्टचे सिनीयर मास्टर्स आणि थोर उद्योगपती तिरुमला बालाजी अमाईन्सचे चेअरमन चंद्रशेखरजी रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख अतिथी माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते यावेळी ओपन स्पेस जानकी नगर येथे ध्यान मंदीर उभारण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी सुभाष कालदीप, उषादेवी चाबुकस्वार, श्री. जैन व सोमा कोळेकर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास शाम पाटील, महेश घाडगे, सचिन चौधरी, अनिल हिबारे, बगाडे, विंचुरकर, शिवकुमार बागलकोटी, तोरवी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसिष्ठ सोनकांबळे यांनी. प्रकाश दिवाणजी यांनी आभार मानले.



## जिल्हा परिषद पतसंस्था क्रमांक १ मध्ये ध्वजारोहण

**सोलापूर दि. १७ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नियमित नं. १ या संस्थेमध्ये चेअरमन डॉ. एस. पी. माने यांच्या हस्ते संस्थेच्या कार्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी तज्ञ संचालक श्रीशैल देशमुख, संचालक विशाल घोगरे, श्रीधर कलशेट्टी, शिवाजी राठोड, एस.डी.म्हमाणे, चेतन वाघमारे, टी ए मुतवल्ली, आर आर घुले व कर्मचारी अशोक पवार, सुभाष काळे, विनोद कदम, नितिन येमुल व आयटीसेलचे स्वामी सभासद, ऋषिकेश जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिव डी. एल. देशपांडे यांनी केले.



## किसान एकता संघ दिल्लीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना नियुक्ती पत्र प्रदान

**अक्कलकोट दि १७ ऑगस्ट-**

किसान एकता संघ दिल्ली या संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी चंद्रकांत रेवणसिद्ध पाटील यांची बिनविरोध नियुक्ति करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष सोरेन प्रधान यांनी सदरची निवड जाहीर केली. या निवडबद्दल नवी दिल्ली येथे चंद्रकांत पाटील यांचे अभिनंदन करून नियुक्ती पत्र देण्यात आले.

# सोलापूरच्या ओंकार जाधवने स्वातंत्र्यदिनी 'किलिमांजारो' केले सर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१७ ऑगस्ट-**

मुळचा सोलापूरकर असलेला गिर्यारोहक ओंकार रामचंद्र जाधव याने १५ ऑगस्ट रोजी आफ्रिकेतील सर्वोच्च शिखर माउंट किलिमांजारो (१९,३४० फूट) सर करून तिरंगा फडकवत स्वातंत्र्य दिन साजरा केला.

मोशी (टांझानिया) येथून ११ ऑगस्ट रोजी मोहिमेला सुरुवात झाली. तब्बल ९० किमी अंतराची कठीण चढाई पार करून १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७:३० वाजता १५ अंश तापमानात शिखर गाठण्यात आले. शिखरावर पोहोचताच ओंकारने भारताचा तिरंगा फडकावला तसेच अवयवदान मोहिमेचा संदेश देत त्याचे महत्त्वही अधोरेखित केले. ओंकारने यापूर्वी एव्हरेस्ट बेस कॅम्प (२०२१) सर केला असून सह्याद्रीतील अनेक किल्ले सर करण्याचा अनुभव त्यास आहे.

ही मोहीम ३६० एक्सप्लोरर आंतरराष्ट्रीय साहसी पर्यटन संस्थेने आयोजित केली




होती. याची स्थापना २०१७मध्ये येथील पहिले एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांनी केली असून आज ती जगभरातील गिर्यारोहकांना साहसासाठी मार्गदर्शन करते. आफ्रिकेतील टांझानियामधील हा सर्वात उंच पर्वत ज्वालामुखीजन्य असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून ६ किमी आहे. किलिमांजारोवर चढाई करताना सर्वात मोठा धोका म्हणजे अत्यंत वेगाने बदलणारे हवामान व अत्यल्प ऑक्सिजनमुळे होणारा

### वडिलांच्या आठवणींना समर्पित

माझ्या वडिलांची इच्छा होती की मी साहसी फिल्डमध्ये काहीतरी करावे. त्यांच्यानंतर त्यांच्या इच्छेने या फिल्डमध्ये आलो आणि हे यश त्यांच्या आठवणींना समर्पित आहे. **- ओंकार जाधव**

चढ. सुरुवातीला हिरवेगार जंगल, नंतर कोरडी टुंड्रा, आणि अखेरीस बर्फाच्छादित शिखर, अशा विविध पट्ट्यांतून गिर्यारोहकांना प्रवास करावा लागतो. या दरम्यान थंडी, ऑक्सिजनची कमतरता, डिहायड्रेशन, तसेच शारीरिक व मानसिक थकवा हे धोके सतत जाणवत राहतात. अनुभव नसल्यास किंवा चुकीच्या गतीने चढाई केल्यास उंचीशी जुळवून घेणे अवघड ठरते. त्यामुळेच योग्य अक्लिमटायझेशन, मार्गदर्शन व शिस्तबद्ध नियोजन केल्याशिवाय किलिमांजारोवर चढाई करणे धोकादायक ठरू शकते.

## आयुर्वेद पात्रता परीक्षेत शंकरनगरची डॉ. सुप्रिया चव्हाण देशात तिसरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ ऑगस्ट-**



शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेची शंकरनगर येथील माजी विद्यार्थीनी डॉ. सुप्रिया सदाशिव सावंत यांनी आल इंडिया आयुर्वेद पदव्युत्तर पात्रता परीक्षेत (पीजी)देशात तिसरा क्रमांक मिळविला.

सुप्रिया या स.म.शंकरराव मोहिते-पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज वेळापूर येथील सेवानिवृत्त सहशिक्षक सदाशिव सावंत यांची कन्या असुन तिने आनलाईन क्लास बरोबरच स्व:ताच्या बुध्दी कौशल्याने ४८० पैकी ३७० गुण मिळविले.

मुलीने अथक परिश्रम करुन देशपातळीवर उज्वल यश संपादन केले आहे. तिने अभ्यासाबाबतीत कधीही तडजोड केली नाही. यश मिळवायचेच आणि आईवडीलांच्या कष्टाचे चिज करायचं ही जिद्द मनाशी बाळगून सुप्रियाने यश संपादन केले व मुलीही कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होवु शकतात है दाखवुन दिले. जिद्द,सातत्य आणि आत्मविश्वास असेल तर काहीही अशक्य नसते याचा प्रत्यय आला.
**- सदाशिव सावंत, वडील**

त्यांचा पर्सेंटाईल स्कोअर हा ९९.९८ असुन जनरल ईडब्ल्यूएसमध्ये ती प्रथम आहे. सुप्रियाने अहिल्यानगर येथुन जी.एस.गुणे आयुर्वेदीक महाविद्यालयातून बीएएमएसचे शिक्षण पूर्ण केले होते. त्यानंतर आयुर्वेद क्षेत्रातील एम.डी.शिक्षणासाठी तिने एआयएपीजीइटी परीक्षा दिली होती.

# अजित कुलकर्णी यांना बाबा आमटे पुरस्कार प्रदान

### कुर्डूवाडीतील आनंद साधना संस्थेची घेतली दखल

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १७ ऑगस्ट-**

कुर्डूवाडी (ता. माढा) येथे आनंद साधना संस्था व बार्शीत निवासी प्रकल्पाद्वारे दिव्यांग पुनर्वसनाचे १७ वर्षांपासून काम करणारे अजित कुलकर्णी यांना यंदाचा बाबा आमटे पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्वातंत्र्यदिनी पुणे येथे तृप्ती व गणेश चाफेकर यांच्या इन्स्पायर ट्राईब व प्रकाशवाटा फौंडेशनच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. पुरस्काराचे यंदाचे ५ वे वर्ष होते. या कार्यक्रमात ममता सिंधू सपकाळ यांची मुलाखत घेण्यात आली. कार्यक्रमात प्रेरणास्थान बाबा आमटे पुरस्कार व आनंद साधना संस्थेच्या उद्योग केंद्रास जुनी रिक्षा घेण्यासाठी ७५ हजार रुपयांचा निधी अजित कुलकर्णी यांना सौ.तृप्ती व गणेश चाफेकर व इन्स्पायर ट्राईब व प्रकाशवाटा फौंडेशनच्या विविध देणगीदार यांच्या माध्यमातून ऑनलाईन स्वरुपात दिल्याचे जाहीर केले.

लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसाचे




संचालक अनिकेत प्रकाश आमटे, डॉ सिंधू सपकाळ यांच्या कन्या ममता सिंधू सपकाळ, पुणे बिग एफ.एम.चे प्रसिद्ध आर. जे. संग्राम खोपडे, तृप्ती व गणेश चाफेकर यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली.

पुरस्कार सोहळ्यास उत्तर देताना अजित कुलकर्णी म्हणाले कि, २२ वर्षापूर्वी सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे बाबा व साधना आमटे यांना प्रेरित होऊन स्नेहालय परिवारास जोडलो गेलो. नगर येथे शून्यातून स्नेहालयच्या अनामप्रेम संस्था उभारणीत १६ वर्षे काम केले. दिव्यांग पुनर्वसनाचे असंख्य प्रयोग नगरमध्ये केल्यावर ग्रामीण भागातील दिव्यांगांच्या पुनर्वसनाच्या कामाला सोलापूर, धाराशिव, बीड, लातूर, सांगली, सातारा, पुणे या जिल्ह्यातील अपंगांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले. आनंद साधना संस्था सध्या कुर्डूवाडी रेल्वे जंक्शन आणि बार्शी येथे निवासी प्रकल्प चालवत आहे.

समाजमाध्यमातून अभिनेते श्रेयस तळपदे, नाम फाउंडेशनचे मकरंद अनासपुरे, अभिनेत्या सुकन्या मोने-कुलकर्णी, भार्गवी चिरमुले आणि जेष्ठ समाजसेवक डॉ.प्रकाश बाबा आमटे यांनी आनंद साधना प्रकल्पास मदतीचे आवाहन केले आहे. कार्यक्रमास भारतीय हवामान शास्त्रज्ञ डॉ.रंजन केळकर, कायदा अभ्यासक विवेक वेलणकर , डॉ कल्पना सुरेश संचेती, मकरंद वैद्य उपस्थित होते. पुणे येथे शिक्षण घेणारे अनेक उच्च शिक्षित दिव्यांग अंध जन या कार्यक्रमास उपस्थित होते. आनंद साधनाचे गुरुनाथ रसाळ, सोमनाथ घाडगे, विश्वनाथ नवले, संभाजी खिलारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

## भंडारकवठे तंटामुक्त अध्यक्षपदी मुक्काणे, उपाध्यक्षपदी माडे

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील सरपंच भिमाशंकर बबलेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभेत तंटामुक्त अध्यक्ष म्हणून बसवराज मुक्काणे व उपाध्यक्ष म्हणून शिवानंद माडे यांची निवड करण्यात आली.

यावेळी सोलापूर जिल्हा भाजपा चिटणिस यतीन शहा, पोलीस पाटील अशोक मुक्काणे, गोपाल जंगलगी, राजकुमार बिज्जरगी, महादेव बगले, व्ही के पाटील, गंगाधर कोरे, सोमनिंग विरदे, माजी सरपंच निंगप्पा कुपसंगे, उपसरपंच सरिता तुरबे, ग्रामपंचायत सदस्य सोमनिंग कमळे, संगप्पा बिराजदार, रविद्र कदम, धरेप्पा तेली, गोपाल बनपुरे, चेअरमन मुकेश व्हनकोरे , व्हाईस चेअरमन व्हनप्पा अरकेरी, रवि तुरबे, प्रविण बिराजदार, पांडू बंदिचोडे, पिरप्पा कुंभार, सिध्दण्णा बगले, श्रीकांत मुक्काणे, सुरेश चव्हाण उपस्थित होते.



# विना अपघात सेवा केलेल्या १४ चालकांचा सपत्नीक सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

राज्य परिवहन सोलापूर विभाग २५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी विना अपघात सेवा केलेल्या १४ चालकांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

सदर सत्कार समारंभ हा महादेव राऊत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक फौजदार चावडी पोलीस स्टेशन यांच्या हस्ते चालकांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, विभागीय वाहतूक अधिकारी अजय पाटील, कामगार अधिकारी नकाते, सुरक्षा व दक्षता अधिकारी खंदारे, विभागीय स्थापत्य अभियंता तुषार चौधरी उपस्थित होते. यावेळी विभागातील सर्व संघटना प्रतिनिधी व कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये ड्रोन टेक्नॉलॉजीवर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १७ ऑगस्ट -**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये ड्रोन टेक्नॉलॉजीवर आधारित एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेच्या प्रास्ताविकात प्राचार्य म्हणाले, भविष्यात ड्रोन टेक्नॉलॉजी एक अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र म्हणून उदयास येत आहे. अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख होते आणि त्यांना या क्षेत्रात करिअर करण्याच्या संधी उपलब्ध होतात. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांना ड्रोनचे मुख्य भाग याबद्दल तांत्रिक माहिती देण्यात आली. दुसऱ्या सत्रात ड्रोन उडवण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# बालिकेचे अपहरण करणाऱ्यास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

शाळेमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी गेलेल्या तेरा वर्षीय बालिकेचे अपहरण करणाऱ्यास फौजदार चवळी पोलिसांनी कराड इथून अटक करीत अपहरित मुलीची सुटका केली.

सिद्राम नागप्पा बुक्का (वय १९) राहणार कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता .

या प्रकरणातील फिर्यादीची तेरा वर्षीय मुलगी ही १५ ऑगस्ट रोजी सकाळी सहाच्या सुमारास शाळेमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी घरातून गेली होती. ती घरी परत आलीच नाही त्यामुळे पालकांनी तिचे कुणीतरी अपहरण केल्याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ हालचाली करून तांत्रिक पद्धतीने व बातमीमध्ये मार्फत संशयित आरोपीचा शोध घेतला. त्यावेळेस यातील बालिकेला सिद्राम बुक्का या युवकाने पळवून नेल्याचे समजल्यानंतर पोलिसांनी तात्काळ हालचाल करून त्यास कराड येथील कारवे नगर येथून अपहरित मुलीसह ताब्यात घेतले.

संशयित आरोपी व अपहरित बालिका या दोघांनाही सोलापुरात आणण्यात आले असून मुलीला तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश बावणे हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक आयुक्त प्रताप पोमन, पोलीस निरीक्षक महादेव राऊत, तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय शिरसागर ,पोलीस उपनिरीक्षक सतीश बावणे, पोलीस नाईक आयाज बागलकोटे, अमोल खरटमल, सुरज सोनवलकर, अमोल पवार यांनी केली.

# ग्रंथालय हे एक ज्ञान भांडार : डॉ. पोतदार

### ए.जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये ग्रंथपाल दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

आपलं ब्रेन असा अवयव आहे की त्यात कितीही अनलिमिटेड डेटा सेव्ह करून ठेवू शकता आणि आयत्या वेळेस त्याचा वापर करता येतो तसे मोबाईलवर क्षणात माहिती मिळते परंतु तुमचं ज्ञान त्यातून दिसून येत नाही ते पुस्तक वाचल्यानेच दिसून येते, ग्रंथालय हे एक ज्ञान भांडार असे प्रतिपादन डॉ. व्ही व्ही पोतदार यांनी केले.

ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये ग्रंथपाल दिन साजरा उत्साहात साजरा झाला. त्यावेळी ते बोलत होते. ए. जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये ग्रंथपाल दिनानिमित्त ग्रंथालयात प्रथम वर्ष बीटेक ते चतुर्थ वर्ष बीटेक पर्यंतच्या जास्तीत जास्त विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीनी ग्रंथ सारांश स्पर्धेत




भाग घेऊन सहभाग नोंदविला. त्यातील विजेते व उत्तेजनार्थ विद्यार्थीपुढील प्रमाणे प्रथम तनिष्का माने, द्वितीय वैभवी काटमोरे, तृतीय दर्शना मसाले. उत्तेजनार्थ साक्षी सुरवसे, भावना कांबळे यांनी यश संपादन केले.

यावेळी ग्रंथपाल श्रीनाथ लोंढे, संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, ट्रस्टी एस. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, एजीपीपीआयचे उपप्राचार्य प्रा.एस. के. मोहिते, प्रा. एस. व्ही. कुलकर्णी, डॉ. एस. बी. गदवाल, प्रा. टी.डी. मसलेकर, प्राध्यापिका एम. एन. देशमुख, प्रा. ए. आर. मळेकर व एजीपीपीआयचे ग्रंथपाल के. व्ही. कस्तुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.पी. एस. स्वामी व आभार एस. बी. लोंढे यांनी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बी. डी. हिरेमठ, एस. एस. माड्याळ यांनी परिश्रम घेतले.

## कासेगावात वै.हभप मधुकर महाराज जोशी यांच्या समाधीवर आज पुष्पवृष्टी

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि. १७ ऑगस्ट-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील दिवंगत कीर्तनकार वै. हभप मधुकर महाराज जोशी यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी दि.१८ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता विठ्ठल मंदिरात हभप मन्मथ महाराज बहिरमल यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.



येथील वारकरी सांप्रदायाचे निष्ठावंत व सोलापूर परिसरात आपल्या किर्तनातून वेगळा ठसा उमटवत साक्षात्कारी सत्पुरुष ठरलेले वै. मधुकरबुवा जोशी यांची २००० साली ग्रामस्थांनी विठ्ठल मंदिरासमोर समाधी बांधली आहे. त्याठिकाणीच सोमवारी किर्तन होणार आहे. दुपारी बारा वाजता समाधीवर पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. गावातील समस्त भजनी मंडळाच्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे. कीर्तनानंतर महाप्रसादाची पंगत होणार आहे. भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन हभप श्याम महाराज जोशी यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बनावट सहीद्वारे ऊस बिल घेतल्याचे बनवले संमती पत्र

सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

उसाचे बिल काढण्यासाठी बनावट सहीच्या आधारे १०० रुपयांच्या बाँडवर संमती पत्र तयार केले, ते कारखान्याच्या व्यवस्थापकास दिले. त्या बदल्यात ३० हजाराचा मोबदला मिळाला असल्याचा बाँड कारखान्यास दिला. याप्रकरणी एकाविरुध्द जेलरोड पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना ५ जुलै रोजी सोलापुरातील कोर्टासमोर घडली आहे. जाकीर हुसेन अब्दुल सत्तार पिरजादे (वय ३७, रा. होटगी गाव, ता. दक्षिण सोलापूर,) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तौसिफ इक्बाल काझी (रा.मौलाली चौक, शास्त्री नगर,सोलापूर) यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी याने ५ जुलै रोजी कोर्टासमोरील अँड सय्यद अब्दुलजलिद हुसेन यांचेकडून फिर्यादीचे सहीचे खोटा १०० रुपयाचा बनावट दस्त घेतला. त्यावर संमतीपत्र तयार करून घेतले. संमती लिहून देणार फिर्यादी १५ फेब्रुवारी २०२२ रोजी लिहून घेणार यांचेविरुद्ध व्यवस्थापक, सिध्दनाथ शुगर फॅक्टरी तिऱ्हेगाव उत्तर सोलापूर यांना गट नं ३०१ होटगी गाव या शेतीचे ऊस बिलाकरिता तक्रारी हरकत घेतली होती. कारखान्यांकडून संम ती लिहून घेणार यांचे बिल थकीत ठेवले होते. परंतु ५ जुलै रोजी संमती लिहून देणार व लिहून घेणार यांच्यात तडजोड करून बाबत एक मार्ग काढला आहे. यात लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना मोबदला म्हणून ३० हजार रुपये फिर्यादीस मिळालेत, असा उल्लेख केलेला १०० रुपयांचा बॉन्ड तयार केला. त्यावर फिर्यादीचा बनावट सही करून सदर बॉन्ड व्यवस्थापक सिध्दनाथ शुगर फॅक्टरी यांना दिला आहे. ही गोष्ट फिर्यादीस कळाल्यानंतर त्यांनी पोलिसांत फिर्याद दिल्याने तौसिफ काझी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. या प्रकरणाचा तपास सपोनि चानकोटी करीत आहेत.



## मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते १३४८ सदनिकांचे वितरण

### सोलापूरच्या लाभार्थी कामगारांसाठी सोनियाचा दिनू

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत म्हाडातर्फे उभारण्यात आलेल्या दहिटणे येथील राष्ट्र तेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत १ हजार १२८ आणि शेळगी येथील श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत २२० अशा एकूण १ हजार ३४८ सदनिकांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज (दि. १७) करण्यात आले. दरम्यान, रविवारचा दिवस येथील घरकुल लाभार्थी कामगारांसाठी आजचा सोनियाचा दिनू असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाला पालकमंत्री जयकुमार गोरे, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळरावपाटील, आमदार सर्वश्री विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, रणजितसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, दिलीप सोपल, सचिन कल्याणशेट्टी, अभिजित पाटील, देवेंद्र कोठे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर आदींची उपस्थिती होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, सोलापूर शहरात ४८ हजार कुटुंबांना हक्काचे घर देण्याचे नियोजन असून, देशाला नवीन दिशा देणारे आणि नवभारताचा पाया रचणारे भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या स्मरणार्थ प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राष्ट्रतेज अटल गृहनिर्माण संस्थेने सुंदर गृहनिर्माण प्रकल्प साकारला असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले, गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत अतिशय सुंदर घरांची निर्मिती करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शिक्षण, आरोग्य, रोजगाराच्या समस्या दूर करतांना साम न्य माणसाला हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यात आली. त्याअंतर्गत पीपीपीच्या माध्यमातून काही प्रकल्प हाती घेण्यात आले, त्यातील हा प्रकल्प आहे.

या प्रकल्पाला अटल बांधकाम योजनेतून २ लाख रुपये देण्यात आले. हरितपट्ट्यात मान्यता दिल्याने जागेची किंमत कमी झाली, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अनुदान मिळाले. त्यामुळे लाभार्थ्याला कमी दरात घरकूल उपलब्ध झाले आहे. लाभार्थ्यांला घरभाड्या एवढाच बँकेचा हप्ता भरावा लागणार आहे आणि घर त्याच्या नावाने होईल असे नियोजन करण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केवळ सोलापूरमध्ये ४८ हजार घरांचे नियोजन करण्यात आले आहे, त्यापैकी २५ हजार घरांचे काम पूर्ण करण्यात आले. २० हजार घरांचे नगारिकांना वितरण करण्यात आले आणि उर्वरीत घरांचे काम सुरू आहे. याकरिता प्रधानमंत्री महोदयांनी १ हजार कोटी उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गरिबाच्या घराचे स्वप्न पुर्ण करता येणार आहे. प्रास्ताविकात शंभरकर यांनी गृहनिर्माण संस्थेची माहिती दिली. असंघटीत क्षेत्रातील कामगार, रिक्षाचालक, भाजी विक्रेते यांच्यासाठी या गृहप्रकल्पांतर्गत हक्काचे घर उपलब्ध होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील दहिटणे येथील राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेमध्ये ५० इमारतींतून ३२७० चौ. फुटांच्या १ हजार २०० स्वयंपूर्ण सदनिका उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या गृहप्रकल्पांतर्गत आतापर्यंत १ हजार १२८ सदनिकांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच सोलापूर महानगर पालिकेच्या हद्दीतील शेळगी येथील श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी या गृहनिर्माण संस्थेअंतर्गत ८ इमारतींची उभारणी करण्यात येत आहे यामध्ये एकूण २५२ सदनिका अत्यल्प उत्पन्न गटासाठी उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापैकी २२० सदनिकांचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले असल्याची माहिती त्यांनी दिली. असंघटित क्षेत्रातील ८११ बांधकाम मजुरांना कामगार विभागामार्फत रु. २ लाखांचे अतिरिक्त अनुदान प्राप्त झाले असल्याने त्यांना स्वस्तात घरकूल उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला माजी आमदार राजेंद्र राऊत, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी विजय वाघ, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे, राष्ट्र तेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेचे अध्यक्ष सुरेश बिराजदार, श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास घरकुल लाभार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सोलापूर शहर आणि उत्तर मतदारसंघातील भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची हजारोंनी उपस्थिती होती.



### सामान्यांसाठी घरे उभारण्याचा 'सोलापूर पॅटर्न' राज्याला मार्गदर्शक

ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ३० लाख घरकुलांना केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे २०१८ पर्यंत प्रतिक्षा यादीतील सर्व नागरिकांना घरे देण्यात येणार आहेत. देशात सर्वाधिक वेगाने घरे ग्रामविकास विभागामार्फत उभारण्यात येत आहेत. २० लाखांपेक्षा अधिक घरांचे काम सुरू करण्यात आले आहे. पुढील दोन वर्षात सर्व ३० लाख कुटुंबांचे घराचे स्वप्न पूर्ण होईल. २०१८ च्या यादीतून सुटलेल्या नागरिकांसाठी नव्याने नोंदणी करण्याची परवानगी मिळाल्याने त्यांनाही लवकरच केंद्र सरकारच्या माध्यमातून घरकूल मिळेल. महाराष्ट्र हे पहिले बेघरमुक्त राज्य करायचे आहे. या ३० लाख घरांना केंद्र सरकारच्या अनुदानासोबत राज्य सरकार ५० हजार रुपये देईल आणि प्रत्येक घरावर सौर ऊर्जेचा वापर करून त्यांना मोफत वीज उपलब्ध होईल. याच पद्धतीने सुंदर घरे उभारून गृहनिर्माण क्षेत्रात 'सोलापूर पॅटर्न' तयार झाला आहे. एखाद्या खाजगी विकासकाच्या प्रकल्पालाही लाजवेल अशी घरे उभारण्यात आली आहे. सोलापूरने महाराष्ट्राला गरजूंना कमी खर्चात दर्जेदार घरे देण्यासंदर्भात दिशा दाखवली आहे, अशा शब्दात श्री.फडणवीस यांनी प्रकल्पाचे कौतुक केले.

### मराठा समाजात दीड लाख उद्योजक तयार

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातर्फे धनादेश वितरणासंदर्भात बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले, महामंडळाने अडीच हजार लोकांना कर्ज देऊन स्वावलंबी उद्योजक होण्यास मदत केली आहे. या महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजात उद्योजक तयार करायचे आहेत. महामंडळाच्या माध्यमातून राज्यात १ लाख ५२ हजार उद्योजक तयार झाले असून आणि सुमारे १३ हजार कोटी उपलब्ध करून दिले आहेत. इतरांना रोजगार देणारा उद्योजक उभा रहात असल्याचे समाधान असल्याचे श्री.फडणवीस म्हणाले.

### बेरोजगार युवकांचे स्थलांतर थांबवावे

यावेळी आमदार विजय देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले. दोन्ही गृहनिर्माण प्रकल्पांतर्गत घरांचे काम अत्यंत चांगले झाले असून, लाभार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. सोलापूर शहरात रस्ते, आरोग्य आदी चांगल्या सुविधा उपलब्ध होत आहेत. सोलापूर शहरात मुलभूत सुविधांसोबत शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत आहे. येत्या काळात शहराचा औद्योगिक विकासही होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सोलापूर येथे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी तसेच येथील बेरोजगार तरुण येथे स्थलांतर थांबावे यासाठी मोठा उद्योग देण्याची मागणी त्यांनी केली.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते १० जणांना घराच्या चावीचे वितरण तर ४ जणांना दिले धनादेश

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात घरकूलाच्या १० लाभार्थ्यांना चावीचे वितरण करण्यात आले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातर्फे ४ लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या धनादेशाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. सोलापूर सोशल फाऊंडेशनतर्फे आयोजित होणाऱ्या सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरणही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

### 'माझं सोलापूर, सुंदर सोलापूर' हा संकल्प : पालकमंत्री गोरे

गृहनिर्माण प्रकल्पांमुळे सोलापूर शहराच्या वैभवात भर पडली असून, सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आनंद निर्माण झाल्याचे नमूद करून पालकमंत्री गोरे म्हणाले, या दोन्ही प्रकल्पांमुळे साडेतेरा कुटुंबांना हक्काचे घर वाजवी किंमतीत मिळणार आहे. प्रकल्पांतर्गत सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यापूर्वी घंटा हजार घरांचा प्रकल्प पूर्ण करण्यात आला होता. शहरी आणि ग्रामीण नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्याचे शासनाचे प्रयत्न आहे. राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत दहा वर्षात १० लाख २६ हजार घरे सामान्य नागरिकांना देण्यात आले. मात्र गेल्या सहा महिन्यात गरजूंसाठी ३० लाख घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### कळमणमध्ये तरुणाची गळफासाने आत्महत्या

सोलापूर, दि.१७ ऑगस्ट-

उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण येथे एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. शनिवारी (ता. १६) दुपारी तीनच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. दीपक नारायण पवार (वय २८, रा. कळमण) असे त्याचे नाव आहे. राहत्या घरी छताच्या वाशाला दोरीने त्याने गळफास घेतला. कुटुंबियांनी फास काढल्यावर तो बेशुद्धावस्थेत होता. त्यांनी उपचारासाठी त्याला येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याचा मृत्यू झाला होता. त्याच्या आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### अल्पवयीन मुलीला पळवून नेले

सोलापूर, दि.१७ ऑगस्ट-

अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरुद्ध फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. शाळेतील स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजवंदन कार्यक्रमासाठी शुक्रवारी (ता. १५) सकाळी सहाच्या सुमारास मुलगी (वय १३) घरातून बाहेर पडली. तिने जाताना फोटो काढण्यासाठी वडिलांचा मोबाईल सोबत नेला. अकराच्या सुमारास शाळेची बस आली. मात्र, मुलगी घरी परतली नाही. त्यामुळे तिच्या कुटुंबियांनी मोबाईलवर संपर्क केला असता तो होऊ शकला नाही. त्यांनी तिच्या मैत्रिणीकडे विचारणा केल्यावर तिने ती आत्याच्या मुलासोबत गेल्याचे सांगितले. ती ध्वजवंदन कार्यक्रमास शाळेत हजर होती, असेही तिने सांगितले. त्यांनी शाळेतील वर्गशिक्षिका यांच्याकडे विचारणा केली. त्यांनीही वर्गमैत्रिणीने ती तिच्या आत्याच्या मुलासोबत गेल्याचे सांगितले. तिच्या आत्याचा मुलगा १० वर्षांचा आहे. तरीही त्यांनी तिच्या आत्याकडे चौकशी केल्यावर त्यांनी त्यांचा मुलगा घरी असल्याचे सांगितले. त्यानंतर कुटुंबियांनी नातेवाईकांसह शहरात विविध ठिकाणी तिचा शोध घेतला. परंतु ती न सापडल्याने त्यांनी पोलिसांत तक्रार दिली.

### तरुणास मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा नोंद

सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

किराणा मालाची उधारी देण्याच्या कारणावरून झालेल्या तक्रारीवरून राग मनात धरून एका तरुणास शिवीगाळ व लाथाबुक्यांनी मारहाण केली. याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सिध्दाराम नागराज केशेट्टी (वय ३६ रा. १०२ डी भवानी पेठ, घोंगडे वस्ती सोलापूर)यांनी दिलेल्या फिर्यादीवरून निगण्णा ऊर्फ अमर रायणी, यल्लप्पा पुजारी, योगेश कुंभार (रा. भवानी पेठ सोलापूर), व एक अज्ञात इसाम यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १६ ऑगस्ट रोजी दुपारी सव्वा एकच्या सुमारास भवानी पेठ या ठिकाणी घडली. सिध्दाराम केशेट्टी हे किराणाचे दुकान आहे. दुकानातील उधार माल दुचाकीवरून घेवून घराकडे आला होता. त्यावेळी आरोपी फिर्यादीच्या घराजवळ आला. काल रात्री निगण्णा रायणी याच्यासोबत किराणा मालाच्या उधारी देण्याच्या कारणावरून तक्रारी झाली होती. तो राग मनात धरून संशयित ओरापींनी शिवीगाळ करीत लाथा बुक्यांनी मारहाण केली. सिध्दाराम याचा एक दात तोडून दुखापत केली आहे. तसेच पत्नी अर्चना ही भांडण सोडवण्यासाठी आली असता निगण्णा याने शिवीगाळ करून हाताने मारहाण करून ढकलून दिले आहे. तसेच तुला खल्लास करतो अशी दमदाटी केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार दुधाळे करीत आहेत.

### अल्युमिनियमचे १७५ किलोच्या पाईपची चोरी

सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

होटगी रोड, कम्युनिटी हॉल येथून अज्ञात चोरट्यांनी हॉलमध्ये तयार केलेले केबिनचे १७५ किलोचे अॅल्युमिनियम पाइप चोरून नेलेत. याप्रकरणी एका अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत डॉ. सुनिता मकरंद चव्हाणी (वय ६५ रा. विशाल नगर जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १५ जुलै ते १२ऑगस्ट दरम्यान बीएसएनएल कम्युनिटी हॉल होटगी रोड, सोलापूर या ठिकाणी घडली आहे. सदर ठिकाणी असलेल्या बिल्डींगमधील हॉलमध्ये केबिन तयार करण्यासाठीचे ३६ हजार ७५० रुपयाचे अॅल्युमि नियमचे पाईप होते. ते कोणीतरी अज्ञात चोरट्या फिर्यादीच्या संमतीवाचून लबाडीने चोरून नेले आहेत. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार हार करीत आहेत.

## आयडीयल स्कूलमध्ये दहीहंडी सण साजरा

सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

आयडीयल इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये दहीहंडी सण पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संपूर्ण शाळा परिसर 'गोविंदा आला रे' च्या गजरात न्हालेला दिसून आला. संस्थेचे अध्यक्ष सचिन चव्हाण, सचिवा ज्योती चव्हाण, मुख्याध्यापिका उर्मिला कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या जीवनातील आदर्शांचा मागोवा घेत शिक्षणासोबत संस्कारांची जपणूक करण्याचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. राधा-कृष्ण नृत्य, भजन, आणि गोविंदा वेशातील स्पर्धांमुळे वातावरण भक्तिमय आणि आनंदमय झाले. मुख्य आकर्षण ठरले विद्यार्थ्यांनी तयार केलेले छोटेखानी गोविंदा पथक, ज्यांनी पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक रेश्मा शेख, अंजुम शेख आणि रुपाली मॅडम यांनी परिश्रम



## मंद्रुप मध्यवर्ती पैगंबर जयंती अध्यक्षपदी दानेश शेख; उपाध्यक्षपदी बबलू बागवान

सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

मंद्रुप येथे पैगंबर जयंती निमित्त शान युवक संघटनेची बैठक मकानदार समाज दर्गा येथे यासीन मकानदार, शहाबुद्दीन शेख, बशीर बागवान, सिकंदर मकानदार, उस्मान नदाफ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मंद्रुप मध्यवर्ती पैगंबर जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी दानेश शेख तर उपाध्यक्षपदी बबलु बागवान, सचिवपदी मुबारक शिकलगार, कार्याध्यक्षपदी अफजल शेख, खजिनदार सद्दाम शेख व मिरवणुक प्रमुखपदी मोसीन बागवान, महमद शेख, मुकेश देविदास, इसाक शिकलगार, तौफिक शेख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सूत्रसंचालक मोसीन शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन असिफ शेख यांनी मानले.



## मेघशाम नगरात एकाची गळफास घेऊन आत्महत्या

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

शहरातील मुळेगाव रोडवरील मेघशाम नगरात एकाने राहत्या घरात दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली ही घटना दि. १६ ऑगस्ट रोजी रात्री दहाच्या सुमारास उघडकीस आली.

अमजद खान इस्माईल पठाण वय ४७ राहणार मेघशाम नगर प्लॉट नंबर २२ मुळेगाव रोड सोलापूर असे आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. दि. १६ ऑगस्ट रोजी रात्री दहाच्या पूर्वी राहत्या घरातील पत्र्यास असलेल्या लोखंडी अँगलला अम जद खान यांनी नायलॉन दोरीच्या सहाय्याने अज्ञात कारणावरून गळफास घेतल्याचे दिसून आले. ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अमजद खान यास खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले त्यावेळी डॉक्टर ध्रुव गायकवाड यांनी अम जद खानला मृत घोषित केले. याबाबत सिविल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## चोरीच्या ७ लाख रुपये किंमतीच्या १५ दुचाकी जप्त

### अट्टल चोरास अटक

### गुन्हे शाखेची कारवाई

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १७ ऑगस्ट

ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अट्टल दुचाकी चोरास अटक करून त्याच्याकडून सात लाख रुपये किंमतीच्या चोरीच्या १५ दुचाकी जप्त केल्या. त्याच्याकडून सोलापूर, सातारा, सांगली व पुण्यातील दुचाकीचे नऊ गुन्हे उघडकीस आले आहेत . नामदेव बबन चुनाडे (रा. अनिल नगर कराडकर मठा शेजारी पंढरपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पंढरपूर येथून चुनाडे यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने वेगवेगळ्या ठिकाणाहून दुचाकी चोरी केल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी सखोल तपास केला असता त्याने सांगोला, करमाळा, सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर येथून दुचाकी चोरल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याच्याकडून सहा लाख ९० हजार रुपये किंमतीच्या १५ दुचाकी जप्त केल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अ. पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय शिंदे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गायकवाड, पोलीस हवालदार रवी माने, सलीम बागवान, विजयकुमार भरले, धनराज गायकवाड, विनायक घोरपडे, सुरज रामगुडे, मनोज राठोड, अन्वर अत्तार, सतीश बुरकुल, महिला पोलीस कर्मचारी अश्विनी गोटे यांनी केली.

## एअर कंडिशनरचा स्फोट झाल्यामुळे विवाहित महिलेचा मृत्यू

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-

एसीचा स्फोट झाल्याने विवाहितेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना झाली आहे. शहरातील जुना विडी घरकुल परिसरात गडगी नगरमध्ये हा अंगाचा थरकाप उडवणारा प्रकार समोर आला आहे. एअर कंडिशनरचा स्फोट झाल्यामुळे चाळीस वर्षीय विवाहित महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला.

पल्लवी प्रवीण सग्गम, वय ४० वर्षे, रा गाडगी नगर, सुवर्ण कळस, सोलापूर, असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे. घरातील एअर कंडिशनरमध्ये स्फोट झाला. त्यानंतर आग भयंकर भडकली, याचा कसून तपास सुरु आहे. पल्लवीच्या दुर्दैवी मृत्यूमुळे कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून सोलापूरात हळहळ व्यक्त केली जात आहे. एमआयडीसी पोलीस पुढील तपास करत आहेत. स्वातंत्र्य दिनाची सुट्टी असल्याने पल्लवी प्रवीण सग्गम घरीच होत्या. गुरुवारी दुपारी त्या घरातील कामं करत असताना अचानक त्यांच्या घरातील एसीचा स्फोट झाला. स्फोटानंतर काही काही कळायच्या आत शॉर्टसर्किट झाले आणि आग वेगाने घरात तत्काळ पसरली. आगीच्या ज्वाळा इतक्या भयंकर होत्या की, त्यांना घरातून बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. आजूबाजूच्या रहिवाशांनी आग लागल्याचे पाहिल्यानंतर आरडाओरड सुरु केली. अग्निशमन दल आणि पोलिसांना याची माहिती देण्यात आली. परंतु तोपर्यंत खूप उशीर झाला होता. कारण पल्लवी यांचा होरपळून मृत्यू झाला.



जुना विडी घरकुल परिसरात आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाने आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. घरात तपासणी केली असता,पल्लवी सग्गम यांचा मृतदेह पूर्णपणे होरपळलेल्या अवस्थेत आढळून आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भगवंताच्या नामस्मरणाचे सामर्थ्य : हभप. डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१७ ऑगस्ट-**

भगवंतापर्यंत पोहोचण्याचे अनेक मार्ग आहेत. कर्म, ज्ञान, योग, भक्ती इत्यादी अनेक मार्गांचा विचार सांगितला आहे. परंतु या सर्वांमध्ये नाम हेच सर्वश्रेष्ठ होय, असे प्रतिपादन श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी प्रवचनमालेच्या २३ व्या सत्रात केले. ते यावेळी श्रीभगवंत मंदिर येथे चालू असलेल्या श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर बोलत होते.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २३

राजा परिक्षिताच्या प्रश्नांची उत्तरे देत शुकाचार्य बोलतात की, अंते नारायणस्मृती। म्हणजे मृत्यूसमयी माणसाने भगवंताचे स्मरण करावे. तुझ्याकडून झालेले पाप नष्ट करण्यासाठी प्रायश्चित्त करावे लागेल. भगवंताच्या नामस्मरणाने क्षणात अनेक पापांचे खंडन होते. शास्त्रांतही नऊविधा भक्तीमध्ये महत्त्वपूर्ण अशा स्मरण नावाच्या भक्तीचा उल्लेख आहे. डॉ. जयवंत महाराज नमूद करतात की, आयुष्यभर स्मरण केले तरच मृत्यूसमयी देवाचे स्मरण होईल. त्यासाठी, उठता बैसता मुखातून भगवंताचे नाम घ्यावे लागते.या संदर्भाने महाराज पुढे विशद करतात- काही शब्द असे आहेत की, त्या शब्दाचा उच्चार केला की त्याचा लगेच परिणाम होणार नाही. अग्नी म्हटले की तात्काळ आग लागणार नाही. काही शब्द असे आहेत की, त्या शब्दाचा उच्चार पूर्णतः नाही झाला तरी त्याचा किंचित परिणाम होतो. चिंच म्हटल्याबरोबर तोंडाला पाणी येते आणि काही शब्द पूर्ण परिणाम करतात. त्यामध्ये एकमेव असे भगवंताचे नाम आहे. हे भगवंताचे नाम पूर्णपणे परिणाम करण्यात प्रभावी आहे. मात्र, भगवंताचे स्मरण करतेवेळी शुद्ध भावनेने आर्त हाक मारली गेली पाहिजे. वस्त्रहरणावेळी द्रौपदी भगवंताचा धावा करीत आर्त हाक देते, कोठे गुंतालासी द्वारकेच्या राणा। तेव्हा ती म्हणते की, देवा, बघ हे सर्व काय चाललयं ! का तुला उशीर झाला यायला. तेव्हा, श्रीकृष्ण परमात्मा बोलतात, अगं मी तुझ्या जवळच होतो. तुझ्या हाकेची वाट पाहत होतो. पण, हाक देताना 'द्वारकेच्या राणा' म्हणून संबोधलीस म्हणून मला तुझ्यामुळे द्वारकेला जाऊन परत यावे लागले. हीच ती देव-भक्ताची आल्हाददायक अन् भोळी भक्ती होय. त्यालाच देव भुलतो; त्या भक्ताचे रक्षण करतो. जशी माय कुरवाळी आपल्या लेकुराला ! महाराजांनी केलेल्या या भावपूर्ण कथा निरुपणाने श्रोते भारावून गेले होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १८ ऑगस्ट २०२५ | शिवपूजन, शिवामूठ जवस |
| विक्रम संवत् २०८२ | ग्यानबा तात्या महाराज पु.ति. |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. दशमी (१७.२२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मृग (२६.०५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - हर्षण (२२.५९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (२८.२५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजना आखताल. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ** : जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन** : अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका. आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलतेमुळे आपला फायदा होईल. कौटुंबिक संबंध चांगले राहतील. परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे.

**सिंह** : व्यापारत नवीन योजना सुरू होतील. आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. वडीलधाऱ्या व्यक्तिंच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**कन्या** : सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे. धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा.

**तुळ** : आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील. प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे.

**वृश्चिक** : सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु** : आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर** : घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ** : उत्पन्नात वाढ झाली तरी खर्चावर नियंत्रण ठेवा. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन** : आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# दहीहंडीद्वारे भारतीय जवानांना मुजरा

## चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या दहीहंडीने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या वतीने दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. वडार समाजाच्या मानाच्या गोविंदा पथकाने दहीहंडी फोडली. चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या यंदाच्या वर्षी भारतीय सैन्याचा गौरव करणारा हलता देखावा सादर करण्यात आला. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, काँग्रेस पक्षाचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे आणि चंद्रनील सोशल फाउंडेशन तथा काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष सीए सुशील बंदपट्टे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यंदाच्या वर्षी चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून भारतीय जवानांचा गौरव करणारा हवेतील हलता देखावा सोलापूरकरांना याचीदेही पाहता आला. भारतीय सैन्याने भारतीयांसाठी केलेले शौर्य, कारगिल युद्ध, २६/११, भारतीय जवानांनी पाकिस्तानच्या दहशतवाद्यांचा केलेला नायनाट, पुलावमा असे भारतीय जवानांचे



अंगावर शहारे आणणारे शौर्य पाहून उपस्थितांनी भारत माता की जय अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. यावेळी वीर माता वीर पत्नीचा सन्मान देखील चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या वतीने खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी चेतन नरोटे, विनोद भोसले, अमोल शिंदे, जगदीश पाटील, पद्माकर काळे, आनंद चंदनशिवे, राजु कलकेरी, राजन जाधव, गणेश डोंगरे, अजय दासरी, सुधीर खरटमल, श्रीकांत डांगे, तात्या वाघमोडे, अंबादास शेळके, दीपक जाधव, महेश अलकुंटे, संतोष इरकल, अशोक यमपुरे, गुणाजी भांडेकर, विकास इटकर, बंडू कुलकर्णी, बंटी यमपुरे, सुशील कंमुरे, राहुल भांडेकर, प्रकाश शिंगाडे, भीमाशंकर बंदपट्टे, मुंन्ना यमपुरे, श्रीनिवास यमपुरे, प्रिया बसवंती, सुशीला अबुटे, प्रमिला तुपलवंडे, हेमा चिंचोळकर आदी उपस्थित होते.

चंद्रनील सोशल सोशल फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद असून, प्रत्येक वर्षी दहीहंडी निमित्त विविध देखावे सादर केले जातात. सुशील बंदपट्टे यांचे चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून असेच समाजोपयोगी आणि सामाजिक कार्य घडो अशा शुभेच्छा खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्या.

# ठोकळ प्रशालेस हरित सेनेच्या कार्याबद्दल प्रशस्तीपत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासन सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त इको क्लब, निर्मलाताई ठोकळ प्रशालेस राष्ट्रीय हरित सेना कार्यक्रम अंतर्गत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव करण्यात आला. सामाजिक वनीकरण येथे आयोजित कार्यक्रमात पंकजकुमार गर्ग, उपवनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे तसेच विवेक खांडेकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांच्या स्वाक्षरीचे महाविद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा निर्मला ठोकळ, अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे व संचालिका शिल्पा ठोकळ यांनी विद्यार्थी तसेच शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे कौतुक करून भविष्यातही शाळेने अशीच उत्कृष्ट कामगिरी करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

# पैगंबर जयंती मिरवणूक ७ सप्टेंबरला

## पैगंबर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी उमर मर्चंट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

यावर्षी पैगंबर जयंती दि.५ सप्टेंबर तर गणेश विसर्जन दि. ६ सप्टेंबर रोजी आहे. हे दोन्ही सण लक्षात घेता सोलापूर शहराचा सामाजिक सलोखा व बंधुभाव कायम राहण्यासाठी पैगंबर जयंतीची मिरवणूक दि.७ सप्टेंबर रोजी पारंपारीक मार्गावरुन काढण्याचा निर्णय जश्ने ईद-ए-मिल्लादुन्नबी जुलुस कमिटीने घेतला आहे, अशी माहिती कमिटीचे विश्वस्त मंडळ अध्यक्ष व माजी महापौर ॲड. यु. एन. बेरीया यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापुरातील जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी जुलुस कमिटीतर्फे पैगंबर जयंतीनिमित्त उत्सव समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी उमर म. इब्राहिम मर्चंट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीच्या कार्याध्यक्षपदी शकील मौलवी, समीर शेख, पीरअहमद शेख, शफीक रचभरे , जनरल सेक्रेटरीपदी अखलाक दिना, सेक्रेटरीपदी सईद नाईकवाडी, ताजोद्दीन हत्तुरे, सलिम नदाफ, कोषाध्यक्षपदी ईस्माईल उर्फ मुन्ना शेख, मिरवणुक प्रमुखपदी कलीम तुळजापूरे, राजु हुंडेकरी, सैफोद्दीन मणियार, शोएब चौधरी, सोहेल कुरेशी, सजावट प्रमुख पदी अशफाक बागवान, राजु कुरेशी, मुन्ना वळसंगकर, तौसिफ बशीर शेख, सुलेमान चामाकोरा यांची नियुक्ती करण्यात आल्याचे यावेळी यु. एन. बेरीया यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस माजी महापौर आरिफ शेख, मतीन बागवान, जमीर शेख आदी उपस्थित होते.

# स्नेहा महेश्वरमचे वक्तृत्व स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील चौथीची विद्यार्थिनी कुमारी स्नेहा वेणुगोपाल महेश्वरमने वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाइन स्वरूपात वक्तृत्व स्पधचे आयोजन युवा सेना सोलापूर उपजिल्हाप्रमुख व सामाजिक कार्यकर्ते सागर तांबोळकर यांच्यातर्फे केले होते. या यशाबद्दल अध्यक्ष बापू ढगे, सचिव विजय पुकाळे, मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाच्या अध्यक्षपदी बाळासाहेब मुस्तारे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

बाळीवेस येथील श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाच्या यंदाच्या उत्सव समिती अध्यक्षपदी बाळासाहेब मुस्तारे, उपाध्यक्षपदी राहूल बुन्हाणपूरे, महेश हदरे, अभिजीत कुलकर्णी तर सचिवपदी सिद्धेश्वर आळंद यांची एकमताने निवड करण्यात आली.

सालाबादप्रमाणे यंदाच्या श्रीगणेश उत्सव समिती कार्यकारिणी निवडची बैठक येथील श्री मंदिरात घेण्यात आली. अजित शेडजाळे यांच्या अध्यक्षतेखाली सिद्धेश्वर देवस्थानचे विश्वस्त बाळासाहेब भोगडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. सुधीर थोबडे यांच्या हस्ते नूतन उत्सव समिती अध्यक्ष बाळासाहेब मुस्तार यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ट्रस्टी उपाध्यक्ष प्रकाश वाले, मल्लिनाथ खुने, मल्लिनाथ मसरे, सुधीर थोबडे, गुरुलिंग समणे, संजय दर्गापाटील, शिवानंद बुगडे, रामचंद्र जोशी, बीप्पीन धुम्मा, सोमनाथ मंगाणे, राजशेखर विजापूरे, आनंद मुस्तारे, विकास धुम्मा, अप्पासाहेब कुताटे, शशिकांत बिराजदार, लक्ष्मण भाईकट्टी, बसवराज अय्यांगार, मल्लिनाथ इमडे, चिदानंद मुस्तारे, रतिकांत हदरे, शिवानंद दर्गापाटील, अमीत गुंगे, अमर चव्हाण, गुरूशांत मोकाशी, जितेंद्र लाड, शिवलिंग माळगे आदींची प्रमुख उपस्थित होती.



### इतर पदाधिकारी याप्रमाणे

खजिनदार : केदार मॅगाणे. प्रसिद्धीप्रमुख : पुष्कराज मेत्री. मिरवणूक प्रमुख : जगदीश हिरेहब्बू, नागनाथ मेंगाणे, मनिष मसरे, प्रतिक थोबडे, सागर हिरेहब्बू. प्रमुख कैलास मेंगाणे, आकाश हदरे, विनायक शरणार्थी, योगेश हदरे. पूजा समिती : गिरी स्वामी, सिद्ध स्वामी, गिरराज भोगडे, संदीप जोशी, गुरू पटणे, जीवन जोशी, रवी भोगडे, संजय बिराजदार.

# पालिकेतर्फे ज्ञानेश्वर महाराजांची जयंती साजरी



## पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदंगाच्या गजरात काढली पालखी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिकेतर्फे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली आज इंद्रभवन परिसरात पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदंगाच्या गजरात पालखी काढण्यात आली.

या सोहळ्याची सुरुवात महानगरपालिकेचे उपायुक्त तैमूर मुलाणी व अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज, प्र. कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, तसेच यूसीडी विभागाचे समीर मुलाणी यांच्या हस्ते पालखी पूजनाने झाली. पालखी मिरवणुकीत शहरातील विविध महिला बचत गटांचे सदस्य, महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दुपारनंतर सायं. ५ वाजता महानगरपालिका आवारातून निघालेली पालखी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ,सरस्वती चौक मार्गे पार्क चौक येथील हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, हुतात्मा किसन सारडा, हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा अ. रसूल कुर्बान हुसेन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास उपायुक्त तैमुर मुलाणी व सुधाकर इंगळे महाराज यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुढे महानगरपालिका येथे समारोप करण्यात आला. यावेळी जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे ,अखिल भाविक वारकरी मंडळाचे पदाधिकारी राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज, प्रदेश अध्यक्ष जोतिराम चांगभले, राष्ट्रीय सचिव बळीराम जांभळे, शहर अध्यक्ष संजय पवार, तसेच नंदा बेलेराव व मंगल दीक्षित, गणेश बिराजदार, शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी, समुदाय संघटक नागेश क्षीरसागर, गणेश हजारे, तसेच बाळे परिसरातील महिला बचत गट प्रतिनिधी नीता गवळी, सुनीता कोरे, उषा काकडे उपस्थित होते.

# शहरात स्वातंत्र्यदिनाचा उत्साह



## मनपा उर्दू शाळा क्र. १ व ५

महानगरपालिका उर्दू मुलांची केंद्र शाळा क्रमांक एक बेगम पेठ व उर्दू मुलींची शाळा क्रमांक पाच या दोन्ही उर्दू शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका नसरीन बेपारी यांच्या हस्ते झेडावंदन करण्यात आले. असमा अबूबकर नल्लामंदू यांनी स्वातंत्र्यवीरांचे बलीदानाचे महत्व सांगितलेसूत्रसंचालन बेनझीर शेख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका महबूबबी शेख, उजमा पठाण, अंजुम यांनी सहकार्य केले. निलोफर पल्ला यांनी सर्व मानले.



## शमा उर्दू शाळा

शमा उर्दू प्राथमिक शाळेत स्वातंत्र दिवस संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन अय्यूब नल्लामंदू हे होते प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार शरीफ सय्यद उपस्थित होते प्राचार्य अबुबकर नल्लामंदू यांनी स्वातंत्र्य दिवसाचे महत्व विषद केले. यावेळी माजी मुख्यध्यापक अ. कुद्दूस नल्लामंदू यांच्या हस्ते मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. शिक्षक शाहीन सदफ लिखित हम्द, स्वातंत्र गीत व जलीयान वाला बाग हे नाटक सादर केले. शाही सदफ यांनी सूत्रसंचालन केले तर अबरार नल्लामंदू यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जुबेदा सैदखां, आसिया बिजापूरे, मेअराज अल्लोळी, अबरार अय्यूब इत्यादिनी खूप परिश्रम घेतले.



## अराईज इंग्लिश मीडियम स्कूल

हत्तुरे वस्ती येथे ७९वा स्वातंत्र्य दिनानिमित्त अराईज इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये जम्मू काश्मीर राज्यातील कारगिल जिल्ह्याच्या सीमेवर भारतीय सैन्य दलात कार्यरत असणारे मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटचे सुभेदार भुताळी घोडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी निवृत्त पोलीस अधिकारी शिवलिंग थंबद, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार हत्तुरे, शिवाजी वर्क्स चे निवृत्त कामगार कुमार कांबळे, मुख्याध्यापिका ॲड.अश्विनी कांबळे, आरपीआयचे नेते प्रशांत रेटरे,नागेश हत्तुरे,लक्ष्मण किणीकर आदी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत संस्थेची संस्थापक विजयकुमार हत्तुरे यांनी केले यावेळी गंगाधर कांबळे,गणेश धोकटे, रुद्रप्पा कांबळे, पॅडशिंगे,ओंकार हत्तुरे,योगिनाथ इंडे, संदेश हत्तुरे, सिद्धार्थ हत्तुरे, मंगल देशमुख, नंदा शिंदे, शशिकला कोरे, कस्तुरी मायनाळे, नागेश पडणूरे, महेश जेम्बगी, कलीम काझी, हुसेन सय्यद उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापिका ॲड. अश्विनी कांबळे यांनी केले तर गणेश धोकटे यांनी मानले.



## मल्लिकार्जुन हायस्कूल

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय, श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा,श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने ७९ वा स्वातंत्र्य दिन सोहळा मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. प्रारंभी नगरातून प्रभात फेरी काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, सर्वेश हत्तुरे, प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांच्या हस्ते भारत मातेचे,महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करत पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रणाली चव्हाण,भाग्यश्री स्वामी,श्रावणी गाडेकर, समृद्धी वारकड या विद्यार्थिनीनी भाषणे केली. कार्यक्रमास एलकेपी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीचे कर्मचारी दिपाली ताकमोगे व त्यांचे सहकारी, प्राथ.मुख्याध्यापक सचिन जाधव, बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका संगीता हुमनाबादकर, काशिनाथ मळेवाडी, सुधाकर कामशेट्टी, बसवराज कोरे, अण्णाराया तुप्पद, लक्ष्मीकांत पनशेट्टी व सेवानिवृत्त शिक्षक शिवरुद्र मोकाशी, वसंत सगर, हेमलता पाटोळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके,परमेश्वर चांदोडे,संतोष स्वामी,सुकेशनी गंगोडा यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले तर आभार अनिता हौदे यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्वातंत्र्य दिन उत्साहात




### वळसंग येथे तिरंगा रॅली

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे अक्कलकोट पाश्चिम मंडल वळसंगमध्ये १५ ऑगस्ट रोजी देशभक्तीचा अनोखा जल्लोष अनुभवायला मिळाला. तिरंगा रॅली पदयात्रा संपन्न झाली. यावेळी अक्कलकोट पाश्चिम मंडलचे नवनियुक्त अध्यक्ष महादेव पाटील,युवा उद्योजक महेश बिराजदार, माजी सरपंच श्रीशैल दूधगी,ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, विनोद सुरपुरे, अनिल बर्वे,सागर माळी,मल्लिनाथ होनमर्गीकर उपस्थित होते. संपूर्ण नियोजन युवा उद्योजक महेश बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली कल्लय्या स्वामी यांनी केले.



### अक्कलकोट उत्तर पोलिस ठाणे

देशाचे ७९ व्या स्वातंत्र्य दिना निमित्त अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबिरात उच्चांकी ३७९ रक्तदात्यांनी रक्तदान करून स्वातंत्र्य दिन साजरा केला. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांच्या मार्गदर्शनाखाली शिबीर यशस्वीरित्या पार पडले. रक्तदानकरिता सिद्धेश्वर ब्लड सेंटरचे जनसंपर्क अधिकारी नागेश चव्हाण व महात्मा बसवेश्वर ब्लड सेंटरचे जनसंपर्क अधिकारी संतोष थोरात उपस्थित होते.अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी ही रक्तदान शिबीरात सहभागी होत रक्तदान केले.



### गृहरक्षक दल कार्यालय, अक्कलकोट

स्वातंत्र्य दिन निमित्त अक्कलकोट गृहरक्षक दल कार्यालय येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी समादेशक अधिकारी विजयकुमार हंद्राळमठ यांच्या हस्ते आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा गृहरक्षक दल अक्कलकोट यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे, भाजपाचे मोतीराम राठोड, समादेशक अधिकारी विजयकुमार हदराळमठ, होमगार्ड अधिकारी स्वामी व दसाडे करपे, संजय बनसोडे, सवळतोट, गायछोडे, माडकर, विलास गजदान, शहाणू कुंभार, राकेश गायकवाड, जावेद मुल्ला, राजू पाटील व महिला होमगार्ड सुज्ञानी हदराळमठ कोळी व पथकातील सर्व पुरुष व महिला होमगार्ड उपस्थित होते.



### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, अक्कलकोट

स्वातंत्र्य दिनानिमित्त अक्कलकोट येथील सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती संचलित मूकबधिर निवासी शाळा अक्कलकोट येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तसेच डिजिटल मीडिया यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमास लायन्स क्लब अक्कलकोटचे अध्यक्ष लायन अभय खोबरे माजी अध्यक्ष लायन राजेंद्र हत्ते, लायन विठ्ठल तेली, सचिव लायन शिरीष पंडित ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार जगदाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. पत्रकार संघाचे राज्य कार्यकारणी सदस्य स्वामीराव गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ डिजिटल मीडिया सोलापूर लोकसभा अध्यक्ष राजेश कुमार जगताप, पदाधिकारी रमेश भंडारी यांच्या सहकार्यातून कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी मुख्याध्यापक बनसिद्ध कोरे विशेष शिक्षक हैबती वंजारे, बसवराज आळंद, दिलीप नरवडे, रामदास गुंडगिरे, सुषमा वांगे, संगीता शिंदे, कलाशिक्षक मच्छिंद्र अंगुले, गजानन गाडेकर, सुरेश भोसले उपस्थित होते. आभार सुरेश भोसले यांनी मानले.



### गुलजार ग्रुप, सांगोला

स्वातंत्र्य दिनानिमित्त सांगोल्यातील गुलजार ग्रुपतर्फे बसस्थानकामध्ये जिलेबी वाटप करण्यात आली. यावेळी आगार प्रमुख विकास पोफळे, रफिक तांबोळी, स्थानक प्रमुख पंकज तोंडे, वाहतूक नियत्रंक प्रशांत चंदनशिवे, दिपक जाधव, संग्राम गायकवाड, राजेंद्र गुळमिरे, इंजि. रमेश जाधव, राजू मगर, आलमगीर मुल्ला, शाहबाजभाई तांबोळी, सतिश खडतरे, नरेंद्र होनराव, शरद बनकर, मिलिंद भंडारे, संदिप कोळेकर, समिर नदाफ, निहाल तांबोळी, शाहरूख तांबोळी, परवेज बागवान, रफिक शेख, मुकेश चौधरी, गणेश जाधव, आवेसरजा तांबोळी, प्रेम होनराव, श्रवण गुळमिरे, शंभू खडतरे उपस्थित होते.

# विविध उपक्रमांनी जिल्ह्यात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

**जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटना, ग्रामपंचायतमध्ये विविध उपक्रमांनी भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विविध महाविद्यालयात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना देण्यात आली. जिल्ह्यात ठिकठिकाणी स्वातंत्र्य दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर विविध शाळांमधून तिरंगा रॅली पदयात्रा काढण्यात आली. यावेळी देशभक्तीचा अनोखा जल्लोष अनुभवायला मिळाला.**



## महाराष्ट्र विद्यालय, बार्शी

येथील महाराष्ट्र विद्यालयात आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा या मोहीमेचा शुभारंभ १३ ऑगस्ट रोजी उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी स्काऊट गाईड विद्यार्थ्यांची प्रभात फेरी देखील काढण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी १४ ऑगस्ट रोजी पर्यवेक्षक एस.सी. महामुनी यांच्या हस्ते ध्वजारोहण आले. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी पसायदानाचे गायन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका के. डी. धावणे यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक एस.सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन. बी. साठे, प्रा. संजय बागल, प्रा. मारुती भांडवलकर उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार के. जी. मदने यांनी मानले.

## माळशिरस शहर व परिसरात स्वातंत्र्यदिन साजरा



येथील तहसील कार्यालयात तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार अमोल कदम,महसूल नायब तहसीलदार सिद्धनाथ जावीर, निवडणूक नायब तहसीलदार प्रवीण सूळ, पुरवठा निरीक्षक अधिकारी रविकिरण शेटे, मंडळ अधिकारी विजय लोखंडे उपस्थित होते. येथील जिल्हा सत्रन्यायालयात जिल्हा न्यायाधीश १ ,रा.वी.ताम्हाणेकर यांच्याहस्ते झेंडावंदन करण्यात आले .यावेळी जिल्हा न्यायाधीश एल डी.हुली,दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस.डी. धनवट,सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर बी डी.गोरे,दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यु बी.पेठे, सह दिवाणी न्यायाधीश ए.ए.व्यास. सह दिवाणी न्यायाधीश जे.एम.बिरासदार,सह दिवाणी न्यायाधीश एम.जे. गायकवाड उपस्थित होते. येथील पंचायत समिती कार्यालयात गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नगर पंचायत कार्यालयात नगराध्यक्षा विजय देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तालुका कृषी कार्यालयात प्रभारी तालुका कृषी अधिकारी सतीश कचरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पाटबंधारे कार्यालयात सहा अभियंता श्रवण बहार (श्रेणी २) यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. येथील वन क्षेत्रपाल कार्यालयात वनक्षेत्र अधिकारी राजेंद्र आटूळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. वीजवितरण कार्यालयात उप कार्यकारीअभियंता प्रशांत कालेकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. येथील पोलीस ठाण्यात पोलीस निरिक्षक विकास दिंडूरे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी ए.पी.आय.संदीप गोसावी, स्वाती पवार उपस्थित होते. हनुमान मोफत वाचनालय येथे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. श्रीनाथ विद्यालय ज्युनियर कॉलेज व महात्मा फुले विद्यालय येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ आप्पासाहेब देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले यावेळी ,मुख्याध्यापक योगेश गुजरे उपस्थित होते गोपाळराव देव प्रशाला व ज च आगाशे कनिष्ठ महाविद्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड मिलींद कुलकर्णी यांनी ध्वजारोहन केले यावेळी मुख्याध्यापक धनंजय केसकर उपस्थित होते. समीर गांधी महाविद्यालय व विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूलमध्ये सचिव रामभाऊ दोशी यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले यावेळी प्राचार्य देविदास गेजगे,मुख्याध्यापिका अपर्णा इनामदार उपस्थित होते. कन्या प्रशालेत संस्थेचे अध्यक्ष अजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय वाघमोडे उपस्थित होते. माळशिरस प्रशालेत मुख्याध्यापक यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. सावित्रीबाई फुले विद्यालयात संस्थेचे अध्यक्ष रघुनाथ बोराटे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक किसन म्हेत्रे उपस्थित होते.

### श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती वर्ष निमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक नगर पंचायतीच्या वतीने शहरातील प्रमुख मार्गावून काढण्यात आली.

## कुसमोड परिसरात स्वातंत्र्य दिन

माळशिरस तालुक्यातील कुसमोड व परिसरात ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. कुसमोड ग्रामपंचायतयाठिकाणी सरपंच शहाजी लेंगरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करणयात आले. यावेळी माजी सरपंच तुषार लवटे उपस्थित होते. तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर याठिकाणी सेवानिवृत्त मेजर जय गलांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माजी उपसरपंच स्वाती मदने, संजय पाटील, अध्यक्ष शशिकांत घडयाळे, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सुनिल डुरे उपस्थित होते. यावेळी मेजर गलांडे, माजी उपसरपंच संजय पाटील, सुशीला मदने, मुख्याध्यापक सुहास कोल्हे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संगीत कवायत यांनी मनोगत व्यक्त केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तर लेंगरेवस्ती येथे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांच्या हस्ते ध्वजारोहण करणयात आले. यावेळी मुख्याध्यापक विजय धायगुडे, हिोते. तर पवारवस्ती येथील जिल्हा परिषद शाळेत ध्वजारोहण करणयात आले.



## वाघजाई दूध उत्पादक सहकारी संस्था, पिसेवाडी

वाघजाई पिसेवाडी सहकारी दुध संस्था मर्यादित पिसेवाडी दुध संस्थेच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहण वाघजाई पिसेवाडी दुध संस्थेचे चेअरमन व पिसेवाडी गावचे माजी सरपंच तथा शिवअमृत दूध संघाचे संचालक सुरेश पिसे यांचा हस्ते संपन्न झाला. यावेळी उपस्थित महासंघ रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक, पिसेवाडी ग्रामपंचायचे सदस्य ज्ञानेश्वर पिसे,पिसेवाडी ग्रामपंचायतचे माजी सदस्य गणेश पिसे, इनुस मुलांनी, अमोल राऊत, महादेव पिसे,माऊली पिसे,संतोष पिसे, विष्णु शिंदे, भाऊ पिसे,रणजित गायकवाड,पांडुरंग म्हेत्रे,संतोष पिसे, दादा जाधव, योगेश गायकवाड,बालाजी भाकरे,सूरज पिसे, प्रकाश एकतपुरे,दत्ता पिसे, संतोष खिलारे उपस्थित होते.



## श्री शंकरलिंग शिक्षण संकुल

वळसंग (ता. द. सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत शासनाच्या नियमानुसार हर घर तिरंगा, घर घर तिरंगा हे उपक्रम व ७९ वा स्वातंत्र्य दिन संपन्न झाला. स्कूल कमिटीचे सदस्य शिवशरण प्याटी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन चेअरमन शिवशरण थळंगे यांच्या हस्ते तर ध्वजारोहण संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहणानंतर उपस्थित मान्यवरांना क्रीडा शिक्षक बाळकृष्ण गुंड व संतोष कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेतील विद्यार्थ्यांनी संचलनाद्वारे मानवंदना दिले.तदनंतर प्रशालेतील विद्यार्थ्यांमार्फत सामुहिक कवायत प्रकार सादर करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य विश्वनाथ थळंगे, प्रकाश दुधगी , रमेश दुधगी, संजय दुधगी, बसवराज शाबादे, निवृत्त मुख्याध्यापक संगमेश्वर बागलकोटी, मल्लिनाथ कण्णी उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत प्रशालेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार यांनी केले.

प्राचार्य वीरेश थळंगे यांनी प्रास्ताविक केले. या दिनाचे औचित्य साधून प्रज्वल कुर्ले यांची जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागात कनिष्ठ अभियंतापदी निवड झाल्याबद्दल, तर संजय मणुरे यांची पोस्टमन पदावरून कार्यालयीन अधिकारी पदावर निवड झाल्याबद्दल प्रशाला व संस्थेतर्फे शाल व बुके देऊन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, सामूहिक गीत गायन व भाषणे सादर केली. शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचे सांगता करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सर्वश्री पर्यवेक्षक शिवानंद घोडके,संजयकुमार धनशेट्टी, सिद्धाराम भैरामडगी, नीलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, बसवराज दुधगी ,विरेश थळंगे, मल्लिनाथ गौडगाव, अजय माणकोजी, विजय प्याटी, शिवराज अष्टगी,प्राध्यापक संतोष शिंदे,शरणय्या मसुती, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, स्नेहा हळगोदे, गंगा बागलकोटी, प्राध्यापिका प्रतिभा तांडूरे, राजश्री दुधगी, गौरीशंकर चनशेट्टी , निलकंठ चनशेट्टी, विनोद दुधगी,कट्टेप्पा कोळी आदींचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले यांनी केले तर आभार विजयकुमार प्याटी यांनी आभार मानले.

## मळोली जनता विद्यालय, वेळापूर



जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज तसेच छत्रपती शंभुराजे इंग्लिश मीडियम स्कूल येथे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात रीजनल मॅनेजर बीएसएनएलचे शंकरराव कदम यांच्या हस्ते ध्वजवंदनाने झाले. छत्रपती शंभुराजे इंग्लिश मीडियम स्कूलच्या बुद्धिवंत प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये जिल्हास्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज दहावी आणि बारावीच्या गुणवंतांचा सत्कार संपन्न झाला. एलकेपी मल्टीस्टेटच्या सांगोला चेअरमन अनिल इंगोले यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. हिंदी विषयामध्ये प्रथम क्रमांक येणारे विद्यार्थ्याला हिंदी विषयाचे माजी शिक्षक धुमाळ दी. टी यांच्याकडून पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ॲड. उपसरपंच महादेव नाना पवार हे होते. यावेळी रणजीतसिंह जाधव, सत्यजित जाधव, उद्धव जाधव, शिवाजी पाटील, मनोज जाधव, मनोज जाधव, दत्तात्रेय महाडिक, मोहन पवार, गणेश पाटील, प्रभाकर इंगळे सरदेशमुख, सुरेश जाधव, पोपटराव काळे पाटील, धनू जाधव, मेजर रामराजे भोसले, जयवंत जाधव, वसंत जाधव, वसंत कदम, संतोष जाधव, विजय पाटील, शाबीर मुजावर, राजाभाऊ जाधव, मदनसिंह जाधव, शिवराज जाधव, निलेश जाधव, सुजित जाधव, पनवेल येथील उद्योजक प्रशांत जाधव, संजय गुजर, पोलीस पाटील ॲड. संतोष पवार, ॲड. बाबाराजे कदम उपस्थित होते. प्रास्ताविक एस. एस. धुमाळ यांनी केले. प्राचार्य तानाजी लवटे स्वदेशाचे महत्त्व पटवून दिले. कवयती संचालनाची तयारी जाधव पी.एस. जाधव. एन.एस यांनी केली. सूत्रसंचालन ए.एस. जाधव यांनी केले.

## वेळापूर ग्रामपंचायत, कार्यालय




वेळापूर ग्रामपंचायत कार्यालयसमोर स्वातंत्र्य दिनानिमित्त सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. कार्यक्रमासाठी माळशिरस तालुक्याचे आ. उत्तमराव जानकर हे उपस्थित होते. प्रास्ताविक रजनिश बनसोडे यांनी केले. यानंतर जिल्हा परिषद शाळा मुली व मुलं, जिल्हा परिषद उर्दू शाळा त्याचबरोबर इंग्लिश स्कूल वेळापूर, जुनिअर कॉलेज वेळापूर, लोकविकास वेळापूर, या शिक्षण संस्थेच्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रम, त्याचबरोबर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. सर्वांना बक्षीसे देण्यात आली. गावामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या महिलांना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, अमृतराव माने देशमुख, दीपक राऊत, हनुमंत वायदंडे, शिवाजी पनासे पाटील, सीमा खाडे, प्रियंका आडत, अंजना माने, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, निशिकांत शिंदे मेजर भिंगारदिवे मेजर, माजी उपसरपंच जावेद मुलानी, दिलीप बनसोडे, अशोक बनसोडे, अशोक साठे, शंकर आडत, काशिनाथ आडत, अमोल पनासे, विठ्ठल माने, प्रदीप सरवदे, स्वप्निल सरवदे, रणजीत सरवदे, रायचंद खाडे, नागेश क्षीरसागर, प्रवीण गायकवाड, दयानंद बनसोडे, अमोल साठे,, मिलगे सर, दीपक चव्हाण, राहुल साठे, राहुल साठे, सुनील साठे तसेच कृषी कन्या, रहीम मुलाणी, सतीश कदम उपस्थित होते.

# श्री म्हंकाळेश्वराचे वास्तव्य लाभलेले श्री क्षेत्र सासुरे

## श्रावण सोमवार विशेष

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. १७ ऑगस्ट-**

ऐतिहासिक आणि पौराणिक महत्व लाभलेल्या सासुरे येथील श्री म्हंकाळेश्वर श्रावण महिन्यात दर्शन घेणे पुण्यकर्म समजले जाते, त्यामुळे संपूर्ण श्रावण महिना भाविकांची मांदीयाळी या मंदीरात असते. श्री क्षेत्र उज्जैनचा अधिवास लाभल्याने श्रावणी सोमवारचे औचित्य साधून अनेक भाविक विशेष दर्शनासाठी सासुरे ( ता. बार्शी) गावी जमतात.



दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे सासुरे गाव नागझरी नदीच्या तिरावर वसले आहे.श्री म्हंकाळेश्वर जागृत देवस्थान असलेले सासुरे हे शिवभक्तांचे श्रद्धास्थान बनले आहे. श्रावण महिन्यात श्री म्हकांळेश्वराचे दर्शन घेणे पुण्यवत असल्याने भाविक गर्दी करतात. मध्यप्रदेशातील उज्जैन हे श्री म्हकांळेश्वराचे मूळ स्थान आहे. मात्र सासुरेच्या दयाळराजे आवारे ह्या अवतारी पुरूषामुळे उज्जैनच्या दैवत्वाला सासुरेला यावे लागले. दयाळराजेंच्या सात पिढ्यानीं पायी चालत जावून उज्जैनच्या वाऱ्या केल्या. या भक्ति मागे कोणताही स्वार्थ दडला नसल्याने स्वतः श्री म्हकांळेश्वर सासुरे गावामध्ये प्रकटले. तेव्हापासून आजतागायत अविरहीत श्री म्हंकाळेश्वराची सेवा चालू आहे. संपूर्ण मंदीर हेमाडपंथी असून ५६ फूट उंच शिखर आहे. या शिखरावर विविध शिल्पकला कोरण्यात आल्या आहेत. शिवलिंग स्वयंभू असून शेषशाही नागनाथ पाच फूट उंचीचे असून फणा काढलेला आहे. मंदीरात बारा जोतिर्लिंग असून २९ शिवलिंगही आहेत. इथेच श्री म्हकांळेश्वराचे परम भक्त दयाळराजे यांची संजिवन समाधी आहे. कार्तिक पोर्णिमेला पाच दिवस मोठी यात्रा भरते. मात्र श्रावणात महिनाभर भाविक मोठी गर्दी करतात व श्री म्हकांळेश्वरास जलाभिषेक, रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक आदी अभिषेक घालतात. सास ऋषींनी वसवलेल्या या नगरीत पांडव अज्ञातवासात असताना वास्तव्य करून पुढील प्रवासास निघून गेले. नागझरी नदीला सासुरे येथे सहा ओढे नद्या रूपाने मिळतात. त्यामुळे विविध ठिकाणी निर्माण झालेल्या संगमांना भाविक भेटी देतात. अशा तिर्थक्षेत्राच्या दर्शनाने मनोरथ पूर्ण होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे श्रावण महिन्यात भाविक आवर्जून सासुरे गावी श्री म्हकांळेश्वराच्या दर्शनासाठी जातात.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## दत्त प्राथमिक विद्यामंदिर व दिलीपराव सोपल प्रशालेत दहीहंडी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१७ ऑगस्ट-**

आज शनिवारी दिलीपराव सोपल प्रशाला बार्शी व दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शी या दोन्ही शाळेत दहीहंडी उत्साहात साजरी

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहन ठोंगे यांचे हस्ते दहीहंडीचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रसंगी खजिनदार मृन्मय ठोंगे ही उपस्थित होते. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी दहीहंडी



फोडण्यासाठी जोरदार तयारी केली. गोविंदा आले रे आला या गीतावर सुंदर ठेका घेत दहीहंडीची मजा लुटली. विध्यार्थ्यांबरोबरच शाळेतील शिक्षक, शिक्षिका यांनीही दहीहंडी कार्यक्रमाचा आनंद घेतला. दहीहंडी फोडणाऱ्या ग्रुपला रोख रक्कमेचे बक्षीस ठोंगे सरांच्या हस्ते देण्यात आले. प्रसंगी संगीता काळे, युवराज जगताप, सुनिल लंगोटे, सचिन काळे, राहुल ठोंगे, शितल पाटील, प्रेरणा कसबे व सेवक संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी काल्याचा प्रसाद देण्यात आला.

## महत्त्वाचे

### जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा, अकरा जणांना अटक

**बार्शी, दि.१७ ऑगस्ट-**

बार्शी तालुका पोलिसांनी मौजे मालवंडी येथे देवीच्या मंदिरासमोर पटांगणात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर शनिवारी सायंकाळीच्या सुमारास छापा टाकून अकरा जणांना पकडले. तर दोघे पळ काढण्यात यशस्वी झाले.




या कारवाईत पोलिसांनी दोन लाख ५९ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गणेश किशन गोरे, नागनाथ ज्योती पवार, लहु नागनाथ पाडुळे, आलम गण्णी शेख, आसिफ बद्रुदिन शेख, दादा महादेव राजगुरु, चंद्रकांत काळे, हनुमंत आण्णासाहेब चिकणे, महादेव भागवत पाटील, संजय हरिदास पाचकुंड, अरुण हनुमंत पाडुळे ताब्यात घेतलेल्याची नावे आहेत. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मारुती शेलार यांच्या पथकाने केली. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### बार्शी बसस्थानकावर महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने लंपास

**बार्शी, दि.१७ ऑगस्ट-**

बार्शी शहरातील बसस्थानकावर पुन्हा एकदा चोरीची घटना घडली आहे. कर्जत तालुक्यातील आसमा मुजफ्फर सय्यद (वय ४० वर्षे, रा. कर्जत, जि. अहिल्यानगर) या महिलेच्या पर्समधून तब्बल अडीच तोळे वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. दि. १५ ऑगस्ट २५ रोजी दुपारी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी आसमा सय्यद या आपल्या मुलासोबत नातेवाईकांना भेटण्यासाठी बार्शी येथे आल्या होत्या. कर्जतला परतण्यासाठी त्या बार्शी बसस्थानकावर आल्या. त्यावेळी बार्शी-करमाळा बसमध्ये त्या बसल्या असता त्यांच्या पर्सची चैन उघडी असल्याचे त्यांना आढळले. पर्स तपासल्यावर सोन्याचे गंठण, सोन्याचे कानातले व सोन्याची अंगठी असे मिळून तब्बल अडीच तोळे वजनाचे दागिने गायब असल्याचे निदर्शनास आले.घटनेनंतर महिलेनं आजूबाजूस शोधाशोध केली; मात्र काहीही मिळून न आल्याने अखेर त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.बार्शी शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरु आहे.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**सांगोला, दि.१७ ऑगस्ट -**

७९ व्या भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचेहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास संस्था खजिनदार शंकरराव सावंत यांचेहस्ते पुष्पहार समर्पित करण्यात आला. प्रा.धनाजी चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य अमोल गायकवाड यांनी एन.सी.सी.कॅडेटला शपथ दिली. यावेळी अथर्व व सोनम पवार या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर कवायत संचलन केले. संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे यांचे हस्ते विज्ञान भित्तीत्रिकेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्था सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहन निवेदन डी. के.पाटील, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशितोष नष्टे यांनी केले. आभार पर्यवेक्षक काकसो नरूटे यांनी मानले.



### आदर्श विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

**सांगोला, दि. १७ ऑगस्ट-**

स्वातंत्र्यदिनानिमित्त कै.वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय, सांगोला येथे संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे यांचेहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भारतीय सैन्यदलातील सेवानिवृत्त सुभेदार मराठे उपस्थित होते. याप्रसंगी एसएससी परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्यावतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमेश पवार यांनी केले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केली. कार्यक्रमासाठी संस्था सचिव निलकंठ शिंदे, सदस्य विठ्ठलपंत शिंदे उपस्थित होते. सूत्रसंचालन एस.एस.कुंभार यांनी केले .

# श्रीपूरमध्ये धोकादायक पूल दुरूस्तीसाठी एकवटले युवक

## शिवछत्रपती तरूण मंडळाने श्रमदानासह स्वखर्चातून केली दुरूस्ती

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १७ ऑगस्ट-**

श्रीपूर येथील शिवछत्रपति तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानातून स्मशानभूमिकडे जाणारा रस्ता दुरुस्त केल्याने अडचण दूर झाली आहे. श्रीपूर पासून साधारण अर्धा किमी अंतरावर स्मशान भूमी आहे . स्मशान भूमिकडे जाताना वीर कॅनॉलवर पूल बांधलेला आहे. परंतू सुमार कामामुळे त्या पुलाचे कठडे तुटन त्यातून लोखंडी सळ्या बाहेर येवून धोकादायक झाला होता. स्मशानभूमि कडे रात्री अपरात्री अंत्यसंस्कार करण्यासाठी जाताना नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या बाबत महाळुंग श्रीपूर नगरपंचायतकडे गेल्या अनेक म



हिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा व पुल दुरुस्त करण्यासाठी मागणी केली जात होती. पण नगरपंचायत कसलीही कार्यवाही करीत नाही. अशा परिस्थितीत गेल्या आठवड्यात श्रीपूरमध्ये तीन ते चार व्यक्तींचे निधन झाले. अंत्यसंस्कार करण्यासाठी सरपण घेऊन जाणारे वहान तुटलेल्या धोकादायक पुलावरून जावू शकत नसल्याने येथील तरुणांना दोनशे ते अडीचशे मीटर अंतर खांद्यावर लाकडे वाहून न्यावी लागली पुलाची व लगतच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नऊ सेक्शन येथील शिवछत्रपती तरुण मंडळाने स्वखर्चाने जेसीबी सहाय्याने व श्रमदानाने तुटलेला पुल दुरुस्त करून गैरसोय टाळली. तसेच स्मशानभूमीत रस्त्यावर अस्ताव्यस्त असणारी झाडाझुडुपे, गवत काढून स्वच्छता केली. यापूर्वीही या कार्यकर्त्यांनी स्मशानभूमीमध्ये स्वच्छता अभियान राबवून साफसफाई करून अस्ताव्यस्त पडलेले मयताचे साहित्य, अर्धवट जळालेली लाकडे, बांबू व इतर टाकाऊ वस्तू तेथून उचलून त्यांची विल्हेवाट लावली होती. मंडळाच्या कार्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. स्मशानभूमी येथे जाण्यासाठी धोकादायक असलेल्या पुलाचे काम स्वखर्चाने करून या मंडळाने गावापुढे आदर्श ठेवला आहे.

## पंचायत समितीसमोर आत्मदहनाचा प्रयत्न

■ पोलिसांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१७ ऑगस्ट-**

स्वतःच्या मुलाला ग्राम पंचायतीमध्ये शिपाई पदावर नियुक्ती देण्याच्या मागणीसाठी एका व्यक्तीने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सकाळी बार्शी पंचायत समिती कार्यालयासमोर घडली. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करुन मोठा अनर्थ टाळला.

मिळालेल्या माहितीनुसार, कैलास जालिंदर सकट (वय ४५, रा. अलीपूर ता. बार्शी, सध्या रा. लोहियानगर, पुणे) हा व्यक्ती शनिवारी सकाळी ८ च्या सुमारास पंचायत समिती कार्यालय, बार्शी येथे आला. त्याने हातातील पांढऱ्या रंगाच्या बाटलीतील डिझेलसदृश द्रव अंगावर ओतून घेतले व आत्मदहनाचा प्रयत्न म्हणून काडीपेटी पेटवण्याचा प्रयत्न केला.

घटनेच्यावेळी गटविकास अधिकारी कार्यालयासमोरील बंदोबस्तावर पोलीस नागनाथ आंधळे, गाटे, आडसुळ, शेख, गुप्तवार्ता विभागाचे जगताप, परबत हजर होते. त्यांनी तत्काळ व्यक्तीला ताब्यात घेत काडीपेटी व बाटली जप्त केली. चौकशीत सांगितले की, त्यांचा मुलगा ओंकार कैलास सकट यास ग्रामपंचायत अलीपूर येथे शिपाई पदावर नियुक्त करण्यासाठी वेळोवेळी अर्ज व पत्रव्यवहार केला. मात्र, सरपंच, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी त्यास नोकरी दिली नाही. त्यामुळे न्याय मिळावा या मागणीसाठी त्यांनी आत्मदहनाचा मार्ग अवलंबण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी कैलास जालिंदर सकट यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ‘शिष्यवृत्ती’तील यशाबद्दल काव्या देशमुखचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट..**

माढा तालुक्यातील तांबवे टें येथील काव्या निलेश देशमुख या विद्यार्थीनीने इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत २९८ पैकी २८६ गुण मिळवून राज्यात पाचवा क्रमांक व सोलापूर जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळविल्याबद्दल राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण समारंभात काव्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, पोलिस शहर आयुक्त एम. राजकुमार, आमदार देवेंद्र कोठे,निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार आदी मान्यवर उपस्थित होते. काव्याने शशिकांत देशमुख व विश्वनाथ



सदर प्रमाणपत्र गौरवानंतर काव्याने बोलताना सांगितले की, मला आयएएस अधिकारी होऊन समाजाची, देशाची सेवा करायची आहे. माझ्या या यशात माझी आई सोनाली परबत-देशमुख, वडील निलेश देशमुख, शिक्षक तानाजी खरात, समाधान व्यवहारे, आदर्श पब्लिक स्कुलचे संस्थापक-अध्यक्ष अमोल सुरवसे, संचालिका पुजा सुरवसे यांचा वाटा आहे.

परबत या दोन्ही आजोबांसोबत हे प्रमाणपत्र स्विकारले. काव्याची यावर्षी नवोदय विद्यालय, पोखरापुरसाठी व शासकीय सैनिक स्कूल साठी सर्वोच्च गुण मिळवून निवड झाली आहे. तिच्या या तिहेरी यशाबद्दल तिचे कौतुक करण्यात आले. काव्या शिक्षक सहकार संघटनेचे राज्य सरचिटणीस व मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांची कन्या आहे.

## अकलूज न.प.तर्फे ज्ञानेश्वर माऊली जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १७ ऑगस्ट-**

अकलूज नगरपरिषद वतीने अकलूज शहरात मोठ्या उत्साहात ज्ञानेश्वर माऊली यांचा जन्मोत्सव टाळ मृदुंग, भजनी मंडळ, शालेय विद्यार्थी, शिक्षक वर्ग आणि अकलूज नगरपरिषद कर्मचारी, नागरीक यांचे उपस्थितीत ज्ञानेश्वर महाराज यांचे पालखी सोहळा आयोजित करण्यात आला.

नगरपरिषद कार्यालय येथून



सदर सोहळा सुरुवात करून विठ्ठल रुक्मिणी मंदिर, जुने ग्रामपंचायत कार्यालय, मारुती मंदिर, शिवापूर पेठ, पाटील वाडा, हनुमान तालीम चौक परिसरातून माऊलींचा नामघोष करत, टाळ मृदुंग गजरात , विवीध खेळ खेळत जल्लोषात उत्साहात सोहळा साजरा करण्यात आला.

## १९ पासून कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामबंद

■ आरोग्य कर्मचारी समितीचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ ऑगस्ट-**

१४ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होण्यास विलंब होत असल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी आरोग्य कर्मचारी हे १९ ऑगस्टपासून बेमुदत काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शासनास पत्र व्यवहार केले असून जिल्हास्तरावरून जिल्हा आरोग्य अधिकारी व



मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती समितीचे राज्य समन्वयक अलका विभुते, सोनकांबळे, काळे, गायकवाड, पुजारी, स्वामी, ननवरे, परदेशी, रणसूर आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद, सीईओ कुलदीप जंगम जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांना निवेदन देण्यात आले.

# यमाईदेवी आश्रम शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, उमा न्यूजचे संपादक उज्वल माने, मार्डीचे मंडल अधिकारी सुखदेव पाटील, तलाठी भाऊसाहेब कावळे, पोलीस पाटील अमोल कदम-पाटील, सेवालाल व नरोटेवाडीचे तलाठी शिवाजी माळी, ज्येष्ठ नागरिक संघ मार्डीचे अध्यक्ष मल्हारी काळे, संस्थेचे संस्थापक अशोक लांबतुरे, संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, मुख्याध्यापिका रुक्मिणी गवळी, दिव्यांग संघटना उत्तर सोलापूर तालुक्याचे अध्यक्ष बाणेगावचे श्री सिद्धेश्वर रुपनर, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, संगीता जाधव, विद्या लांबतुरे, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापूरे, संदीप चव्हाण उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी सामुदायिक कवायत प्रकार सादर केले. तसेच स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी मराठी,हिंदी,इंग्रजी या तिन्ही भाषेतून थोर महान क्रांतिकारी देशभक्त यांच्या जीवन कार्याचा उल्लेख करणारे भाषण केले. वृक्षारोपण व संवर्धन याविषयी छोटीशी नाटिका तसेच देशभक्ती गीतावर नृत्य सादर केले. यावेळी स्व.श्रीधर मार्तंडे प्रतिष्ठान मार्डी यांच्या वतीने इयत्ता पहिली ते सातवी मधील गुणवंत विद्यार्थ्यांना रोख स्वरूपात बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. मार्डीचे मंडल अधिकारी सुखदेव पाटील यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे प्रशांत माने यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेले कवायत प्रकार, भाषण, नृत्य पाहून तसेच शाळेचे झालेले प्रगती आणि चढता आलेख पाहून शाळेतील विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. संस्थेचे झालेली ही प्रगती पाहून आनंद व्यक्त केला. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मल्हारी काळे यांनी जेष्ठ नागरिकांवर अन्याय अत्याचार करणार नाही व करू देणार नाही अशी शपथ विद्यार्थ्यांकडून म्हणून घेतली. उत्तर सोलापूर दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष सिद्धेश्वर रुपनर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. प्रास्ताविक मुख्याध्यापिका रुक्मिणी गवळी यांनी केले. सूत्रसंचालन नानासाहेब लोखंडे यांनी केले तर आभार अमोल गुरव यांनी मानले.



